## अत्यंत महत्त्वाचे नियम व अटी


१ शुल्क आणि आकार

२ क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा

३ बिल पेमेंटसाठी तुमचा मार्गदर्शक

४ ग्राहकसंपर्क केंद्र

५ तक्रारनिवारण/तक्रारी/तक्रार वरच्या पातळीवर घेऊन जाणे

६ कुचराई/कर्जफेडीत कसूर

७ कार्डहोल्डरशिप खंडित करणे/मागे घेणे

८ कार्ड चोरी होणे/हरवणे

९ माहिती उघड करणे


## कार्डधारक करार / कार्डहोल्डर ॲग्रीमेंट


१ सर्वसाधारण

२ कार्डचा वापर

३ नियम व नियमावली लागू करणे

४ मालमत्ता

५ कार्डधारकाची उत्तरदायित्वे

६ क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा

७ अतिरिक्त कार्ड्स

८ खरेदी

९ रोकड अग्रीम

१० ईएमआयची सुविधा

११ शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्याची सुविधा

१३कॅशबॅक

१४को-ब्रँडेड कार्ड्स

१५हरवलेली किंवा चोरी झालेली कार्ड्स

१६ बिलिंग, विवरणे (स्टेटमेंट्स) आणि पेमेंट्स

१७ कार्डधारकाचा मृत्यू अथवा कायमस्वरूपी अपंगत्व

१८कुचराईचे प्रसंग

१९ आकार आणि शुल्क

२० आकारांची सूची

२१ व्हिजाकडून आणीबाणीच्या सेवा

२२ तृतीय पक्षाकडून वैशिष्ट्ये आणि सेवा

२३पेमेंट नाकारण्याची क्षमता

२४सुविधांमध्ये भर आणि त्या मागे घेणे

२५परकीय चलनाविषयी मार्गदर्शक तत्त्वे

२६ उत्तरदायित्वातून अपवर्जन

२७ कोटक महिंद्रा बँक रिवॉर्ड्स प्रोग्रॅम

२८नुकसानभरपाई

२९ खंडित करणे

३० नियम व अटींमधील बदल

३१. माहिती उघड करणे

३२. वाद आणि समझोत्यासाठी कार्यकक्षा

३३. पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून प्राप्त केलेल्या सेवांसाठी अतिरिक्त नियम व अटी

३४. सेक्युअर्ड कार्ड

३५. अतिरिक्त माहिती उघड करणे

३६. डू नॉट कॉल रजिस्ट्री

३७. संपर्काचे तपशील आणि तक्रारी

३८. असाईनमेंट

**हेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट कार्ड, रोयाल सिग्नेचर, झेन सिग्नेचर, व्हाईट सिग्नेचर, प्रीव्ही लीग सिग्नेचर, लीग प्लॅटिनम आणि एनआरआय रोयाल क्रेडिट कार्ड्स यांसाठी विशेष नियम व अटी.**

१ वेलकम गिफ्ट ऑफर

२ प्रायॉरिटी पास प्रिव्हिलेज

**कोटक क्रेडिट कार्ड्स रिवॉर्ड्स प्रोग्रॅम विभाग**

क. रिवॉर्ड पॉईंट्स प्रोग्रॅम

ख. पीव्हीआर कोटक रिवॉर्ड्स प्रोग्रॅम

ग. कोटक व्हॉईट पास व्हॅल्यू प्रोग्रॅम

घ. ६ई रिवॉर्ड प्रोग्रॅम

**कोटक बिझ क्रेडिट कार्डचे खास फायदे**

क. विमा

**क्रेडिट कार्ड रिस्ट्रक्चरिंगसाठी नियम व अटी - कोटक महिंद्रा बँक**

# अत्यंत महत्त्वाचे नियम व अटी

बँकेच्या एमआयटीसीची आणि कार्डधारक कराराच्या प्रतीची अलीकडील आवृत्ती प्राप्त करण्यासाठी कृपया www.kotak.com ला भेट द्या.

## १. शुल्क आणि आकार

### क. सामील होण्यासाठी शुल्क, वार्षिक शुल्क आणि ॲड ऑन कार्ड शुल्क

| कोटक महिंद्रा बँक कार्ड व्हेरिएंट | सामील होण्यासाठी शुल्क(वास्तविक खर्च अर्ज करताना कळविण्यात येईल) | वार्षिक शुल्क (वास्तविक खर्च अर्ज करताना कळविण्यात येईल) | सामील होण्यासाठी शुल्कात सूट देण्यासाठी अट | वार्षिक शुल्कात सूट देण्यासाठी अट – १ले वर्ष | वार्षिक शुल्कात सूट देण्यासाठी अट – २रे वर्ष आणि त्यापुढे | ॲड ऑन कार्डसाठी सामील होण्यासाठी शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| फीस्ट गोल्डभ | शून्य | ₹४९९** | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹२९९ |
| ८११ # ड्रीम डिफरंट | शून्य | शून्य | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | सूट दिलेली आहे |
| फार्च्युन गोल्ड | शून्य | शून्य | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹२९९ |
| अर्बन गोल्ड | शून्य | ₹१९९ | लागू नाही | एका वर्षात किमान १५,००० किरकोळ खर्च | एका वर्षात किमान १५,००० किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |
| पीव्हीआर गोल्ड/ पीव्हीआर प्लॅटिनम | शून्य | ₹४९९/₹९९९ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹२९९ |
| मोजो प्लॅटिनम | ₹१,००० | ₹१,००० | जारी केल्यानंतर ९० दिवसांच्या आत किमान ३०,००० खर्च. | एका वर्षात किमान १ लाख किरकोळ खर्च | एका वर्षात किमान १ लाख किरकोळ खर्च | ₹२९९ |
| रोयाल सिग्नेचर | ₹१,४९९ / शून्य | ₹९९९ | लागू नाही | एका वर्षात किमान १ लाख किरकोळ खर्च | एका वर्षात किमान १ लाख किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |
| झेन सिग्नेचर | ₹१,५०० | ₹१,५०० | लागू नाही | एका वर्षात किमान १.५ लाख किरकोळ खर्च | एका वर्षात किमान १.५ लाख किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |
| व्हाईट सिग्नेचर | ₹३,००० | ₹३,००० | लागू नाही | एका वर्षात किमान ५ लाख किरकोळ खर्च | एका वर्षात किमान ५ लाख किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |
| लीग प्लॅटिनम | ₹४९९ / शून्य | ₹४९९ | लागू नाही | एका वर्षात किमान ५०,००० किरकोळ खर्च | एका वर्षात किमान ५०,००० किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एनआरआय रोयाल सिग्नेचर | शून्य | ₹१००० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹५९९ |
| प्रीव्ही लीग सिग्नेचर (पेड व्हेरिएंट) | शून्य | ₹२५०० | लागू नाही | किमान किरकोळ खर्च ₹५ लाख किंवा बँकेसोबत इनसिग्निया किंवा ट्रू ऑप्टिमा की रिलेशनशिप राखा. | किमान किरकोळ खर्च ₹५ लाख किंवा बँकेसोबत इनसिग्निया किंवा ट्रू ऑप्टिमा की^^^ रिलेशनशिप राखा. | लागू नाही |
| प्रीव्ही लीग सिग्नेचर (फ्री व्हेरिएंट) | शून्य | शून्य | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | |
| डिलाईट प्लॅटिनम[#] | ₹१,९९९ | ₹२९९ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹२९९ |
| इसेन्शिया प्लॅटिनम | ₹१,४९९ | ₹७४९ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | ₹२९९ |
| सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम | ₹५९९ | ₹५९९ | लागू नाही | एका वर्षात किमान १,२५,००० किरकोळ खर्च | एका वर्षात किमान १,२५,००० किरकोळ खर्च | लागू नाही |
| वेल्थ मॅनेजमेंट सिग्नेचर | शून्य | शून्य | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| वेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट | शून्य | शून्य | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| सोलारिस प्लॅटिनम | ₹५०० | ₹५०० | लागू नाही | एका वर्षात किमान ७५,००० किरकोळ खर्च | एका वर्षात किमान ७५,००० किरकोळ खर्च | सूट दिलेली आहे |
| कोटक बिझ | ₹ २९९ | ₹ ४९९ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| वीर - प्लॅटिनम | शून्य | रु. २९९ | लागू नाही | लागू नाही | एका वर्षात किमान खर्च रु.५०,००० | सूट दिलेली आहे |
| वीर - सिलेक्ट | शून्य | रु.५९९ | लागू नाही | लागू नाही | एका वर्षात किमान खर्च रु.१,००,००० | सूट दिलेली आहे |
| ६ई रिवॉर्ड्स - इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड | ₹ ७०० | ₹ ७०० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ६ई रिवॉर्ड्स एक्सएल इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड | ₹१५०० | ₹१५०० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**टीप:** वरील शुल्क हे प्रत्येक प्रकारच्या कार्डसाठी लागू असेलेले मानक शुल्क आहे. जेव्हा वेळोवेळी विशिष्ट प्रमोशनल स्कीम्सअंतर्गत देऊ करण्यात आलेले शुल्क बदलू शकते.

## ख.अर्थपुरवठ्यासाठी आकार

| कोटक महिंद्रा बँक कार्डचे विविध प्रकार | व्याज आकार | | एटीएम कॅश विथड्रॉवल कॉल ए ड्राफ्ट/ कॅश अॅडव्हान्स प्रत्येकी १०,००० किंवा त्याच्या काही भागासाठी | |
|---|---|---|---|---|
| | मासिक दर | वार्षिक दर (एपीआर) | पैसे काढण्यासाठी शुल्क | वार्षिक दर (एपीआर) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फीस्ट गोल्ड/अर्बेन गोल्ड/पीव्हीआर गोल्ड/पीव्हीआर प्लॅटिनम/लीग प्लॅटिनम/डिलाईट प्लॅटिनम/इसेन्शिया प्लॅटिनम/सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम/सोलारिस प्लॅटिनम/ कोटक बिझ/रोयाल सिग्नेचर/झेन सिग्नेचर/वीर-प्लॅटिनम/सिलेक्ट/६ई रिवॉर्ड्स - इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड्स | ३.५०% | ४२.००% | ३०० | ४२.००% |
| ८११ ड्रीम डिफरंट/सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम (मुदतठेवीच्या बदल्यात दिले जाणारे) | ३.५% | ४२.००% | ३०० | ४२.००% |
| फॉर्च्युन गोल्ड | ३.५०% | ४२.००% | १९९ | ४२.००% |
| वेल्थ मॅनेजमेंट सिग्नेचर/इन्फिनिट क्रेडिट कार्ड/एनआरआय रोयाल सिग्नेचर/व्हाईट सिग्नेचर | ३.१०% | ३७.२०% | ३०० | ३७.२०% |
| प्रीव्ही लीग सिग्नेचर | २.४९% | २९.८८% | ३०० | २९.८८% |

**ग. इतर आकार**

| | | |
|---|---|---|
| विलंब आकार (''एलपीसी'') | शेवटच्या विवरणानुसार देय | एलपीसी आकार |
| | ₹१०० - ५०० | ₹१०० |
| | ₹५००.०१ - ५००० | ₹५०० |
| | ₹५०००.०१ - १०००० | ₹५०० |
| | ₹१००००+ | ₹७०० |
| मर्यादा ओल्यांडल्याबद्दल आकार | ₹५००* | |
| चेक परत आल्यास/<br>स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स पाळता न आल्यास** | ₹५००*<br>(लागू असलेल्या दरानुसार) | |
| किमान देय रक्कम (''एमएडी'') | देय असलेली किमान रक्कम ही बँकेने ठरवल्यानुसार टीएडीच्या ५% किंवा १०% असू शकेल. ही रक्कम विवरणात किमान देय रक्कम या स्तंभात प्रतिबिंबित होईल. | |
| परकीय व्यवहार मार्क अप | ३.५०%*भभ | |
| रेल्वे बुकिंग अधिभार<br>(लागू असलेल्या दरानुसार) | **रेल्वे अधिभारात सूट मिळण्यासाठी पात्र असलेली उत्पादने:** ८११**ड्रीम डिफरंट/रोयाल वेल्थ मॅनेजमेंट सिग्नेचर/वेल्थ मॅनेजमेंट सिग्नेचर/वेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट/ प्रीव्ही लीग सिग्नेचर/लीग प्लॅटिनम/एनआरआय रोयाल सिग्नेचर/झेन सिग्नेचर/व्हाईट सिग्नेचर/डिलाईट प्लॅटिनम/सोलारिस प्लॅटिनम. कोटक बिझ/वीर-प्लॅटिनम/सिलेक्ट **(जेथे रेल्वे अधिभारात सूट दिलेली असेल अशा व्यवहारांमध्ये रिवॉर्ड पॉईंट्सची भर पडणार नाही)**<br>**रेल्वे अधिभारात सूट मिळण्यास पात्र नसलेली उत्पादने:** इसेन्शिया प्लॅटिनम/सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम/फीस्ट गोल्ड/फॉर्च्युन गोल्ड/अर्बेन गोल्ड/पीव्हीआर (गोल्ड आणि प्लॅटिनम) ६ई रिवॉर्ड्स एक्सएल इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड/६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड | |
| इंधन अधिभार (किमान य१०) व्यवहाराच्या रकमेवर<br>(लागू असलेल्या दरानुसार) | **इंधन अधिभारात सूट मिळण्यासाठी पात्र असलेली उत्पादने:** फॉर्च्युन गोल्ड/८११ **ड्रीम डिफरंट/रोयाल सिग्नेचर/झेन सिग्नेचर/झेन सिग्नेचर/व्हाईट सिग्नेचर/वेल्थ मॅनेजमेंट क्रेडिट/वेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट/प्रीव्ही लीग सिग्नेचर/लीग प्लॅटिनम/एनआरआय रोयाल सिग्नेचर/डिलाईट प्लॅटिनम/**सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम/सोलारिस प्लॅटिनम/ कोटक बिझ/वीर-प्लॅटिनम/सिलेक्ट **(जेथे इंधन अधिभारात सूट दिलेली असेल अशा व्यवहारांमध्ये रिवॉर्ड पॉईंट्सची भर पडणार नाही)** | |
| | **इंधन अधिभारात सूट मिळण्यास पात्र नसलेली उत्पादने:** इसेन्शिया प्लॅटिनम/फीस्ट गोल्ड/अर्बेन गोल्ड/पीव्हीआर (गोल्ड आणि प्लॅटिनम) ६ई रिवॉर्ड्स एक्सएल इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड/६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड | |
| कॅश पेमेंट आकार | ₹१००* | |
| कार्ड बदलून देण्यासाठी शुल्क (हरवलेले आणि खराब झालेले कार्ड) | ₹१००* प्रत्येक इमेज कार्डसाठी | |

| | |
|---|---|
| क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्टची (सिबिल) प्रत देण्यासाठी आकार | ₹५०* प्रत्येक प्रसंगासाठी |
| इमेज कार्डसाठी शुल्क### | ₹९९* प्रत्येक प्रसंगासाठी |
| माय टीम इमेज कार्ड शुल्क#### | ₹५९९* प्रत्येक प्रसंगासाठी |

*सरकारी कर (सेवाकर, जीएसटी, असल्यास/वेळोवेळी लागू असलेले इतर सर्व कर यांसहित). **फक्त दिनांक १८ मे २०११ नंतर देण्यात आलेल्या फीस्ट कार्डससाठीच लागू. ****** **एका कॅलेंडर वर्षात रेल्वे सरजार्चवर कमाल सूट रु.५००. फक्त रु.५०० ते रु.३,००० पर्यंतच्या फ्युअल ट्रँझॅक्शन्सवर इंधन अधिभारात सूट.** प्रीव्ही लीग सिग्नेचर/कोटक बिझ आणि डिलाईट प्लॅटिनम वगळून एका कॅलेंडर वर्षात इंधनावरील अधिभारात कमाल सूट ₹३५००#. प्रायोरिटी लीग सिग्नेचर (मोफत व्हेरिएंट) आणि डिलाईट प्लॅटिनम यांच्यासाठी इंधन अधिभारात फक्त ₹४०० ते ₹४,००० पर्यंतच्या व्यवहारांसाठी सूट दिली जाईल. डिलाईट प्लॅटिनम आणि प्रीव्ही लीग सिग्नेचर (मोफत व्हेरिएंट) यांच्यासाठी इंधन अधिभारातील कमाल सूट ₹४,५०० वार्षिक एवढी आहे, तर प्रीव्ही लीग सिग्नेचर (सशुल्क व्हेरिएंट) साठी ती दरमहा ₹३०० एवढी आहे. सोलारिस क्रेडिट कार्डसाठी ₹४०० ते ₹३,५०० पर्यंतच्या सर्व व्यवहारांसाठी अधिभारात सूट देण्यात येईल. प्रत्येक कार्डखात्यासाठी प्रत्येक स्टेटमेंट सायकलसाठी परवानगी देण्यात आलेली अधिकतम सूट ₹१००/- एवढी आहे. कोटक बिझसाठी कमाल इंधन अधिभारातील सूट एका कॅलेंडर वर्षात ₹२,५०० एवढी आहे. ^ट्रंपचे नाव आता फीस्ट झालेले आहे. # प्रीव्ही लिग डिलाईट प्लॅटिनम क्रेडिट कार्डसाठी लागू असलेल्या आकारांसाठी कृपया डिलाईट प्लॅटिनम क्रेडिट कार्डसाठी लागू असलेले शुल्क आणि आकार पहा. वेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट, मर्यादा ओलांडल्याबद्दलचे शुल्क/कॅश पेमेंटसाठीचे आकार आणि कार्ड बदलून देण्यासाठीचे शुल्क यांमध्ये सूट देण्यात आलेली आहे. ##स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्सचे पालन न करता येणे (ऑटो डेबिट, एनएसीएच आणि ईसीएस). ^^प्रीव्ही लीग सिग्नेचरसाठी (सशुल्क व्हेरिएंट) आणि वेल्थ मॅनेजमेंट इन्फिनिट कार्डसाठी फोरेक्स मार्कअप २% आहे. ^^^कोणतीही एक अट पूर्ण करून ट्रू ऑप्टिमा की क्रायटेरिया पूर्ण करा : (१) बचत खात्यात किंवा चालू खात्यात ₹१ लाखांपेक्षा अधिक सरासरी मासिक शिल्लक रकमेसह (एएमबी) ₹३० लाखांची रिलेशनशिप व्हॅल्यू (२) बचत खात्यात १० लाखांपेक्षा अधिक एएमबी (३) चालू खात्यात १५ लाखांहून अधिक एएमबी. ###एनआरआय रोयाल सिग्नेचर, व्हाईट सिग्नेचर, प्रीव्ही लीग आणि वेल्थ मॅनेजमेंट कार्ड व्हेरिएंट्ससाठी इमेज कार्ड उपलब्ध नाही.####१५ जुलै २०२० पासून अ‍ॅक्का गोल्ड कार्डचे रिब्रँडिंग ८११ # ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्ड म्हणून करण्यात आलेले आहे. ####माय टीम इमेज कार्ड फक्त निवडक कार्ड व्हेरिएंट्ससाठी उपलब्ध आहे - ८११ # ड्रीम डिफरंट, रोयाल सिग्नेचर, लीग प्लॅटिनम, डिलाईट प्लॅटिनम, इसेन्शिया प्लॅटिनम आणि अर्बेन गोल्ड.

## घ.व्याजमुक्त कालावधी:

बिलिंग सायकलच्या तारखेपासून सुरू होणारा व्याजमुक्त कालावधी ४८ दिवसांपेक्षा अधिक नसेल. ५ मे २०१४ पासून तुमच्या कार्डवरील पेमेंटची देय तारीख विवरणाच्या तारखेनंतर १८ ते २१ दिवसांच्या दरम्यान असू शकेल (नेमक्या पेमेंट ड्यू डेटसाठी कृपया तुमचे विवरण (स्टेटमेंट) तपासून पहा). म्हणून क्रेडिटचा मोफत कालावधी तुमच्या पेमेंटच्या देय तारखेनुसार १८-४८ दिवस ते २१-५१ दिवस असा असू शकतो.

**व्याजमुक्त कालावधीची गणना करण्यासाठी उदाहरण:**

११ एप्रिल ते १० मे ह्या कालावधीच्या विवरणासाठी पेमेंटची देय तारीख २८ मे आहे. समजा, तुम्ही तुमच्या आधीच्या महिन्याचे देणेपूर्णत: दिलेले असेल, तर सवलतीचा कालावधी असेल:

दिनांक १२ एप्रिल रोजी केलेल्या खरेदीसाठी व्याजमुक्त सवलतीचा कालावधी १२ एप्रिल ते २८ मे = ४८ दिवस असेल आणि दिनांक २ मे रोजी केलेल्या खरेदीसाठी व्याजमुक्त सवलतीचा कालावधी २ मे ते २८ मे = २७ दिवस असेल.

परंतु, तुम्ही देय तारखेपूर्वी जर आधीच्या महिन्याची शिल्लक रक्कम पूर्णत: भरलेली नसेल, तर व्याजमुक्त कालावधी मिळणार नाही.

## ङ. अर्थपुरवठ्यासाठी आकार (व्याजासाठी आकार)

तुम्ही जर आधीच्या बिलाची रक्कम पूर्णत: किंवा देय तारखेपूर्वी भरली नाही, तर तुम्हाला दररोज भर पडणारे व्याज आकारले जाईल; व्यवहार केल्यापासून ते तो पूर्ण करीपर्यंत व्याज आकारले जाईल. कॅश ॲडव्हान्सेसवरील व्याज, गोल्ड फॉर्च्युन आणि ८११ ड्रीम डिफरंट कार्डधारकांचा अपवाद वगळून, व्यवहाराच्या तारखेपासून ते पूर्ण होईपर्यंत (सेटलमेंट) व्याज आकारले जाईल, कारण त्यांच्यासाठी सर्व कॅश ॲडव्हान्सेससाठी व्याजमुक्त कालावधीचा फायदा मिळतो. तुमचा खर्च, पेबॅक, वापर करण्याचा पॅटर्न यांनुसार व्याजदर ठरावीक कालावधीनंतर दरमहा ३.५% (वार्षिक ४२.०%) पर्यंत बदलण्याची/वाढण्याची शक्यता असते. पूर्ण पेमेंट जर देय तारखेनंतर परंतु पुढील विवरणाच्या तारखेच्या पूर्वी केले असेल, तरीही व्याज आकारले जाईल. तुम्ही काही अंशी पेमेंट करीत राहिलात, पण तुम्ही जर चालू विवरणातील बाकी रक्कम देय तारखेस किंवा त्यापूर्वी पूर्णत: केलेले असेल, तर पूर्ण पेमेंट मिळेपर्यंत एकूण येणे बाकी रकमेवर व्याज आकारले जाईल. अशा प्रकारे आकारलेले व्याज त्यानंतरच्या विवरणात प्रतिबिंबित होईल.

उदा. २० जूनच्या विवरणातील एकूण शिल्लक रक्कम ₹५०० आहे. पेमेंटची देय तारीख ८ जुलै आहे. य५००० चे पेमेंट १ जुलै रोजी केले. य५००० वरील १० दिवसांचे व्याज २० जुलैच्या विवरणात बिलिंग केले जाईल.

## च. व्याजाची गणना करण्याचे उदाहरण:

समजा, १५ मार्च रोजी केलेल्या खरेदीपैकी तुमच्याकडून य१०,००० येणे बाकी आहे. ३१ मार्च रोजी तयार करण्यात आलेल्या विवरणात येणे बाकी रक्कम य१०,००० दाखविण्यात येईल. १० एप्रिल रोजी तुम्ही य४,००० चे पेमेंट करता. आणि १० एप्रिल रोजी तुम्ही य२,००० ची खरेदी करता. तुम्ही त्यानंतर क्रेडिट कार्डवर ३० एप्रिलपर्यंत काहीही पेमेंट करीत नाही. अशा बाबतीत पुढीलप्रमाणे व्याज आकारले जाईल:

| |
|---|
| **दैनंदिन व्याजाचा दर= (३.४%)*१२/३६५ = ०.१११८%.** |
| य१०,००० शिल्लक रकमेवर(१५मार्च -३१मार्च) १७दिवसांसाठी= १००००*०.१११८%*१७= य१९०.०६ |
| य१०,००० शिल्लक रकमेवर (१एप्रिल-९एप्रिल) ९दिवसांसाठी= १००००*०.१११८%*९ = य १००.६ |
| य६,०००शिल्लक रकमेवर(१०एप्रिल- १४एप्रिल) ५दिवसांसाठी= ६०००*०.१११८%*५ = य३३.५४ |
| य८,००० शिल्लक रकमेवर (१५ एप्रिल - ३० एप्रिल) १६ दिवसांसाठी= ८०००*०.१११८%*१६ = य १४३.१० |
| आकारलेले एकूण व्याज = य ४६७.२४, एकूण येणे बाकी य८४६७.२४ |

वरील उदाहरणात एकूण देय रक्कम य८४६७.२४ सह विवरण तयार करण्यात आले. तुम्ही १५ मे रोजी य८४६७.२४ चे पेमेंट केले आणि मे महिन्यात काहीही खरेदी केली नाही. त्यानंतर पुढील महिन्यात ३१ मे रोजी तयार करण्यात आलेल्या विवरणात तुम्हाला य१३२.५१ एवढे व्याज आकारले जाईल. (य८४६७.२४ एवढ्या शिल्लक रकमेवर) (१ मे - १४ मे) १४ दिवसांसाठी = ८४६७.२४*०.१११८%*१४=१३२.५३)

वरील उदाहरणात सरकारी करांचा (सेवाकर, जीएसटी, वेळोवेळी लागू असलेले कोणतेही/सर्व लागू असलेले कर यांच्यासह) समावेश नाही. वरील उदाहरण दरमहा ३.४% एवढ्या फिरत्या व्याजदरासाठी लागू आहे आणि कार्ड व्हेरिएंटनुसार व्याज बदलू शकते.

**टीप:** तुम्ही जर य५,००० खर्च केला आणि तुम्ही दरमहा नेमकी किमान देय रक्कम (**''एमएडी''**) भरली आणि त्यानंतर ४ वर्षांच्या कालावधीपर्यंत परतफेड करीत राहिलात (एमएडीसह केलेली गणना १०%) व परिणामस्वरूपी थकीत रकमेवर व्याज भरले. असा सल्ला दिला जातो की, जेव्हा तुमच्याकडे रोख रक्कम उपलब्ध होईल, तेव्हा एमएडीपेक्षा बरीच मोठी रक्कम बँकेत भरणा करावी. पेमेंटच्या देय तारखेनंतरही एमएडी भरणा केलेली नसेल, तर **विलंब देय आकार** लागू होतील.

## २. क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा

क्रेडिट लिमिट म्हणजे तुम्हाला तुमच्या क्रेडिट कार्डवर जास्तीतजास्त किती खर्च करण्याचा अधिकार आहे ती मर्यादा. कार्डसाठी अर्ज करताना तुम्ही आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्याचा पर्याय निवडू शकता, आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठीचे क्रेडिट लिमिट हे जास्तीतजास्त मयदिएवढेच असेल. प्रत्येक महिन्याचे विवरण तयार करतानाचे क्रेडिट लिमिट या विवरणाचा एक भाग म्हणून पुरविले जाते. कार्डची डिलिव्हरी देताना तुम्हाला क्रेडिट आणि कॅश विथड्रॉवल लिमिट तुम्हाला कळविले जातात. कॅश लिमिट हे तुमच्या क्रेडिट लिमिटचाच एक भाग आहे. बँक तुमच्या खात्याचे ठरावीक कालावधीनंतर पुनरावलोकन करील आणि अंतर्गत निकषांवर आधारित तुम्हाला पूर्वसूचना न देता तुमचे क्रेडिट लिमिट कमी करू शकते. जर तुम्हाला तुमचे क्रेडिट लिमिट वाढवून घेण्याची इच्छा असेल, तर तुम्ही तसे बँकेला लिहून कळवून आणि तुमचे उत्पन्न घोषित करणारी आर्थिक कागदपत्रे पुरवून करू शकता. तुम्हाला जर आंतरराष्ट्रीय व्यवहार निष्क्रिय करावयाचे असतील किंवा क्रेडिट लिमिट वाढवायचे/कमी करावयाचे असेल, तर तुम्ही त्यासाठी बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राशी संपर्क साधू शकता. क्रेडिट लिमिट वाढवायच्या तुमच्या विशिष्ट विनंतीच्या आधारे बँक स्वत:च्या विवेकाधिकारात लिमिटमध्ये वाढ करण्याचा विचार करू शकेल.

## ३. बिल पेमेंटसाठी तुमचा मार्गदर्शक

### क. तुमचे विवरण (स्टेटमेंट)

महिन्यासाठीचे पेमेंट्स आणि ट्रँझॅक्शन्स दाखविणारे मासिक विवरण बँक तुम्हाला पाठवील. जर येणे बाकी असलेली रक्कम य१०० पेक्षा कमी असेल आणि कार्डखात्यात कोणताही व्यवहार केलेला नसेल, तर विवरण तयार करण्यात/पाठविण्यात येणार नाही. असे विवरण तुमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष प्रतीच्या माध्यमातून किंवा आमच्याकडे उपलब्ध नोंदीनुसार असलेल्या ईमेल पत्त्यावर ईमेलद्वारे पाठविण्यात येईल. कोटक एनआरआय कार्डधारकांना असे विवरण फक्त ईमेलद्वारे प्राप्त होईल. विवरण प्राप्त झाले नाही म्हणून कार्डधारक करारामधील तुमचे दायित्व आणि जबाबदारी यांवर परिणाम होणार नाही आणि तुम्ही पेमेंटच्या देय तािरखेपूर्वी किमान देय रक्कम भरण्यास जबाबदार असाल.

### ख. तुम्हाला किती रक्कम भरावयाची आहे ते निवडा

जर पेमेंटच्या देय तारखेपर्वी तुमच्याकडून निदान किमान देय रकमेचे पेमेंट प्राप्त झाले, तर तुम्हाला लेट पेमेंट चार्जेस भरावे लागणार नाहीत. जर आधीच्या विवरणातील काही एमएडी दिलेली नसेल, तर ती चाल एमएडीमध्ये जोडली जाऊ शकते. जर एकूण येणे रक्कम ही क्रेडिट लिमिटपेक्षा अधिक असेल, तर जेवढ्या रकमेने मर्यादा ओलांडलेली आहे, तीही एमएडीमध्ये समाविष्ट केली जाईल. तुम्ही जर ''एकूण रक्कम'' भरण्याचा पर्याय निवडला, तर तुम्हाला व्याज लावले जाणार नाही. व्याज भरणे टाळण्यासाठी तुम्ही देय असलेली एकूण रक्कम भरावी असा सल्ला आम्ही देतो.

### ग. पेमेंट्स

कार्डच्या येणे रकमेसाठी तुमच्याकडून प्राप्त झालेली पेमेंट्स सर्व कर, शुल्क आणि इतर आकार, व्याजआकार, मासिक हप्ते, कॅश ॲडव्हान्सेस, खरेदी आणि त्याप्रमाणे शिल्लक रकमेचे हस्तांतरण यांसाठी समायोजित केली जाईल. सर्व पेमेंट्स तुम्ही भारतीय रुपयांमध्येच केली पाहिजेत.

### घ. पेमेंट करण्याची पद्धत

१) **स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्सच्या माध्यमातून (ऑटो डेबिट) पैसे भरा:** जर कार्डधारकाचे बँकेत खाते असेल, तर तो अशा खात्यातून प्रत्येक महिन्याला पेमेंटच्या देय तारखेस पैसे वजा करण्यासाठी लेखी स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स देऊन बचत खात्यातून थेट रक्कम भरू शकेल. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारकासाठी किमान देय रकमेसाठी ऑटो डेबिट इन्स्ट्रक्शन्स देणे अनिवार्य आहे.

२) **ऑनलाईन पैसे भरा:** कार्डधारकाचे जर बँकेत खाते असेल, तर तो त्याच्या इंटरनेट बँकिंग पासवर्डचा उपयोग करून त्याचे क्रेडिट कार्डचे बिल ु.ज्ञोंरज्ञ.लो वर ऑनलाईन भरू शकेल.

३) **इतर कोणत्याही बँकेतील तुमच्या बचत खात्यातून ऑनलाईन पेमेंट करण्यासाठी:** इतर कोणत्याही बँकेतील तुमच्या खात्यातून/खात्यांतून नेट बँकिंगच्या/वेबपेच्या माध्यमातून किंवा बँकेने सक्रिय केलेल्या इतर मार्गांनीसुद्धा क्रेडिट कार्डची येणे रक्कम भरता येऊ शकेल.

४) **शाखांमध्ये रोख रकमेद्वारे पैसे भरा:** ठरवून दिलेल्या ठिकाणांवर कामकाजाच्या वेळेत कार्डधारक रोख रक्कम भरून बिलाचे पैसे भरू शकेल. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक त्यांच्या क्रेडिट कार्डच्या बिलाचे पैसे शाखांमध्ये रोख रक्कम भरून करू शकणार नाहीत. लागू असलेल्या आकारांसाठी, कृपया वर उल्लेख केलेले तपशील पहा.

५) **चेक किंवा डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून पैसे भरा:** ''कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्ड XXXX XXXX XXXX XXXX'' या नावाने चेक किंवा ड्राफ्ट तयार करा आणि तो एटीएममध्ये किंवा पार्टनर ड्रॉप बॉक्सेसमध्ये टाका. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक सर्व पेमेंट्स फक्त त्यांच्या एनआरई/एनआरओ खात्यातूनच करू शकतील.

व्हिजा क्रेडिट कार्ड पेमेंट, इंटर बँक मोबाईल पेमेंट सर्व्हिसेस यांसारख्या पेमेंटच्या इतर पद्धतींविषयी तपशीलवार माहिती मिळविण्यासाठी आणि अधिक जाणून घेण्यासाठी **www.kotak.com** ला भेट द्या.

### ङ. बिलांविषयी तक्रारींचे निवारण

जर कार्डधारकाने क्रेडिट कार्डचे पेमेंट कोटक महिंद्रा बँकेऐवजी दुसरकया बँकेच्या माध्यमातून केले, आणि त्याने क्रेडिट कार्डसाठी केलेल्या जादा पेमेंटचा परतावा देण्यासाठी विनंती केली, तर कार्डधारकाला त्याने केलेल्या शेवटच्या दोन पेमेंटचे बँक खात्याचे विवरण सादर करावे लागेल.

विवरणात दाखविलेले आकार जर कार्डधारकाला मान्य नसतील, तर त्याविषयी विवरण प्राप्त झाल्यापासून कोटक महिंद्रा बँकेच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात ६० (साठ) दिवसांच्या आत कळविले पाहिजे; असे न केल्यास विवरणात दाखविलेले सर्व आकार योग्य आहेत आणि तुम्हाला ते स्वीकारार्ह आहेत असे समजण्यात येईल. कृपया नोंद घ्या की, आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या बाबतीत जर तुमचा काही वाद असेल, तर तुम्ही तुमच्या पासपोर्टची प्रत दिलीच पाहिजे.

कार्डधारकाने जर क्रेडिट कार्डसाठी जास्तीचे पेमेंट केले असेल, तर त्याचा परतावा फक्त क्रेडिट कार्डच्या खात्यातच दिला जाईल. जर क्रेडिट कार्ड रद्द करण्यात आलेले असेल, तर काही जास्तीचे पैसे असतील, तर ते ग्राहकाच्या बचत खात्यातच पाठविण्यात येतील.

## ४. ग्राहकसंपर्क केंद्र

आमच्याशी केलेल्या सर्व पत्रव्यवहारामध्ये कृपया तुमचा १६ अंकी कोटक क्रेडिट कार्ड क्रमांक दर्शवा. तुम्ही बँकेशी खालीलपैकी कोणत्याही एका मार्गाने संपर्क साधू शकता.

(क) आमच्या २४ तास उपलब्ध असलेल्या **१८०० २६६ २६६६** ह्या ग्राहकसेवा केंद्राच्या क्रमांकावर कॉल करून (स्थानिक कॉलदर लागू). प्रीव्ही लीग ग्राहक **१८०० २६६ २६६६** ह्या क्रमांकावर (टोल-फ्री) कॉल करू शकतात. दूरध्वनी क्रमांकांचे तपशील **ु.ज्ञोंरज्ञ.लो** वर उपलब्ध आहेत. (ख) **ु.ज्ञोंरज्ञ.लो** वर लॉग इन करून किंवा तुमच्या इंटरनेट बँकिंग खात्याच्या माध्यमातून. (ग) कुरिअरच्या माध्यमातून - द सर्व्हिस मॅनेजर, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, ३रा मजला, आकृती एसएमसी, लाल बहादूर शास्त्री मार्ग, खोपट, ठाणे (प.), महाराष्ट्र - ४००६०१, भारत. (घ) नेहमीच्या पोस्टाद्वारे: कोटक महिंद्रा बँक लि., कोटक क्रेडिट कार्ड्स पोस्ट बॉक्स क्र. २७७०३, मालाड (पूर्व), मुंबई - ४०००९७, भारत.

## ५. तक्रारनिवारण/तक्रारी/तक्रारी वरच्या पातळीवर नेणे

असे घडण्याची शक्यता नाही, पण तरीही तुम्ही जर आमच्या सेवांविषयी समाधानी नसलात, तर तुम्ही तुमची तक्रार या पद्थतीने नोंदवू शकाल: (१)**www.kotak.com** वरील ''तक्रार अर्ज'' भरून (२) ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करून (३) सर्व्हिस मॅनेजर-सर्व्हिस ऑपरेशन्स यांना लिहून (४) तक्रार वरच्या पातळीवर नेण्यासाठी तुम्ही **एम. राजू,** नोडल ऑफिसर, क्रेडिट कार्ड्स डिव्हिजन यांना पेवरश्रेषठळलशी७ज्ञोंरज्ञ.लोवर लिहून कळवू शकता. जर तुमची तक्रार बँकेत प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवारण केली गेली नाही, तर ती तक्रार बँकेच्या लोकायुक्तांकडे (बँकिंग ओंबूड्समन) यांच्याकडे पुढे पाठवता येईल. तुमच्या ठिकाणासाठीच्या बँकिंग ओंबूड्समनचे (लोकपाल) तपशील शाखांमध्ये प्रदर्शित करण्यात आलेले आहेत.

## ६. परतफेडीतील कुचराई

कार्डधारकाने जर निदान देय असलेली किमान रक्कम भरली नाही, तर कार्डधारकाला/कांना त्यांची देय रक्कम भरण्यासाठी त्यानंतर प्रत्येक

विवरणात आठवण करून दिली जाईल. ६ महिन्यांपेक्षा अधिक काळ रक्कम थकीत राहिल्यास कार्डधारकाला 'विलफूल डिफॉल्टर' म्हणून घोषित करण्यात येईल. कुचराई झाल्यास त्यासाठीचा पाठपुरावा टपालाद्वारे, फॅक्स आणि दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक मेल, एसएमएस संदेश आणि/किंवा तृतीय पक्षांना पाठवपुरावा करून थकीत रक्कम वसूल करणे अशा माध्यमातून केला जाईल. बँक आणि अशा प्रकारे नियुक्त केलेला तृतीय पक्ष, क्रेडिट कार्ड ऑपरेशन्स अँड कलेक्शन ऑफ ड्यूज अँड रिपझेशन ऑफ सेक्युरिटी पॉलिसी यासाठी असलेली वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या बँकेच्या आदर्श आचार संहितेचे पालन करील. कुचराईच्या बाबतीतील माहिती मिळालेले कोणतेही प्रकरण मागे घेण्याचा बँकेला अधिकार असेल, जर:

- अशा कुचराई करणाऱ्याने त्याच्याकडून येणे असणारी संपूर्ण रक्कम बँकेकडे भरली किंवा त्याची देय रक्कम बँकेकडे वळती केली.
- बँकेला न्यायालयाकडून असा आदेश प्राप्त झालेला असेल ज्यात न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात कार्डधारकाचे नाव वगळण्यास सांगितले असेल. वैयक्तिक पुनरावलोकन केल्याच्या आधारे प्रत्येक प्रकरणानुसार निर्णय घेतला जाईल.
- उपरोक्त परिस्थितीत कार्डधारकाच्या नोंदी पुढील महिन्याच्या रिफ्रेशमध्ये क्रेडिट ब्युरोकडे 'करंट' म्हणून अद्ययावत केल्या जातील.

जर कार्डधारकाचा मृत्यू झाला किंवा त्याला अपंगत्व आले, तर बँक तिच्या विवेकाधिकारात कार्डखात्या/त्यांतून येणे बाकी असलेली रक्कम वसूल करण्यासाठी उपलब्ध असलेले सर्व कायदेशीर आणि इक्विटीशी संबंधित सर्व मार्ग अवलंबील, ज्यात लागू असलेल्या कोणत्याही विमा संरक्षणाच्या रकमेतून किंवा कार्डधारकाचे वारस/एक्झिक्युटर्स/अॅडमिनिस्ट्रेटर्स यांच्याकडून कार्डची येणे रक्कम वसूल करण्याचा समावेश होतो.

कार्ड जर हरवले किंवा चोरीला गेले, तर अनधिकृत वापरापासून कार्डधारकाला संरक्षण पुरविण्यात आलेले आहे, ज्यात प्रत्येक वर्षासाठी सिल्व्हर कार्डकरिता य२५,०००, गोल्ड कार्डसाठी य१,००,०००, प्लॅटिनम कार्डसाठी य१,२५,०००, सिग्नेचर कार्डसाठी य२,५०,००० आणि प्रिमिअम कार्डसाठी य१०,००,००० रकमेचा विमा घेतलेला असतो. विम्याच्या संरक्षणासंबंधीचे तपशीलवार स्पष्टीकरण www.kotak.com वर देण्यात आलेले आहे.

## ७. कार्डधारणा खंडित करणे/मागे घेणे

कार्डधारक त्याची क्रेडिट कार्डची सुविधा लेखी विनंती देऊन किंवा बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करून कोणत्याही वेळी खंडित करण्याचा पर्याय निवडू शकेल आणि कार्डचे कणरिषेत दोन तुकडे करू शकेल. तुमच्याकडून येणे बाकी असलेली रक्कम तात्काळ देय बनेल. क्रेडिट कार्डचा वापर जर १५० दिवसापेक्षा आधिक काळ कधीही केला नसेल, तर सुरक्षिततेच्या कारणास्तव कार्ड तात्पुरत्या स्वरूपात ब्लॉक करण्यात येऊ शकेल.

कोटक महिंद्रा बँकेला जर रास्तपणे असे वाटले की, व्यवसायाच्या दृष्टीने किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव कार्डचा उपयोग करणे रद्द करणे आवश्यक आहे - ज्यात तुम्ही पेमेंटसाठी केलेला विलंब, क्रेडिट लिमिटची मर्यादा ओलांडणे किंवा चेक न वटणे यांचा समावेश आहे - तर बँक कार्डचा उपयोग रद्द करू शकेल.

## ८. कार्ड गहाळ होणे/चोरी होणे

- कार्ड गहाळ झाल्यास कार्डधारकाने ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करून बँकेला तात्काळ कळविले पाहिजे. कार्डधारकाने विनंती केल्यास कार्डचा दुरुपयोग होऊ नये म्हणून बँक तात्काळ कार्ड निष्क्रिय करण्याचा प्रयत्न करील. कार्डधारकाने पोलिसांकडे पहिली खबर (एफआरआय) नोंदवलीच पाहिजे. परंतु जेव्हा कोणीतरी कार्डधारकाच्या किंवा अॅड-ऑन कार्डधारकाच्या संमतीने/संमतीशिवाय कार्डधारकाच्या पिनचा गैरवापर केला किंवा कार्डधारकाने फसवणुकीचे व्यवहार केले किंवा पुरेशी काळजी घेतली नाही, तर कार्डधारक सर्व नुकसानासाठी जबाबदार असेल.
- तुम्ही कार्ड गहाळ झाल्याबद्दल कोटक महिंद्रा बँकेला कळविल्यानंतर, तुम्ही सरसकट निष्काळजीपणा केलेला नसेल, तर कार्डच्या दुरुपयोगासाठी तुम्ही जबाबदार नसाल.
- ग्राहकाकडून देय असलेली रक्कम जर मर्चंटने आकारली - मग तिच्याविषयी ग्राहकाने वाद उभा केलेला असो वा नसो - तर ग्राहकाला लागू असलेल्या बिलिंग सायकलनुसार ग्राहक बँकेला पेमेंट करण्यास जबाबदार असेल. त्याव्यतिरिक्त, बँकेने जर पेमेंट केलेले असेल, तर ती रक्कम ग्राहकाकडून वसूल करण्याचा बँकेला अधिकार असेल. शिवाय, रकमेविषयी वाद असल्यास, ग्राहकाला बिलिंग सायकलनुसार तिचे पेमेंट करावे लागेल आणि वादाचा निकाल/परिणाम काय लागतो ह्याची प्रतीक्षा करता येणार नाही. ग्राहकाचे बँकेबरोबरचे विद्यमान संबंध संपलेले आहेत आणि/किंवा कोणत्याही कारणामुळे कार्ड निलंबित/बंद करण्यात आलेले आहे, हे विचारात न घेता, बँकेचा वसूल करण्याचा अधिकार आणि ग्राहकाची पेमेंट करण्याची जबाबदारी वैध आणि अस्तित्वात राहील.

## ९. अस्वीकृती

कार्डधारक कबूल करतात की, विद्यमान व्यवसायाच्या नीतीनुसार बँकेला क्रेडिट कार्डसंबंधीची माहिती कोणत्याही क्रेडिट ब्युरोला (सध्याच्या किंवा भविष्यातील) ग्राहकाला कोणतीही सूचना न देता उघड करण्याचा अधिकार आहे. क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो ऑफ इंडिया (सिबिल) आणि इतर क्रेडिट ब्युरोज् हे आर्थिक प्रणालीची कार्यपद्धती सुधारण्यासाठी आणि तिच्या स्थैर्यासाठी असलेले भारत सरकारचे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे उपक्रम आहेत. कार्ड अकाऊंटशी संबंधित थकीत पेमेंटविषयीची ताजी/अद्ययावत माहिती, बँकेला पेमेंट प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत सिबिल/इतर क्रेडिट ब्युरोंकडे प्रतिबिंबित होईल. आम्ही कार्डधारकांना अशीही माहिती देऊ इच्छितो की, बँक स्वत:च्या विवेकाधिकारात बँकेला योग्य वाटेल असे कार्डधारक आणि बँकेचे प्रतिनिधी यांच्यातील विशिष्ट संभाषण, जर ते संभाषण तक्रारीशी किंवा पेमेंट वसूल करण्याशी संबंधित असेल तर रेकॉर्ड करील.

# कार्डधारकासाठी करार

## (नियम व अटी)

ग्राहक हे मान्य करतो/ते की, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून सेवा प्राप्त करणे हे पुढील नियम व अटींच्या, तसेच बँकेने वेळोवेळी जारी केलेले बँकेचे सर्वसाधारण नियम व अटी आणि खात्यांसाठीचे व सेवांसाठीचे नियम आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने (''आरबीआय'') किंवा कोणत्याही नियामक प्राधिकरणाने वेळोवेळी केलेले नियम व नियमावली किंवा सुधारणा (''नियम व नियमावली'') यांच्या अधीन आहे.

खाली दिलेले नियम हे, कोणत्याही विशिष्ट कार्डसाठी असलेल्या खास नियमांचा अपवाद वगळता, क्रेडिट कार्डच्या सर्व व्हेरिएंट्सना लागू होतील.

**१. व्याख्या**

१.१. ''खाते'' म्हणजे सर्वसाधारण नियम व अटींच्या आणि खाती आणि सेवा यांच्यासाठीच्या नियमांच्या अंतर्गत बँकेकडे असलेले खाते.

१.२. ''अर्जदार'' म्हणजे: (१) कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्डसाठीच्या अर्जावर सही केलेली कोणतीही व्यक्ती (२) कार्डवर सही केलेली किंवा त्याचा वापर केलेली कोणतीही व्यक्ती.

१.३. ''ॲड-ऑन कार्ड'' म्हणजे प्रायमरी कार्डधारकाने नामनिर्देर्शित केलेल्या व्यक्तीला देण्यात आलेले अतिरिक्त कार्ड.

१.४. ''ॲड-ऑन कार्डधारक'' म्हणजे ज्या व्यक्तीस ॲड-ऑन कार्ड देण्यात आलेले आहे ती व्यक्ती आणि त्याअंतर्गतची देणी देण्याची जबाबदारी ही प्रायमरी कार्डधारकाची असते.

१.५. ''अधिकृत वितरक'' म्हणजे परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ (''फेमा'') अंतर्गत दिलेल्या व्याख्येनुसार परकीय चलनाशी किंवा परकीय प्रतिभूतींशी संबंधित व्यवहार करण्याचे अधिकार देण्यात आलेली व्यक्ती किंवा ऑफशोअर बँकिंग युनिट

१.६. ''कार्ड/क्रेडिट कार्ड'' म्हणजे कार्डधारकाला बँकेकडून देण्यात आलेले ग्लोबल क्रेडिट कार्ड, ज्यात गोल्ड कॉर्पोरेट, बिझिने, प्लॅटिनम आणि सिग्नेचर क्रेडिट कार्ड्स आणि बँकेने ॲड-ऑन कार्डसह वेळोवेळी दिली जाऊ शकतील अशी इतर कार्ड्स यांचा समावेश आहे.

१.७. ''कार्डखाते/क्रेडिट कार्डखाते'' म्हणजे कार्डचा वापर करून व्यवहार करण्यासाठी व त्याचवेळी कार्ड देऊन बँकेत उघडलेले/ली आणि चालू ठेवलेले/ली कोणतेही/कोणतीही पात्र खाते/खाती.

१.८. ''कार्ड खात्याचे विवरण'' म्हणजे बँकेने ठरावीक कालावधीनंतर प्रमुख (प्रायमरी) कार्डधारकाला पाठविलेले विवरण, ज्यात कार्डखात्यातील जमा आणि नावे रक्कम दर्शविलेली असते.

१.९. ''कार्डधारक'' म्हणजे या नियम व अटींच्या अंतर्गत ज्या ग्राहकाला कार्ड देण्यात आलेला आहे तो, ज्यात ॲड-ऑन कार्डधारकाचाही समावेश आहे.

१.१०. ''रोख रकमेची मर्यादा'' म्हणजे कार्डधारक किंवा ॲड-ऑन कार्डधारक त्याच्या कार्डखात्यातून जेवढी रक्कम काढू शकतो ती बँकेने ठरवून दिलेली किंवा निर्धारित केलेली कमाल रोख रक्कम किंवा तेवढ्या रकमेच्या मूल्याची रक्कम. ही मर्यादा म्हणजे कार्डधारकाच्या क्रेडिट लिमिटचाच एक भाग असेल.

१.११. ''क्रेडिट लिमिट'' म्हणजे विशिष्ट कार्डधारकाला बँकेने केलेल्या मूल्यमापनानंतर देण्यात येणारी कमाल पतमर्यादा आणि जी कार्डखात्याला जोडली जाते. जर कार्डधारकाकडे २ किंवा त्यापेक्षा अधिक कोटक क्रेडिट कार्ड्स असतील, तर सर्व क्रेडिट कार्ड्सची मिळून एकूण पतमर्यादा ही प्रत्येक क्रेडिट कार्डसाठी देण्यात आलेली जी स्वतंत्र मर्यादा सर्वाधिक असेल ती असेल, उदाहरणार्थ, जर एका कार्डसाठी य१ लाखांची मर्यादा असेल आणि दुसऱ्या कार्डसाठी य१.५ लाखांची मर्यादा असेल, तर दोन्ही कार्डसाठीची पतमर्यादा ही य१.५ लाख एवढीच असेल.

१.१२. ''डेलिंक्वंट अकाऊंट'' म्हणजे कार्डधारकाचे खाते, मागील थकबाकी असते आणि बँकेच्या मते त्याची पत (क्रेडिट स्टँडिंग) असमाधानकारक असते.

१.१३. ''ईडीसी'' म्हणजे कोणतेही इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर टर्मिन्स, प्रिंटर्स, इतर पेरिफेरल्स आणि ॲक्सेसरिज् ज्यांमध्ये पिन पॅड्स आणि सॉफ्टवेअर चालण्यासाठी आवश्यक असलेली डिव्हाईसेस यांचा समावेश आहे, मग ती भारतात असोत वा परदेशात, ती बँकेची असोत वा शअर्ड नेटवर्कची असोत, ज्यांचा उपयोग इतर गोष्टींबरोबरच, कार्डधारक बँकेने त्याला दिलेल्या कार्डचा उपयोग करून मर्चंट एस्टॅब्लिशमेंटमध्ये व्यवहार करण्यासाठी करता येईल.

१.१४. ‘‘इलेक्ट्रॉनिक मीडिया’’ म्हणजे इतर बाबींबरोबरच एटीएमज्, फोन (ज्यात फॅक्सचाही समावेश आहे), मोबाईल, इंटरनेट आटि पीओएस.

१.१५. ‘‘एक्झिम’’ म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेले भारताचे आयात निर्यात धोरण, ज्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणांचाही समावेश होतो.

१.१६. ‘‘आंतरराष्ट्रीय व्यवहार’’ म्हणजे कार्डधारकाने त्याचे कार्ड वापरून भारत, नेपाळ आणि भूतान देशांच्या बाहेर केलेले व्यवहार (ट्रँझॅक्शन्स).

१.१७. ‘‘कोटक महिंद्रा बँक’’ किंवा ‘‘बँक’’ किंवा ‘‘द बँक’’ किंवा ‘‘केएमबी’’ किंवा ‘‘आम्ही’’ किंवा ‘‘आम्हाला’’ किंवा ‘‘आमचे’’ म्हणजे कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, जी कंपनी कायदा, १५६च्या अंतर्गत संस्थापित झालेली असून तिचे नोंदणीकृत कार्यालय २७ बीकेसी,

सी २७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई - ४०० ०५१, भारत येथे आहे आणि त्यात, यातील मजकुराशी विरोधाभासी नसेल, तर त्यांचे प्रतिनिधी, वारस आणि अभिहस्तांकिती (असायनी) यांचा समावेश होतो.

१.१८. मर्चंट’’/मर्चंट एस्टॅब्लिशमेंट’’/पार्टिसिपेटिंग मर्चंट एस्टॅब्लिशमेंट’’ (पीएमई) म्हणजे कोणत्याही ठिकाणी असलेली कोणतीही आस्थापना, जिला बँकेने आणि/किंवा इतर व्हिजा/मास्टरकार्ड/रुपे सभासद बँकांनी मान्यता दिलेली असेल आणि त्यांच्याबरोबर कार्डधारकांना वस्तू आणि सेवा विकण्यासाठी कार्ड्स स्वीकारण्याची आणि ऑनर करण्याची व्यवस्था केलेली असते, ज्यात इतर बाबींबरोबरच बँकेने, व्हिजा इंटरनॅशनलने किंवा कार्ड्स ऑनर करणाऱ्या मर्चंट यांनी जाहिरात केलेले स्टोअर्स, शॉप्स, रेस्टॉरंट्स, एअरलाईन्स, यांचा समावेश होतो. त्याचा अर्थ, बँकेने वेळोवेळी जाहीर केलेली, कोणत्याही ठिकाणी असलेली कंपनी, कॉर्पोरेशन, आस्थापना, फर्म, व्यक्तींची संस्था किंवा व्यक्ती किंवा कोणतीही संस्था (एंटीटी), ज्यांच्यासोबत कार्डधारकांना सेवा देण्यासाठी बँकेने व्यवस्था केलेली असेल.

१.१९. ‘‘पार्टिसिपेटिंग एटीएमज्’’, ‘‘पीए’’ किंवा ‘‘एटीएमज्’’ यांमध्ये बँकेच्या ऑटोमेटेड टेलर मशिन्स (एटीएम्ज) आणि इतर बँकांच्या मालकीची एटीएमज्, जी व्हिजा/मास्टरकार्ड/रुपे यांच्या शेअर्ड पेमेंट नेटवर्कमध्ये सहभागी होत आहेत आणि ज्यांचा उपयोग कार्डधारक करू शकतो.

१.२०. ‘‘पिन’’ किंवा पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर म्हणजे आणि त्यात समाविष्ट आहे यादृच्छिकपणे जनरेट झालेला कोणताही गुप्त आणि गोपनीय कोड, जो बँकेने कार्डच्या संबंधात कार्डधारकाला बहाल केला जातो आणि/किंवा त्यात त्यानंतर कार्डधारकाद्वारे त्याच्या इच्छेनुसार बदल केला जातो.

१.२१. ‘‘पीओएस’’ म्हणजे पॉईंट ऑफ सेल टर्मिनल, मग भारतातील असोत वा परदेशातील, या बँकेची असोत वा शेअर्ड नेटवर्कची असोत, ज्यांमध्ये इतर बाबींबरोबरच, कार्डधारक त्याच्या कार्डचा उपयोग बँकेत असलेल्या कार्डखात्यातील निधीचा वापर करण्यासाठी करू शकतो.

१.२२. ‘‘प्रायमरी कार्डधारक’’ म्हणजे बँकेने ज्या अर्जदाराच्या नावाने खाते उघडलेले आहे असा कार्डधारक.

१.२३. ‘‘प्रायमरी कार्ड’’ म्हणजे प्रायमरी कार्डधारकाला देण्यात आलेले कोटक महिंद्रा बँक ग्लोबल क्रेडिट कार्ड.

१.२४. ‘‘रिवॉर्ड प्रोग्रॅम’’ म्हणजे यातील कलम २७ मध्ये तपशीलवार उल्लेख केलेला कोटक महिंद्रा बँक रिवॉर्ड प्रोग्रॅम.

१.२५. ‘‘सेल्स स्लीप’’/‘‘चार्ज स्लीप’’ म्हणजे मर्चंट टर्मिनल किंवा पीएमई यांच्याद्वारे जनरेट केलेली स्लीप, जिच्यामध्ये कार्डधारकाने पीए/पीएमई/टर्मिनल्सवर केलेल्या व्यवहाराचे/रांचे मूल्य दर्शविलेले असते आणि ती कार्डधारकाने स्वत:कडे ठेवायची असते.

१.२६. ‘‘टर्मिनल’’ मध्ये, पीएमईच्या ठिकाणी असलेले सर्व सॉफ्टवेअर, पेरिफेरल्स आणि ॲक्सेरिज् यांचा समावेश होतो, ज्यांची आवश्यकता कार्डधारकाच्या व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी असलेली उपकरणे चालविण्यासाठी असते व त्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर (ईडीसी) टर्मिनल्स, व्हिजा/मास्टर कार्ड/रुपे टर्मिनल्स, प्रिंटर्स, पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (पिन) पॅड्स यांचा समावेश होतो.

१.२७. ‘‘ट्रँझॅक्शन’’ (व्यवहार) म्हणजे कार्डधारकाने त्याच्या कार्डचा उपयोग करून एटीएम किंवा पीएमईवर किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कार्डखाते ॲक्सेस करून व्यवहार करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बँकेला दिलेल्या कोणत्याही सूचना.

‘‘व्हॅलिड चार्ज’’ (वैध आकार) म्हणजे कार्डधारकाला कार्ड धारण केल्याबद्दल लागू असलेला आणि आकारला जात असलेला आकार आणि रिवॉर्ड पॉईंट्स देण्यासाठी फक्त असा वैध आकारच विचारात घेतला पाहिजे.

१.२८. ‘‘व्हिजा’’ किंवा ‘‘व्हिजा इलेक्ट्रॉन’’ चा अर्थ असेल व्हिजा इंटरनॅशनलच्या मालकीचा मार्क.

१.२९. ‘‘व्हिजा/प्लस एटीएम नेटवर्क’’चा अर्थ असेल, भारतात आणि परदेशात असलेले एटीएम, जेथे व्हिजा/व्हिजा प्लस किंवा व्हिजा इलेक्ट्रॉन सिंबॉल दर्शवीत असून जेथे कार्ड ऑनर केले जाते.

१.३०. ‘‘मास्टरकार्ड’’ किंवा ‘‘मास्टरकार्ड इलेक्ट्रॉनिक’’ किंवा ‘‘मेस्ट्रो’’ किंवा शेअर्ड नेटवर्क येथे, इतर बाबींबरोबरच, ‘‘सिरस’’ म्हणजे मास्टर कार्ड इंटरनॅशनलच्या मालकीचे मार्क्स.

## २. कार्डचा वापर:

२.१. कार्डधारकाला हे समजते की, क्रेडिट कार्डसाठीच्या अर्जावर सही करून आणि/किंवा कार्डसाठी ऑनलाईन अर्ज करून आणि/किंवा कार्डसाठी ई-मेलद्वारे अर्ज करून आणि/किंवा कार्डच्या मागच्या बाजूवर सही करून आणि/किंवा कार्डचा वापर करण्याने, बँकेने स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात वेळोवेळी सुधारणा केलेल्या कार्डधारक करारातील नियम व अटी कार्डधारकाने स्वीकारलेल्या आहेत हे स्थापित होते.

२.२. हे कार्ड फक्त बँकेने परवानगी दिलेल्या भारतातील आणि परदेशातील पीए/पीएमई/इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि टर्मिनल्स तसेच बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या पेमेंटच्या इतर पद्धती यांसाठीच स्वीकारार्ह असेल.

२.३. वस्तू किंवा सेवा खरेदी केल्याचे मूल्य, रोख रक्कम, शुल्क, आकार, व्याज, कर आणि कार्डचा वापर करून देय असलेली पेमेंट्स यासाठी बँक कार्डधारकाच्याखात्यातील पैसे वजा करील. कार्डखात्याशी/खात्यांशी संबंधित खातेविवरणात सर्व व्यवहार प्रतिबिंबित होतील. अशा प्रकारची कार्डखात्याची विवरणे कार्डधारकाला प्रत्येक महिन्याला बँकेने ठरवून दिलेल्या किंवा कार्डधारकाने निवडलेल्या आणि बँकेकडे नमूद केलेल्या मार्गांनी पाठविले जाईल.

२.४. व्यवहार केल्याच्या तारखेपासून सामान्यत: ३० दिवसांच्या आत बँक कार्डधारकाच्या खात्यातून वजा करील.

२.५. जर कार्डधारकाच्या/कांच्या क्रेडिट कार्डचा कधीही उपयोग केला गेला नाही आणि ते १५० दिवसांपेक्षा न वापरता राहिले, तर सुरक्षिततेच्या कारणास्तव बँकेद्वारे कार्ड तात्पुरत्या स्वरूपात ब्लॉक केले जाऊ शकेल. असा कार्डधारक ग्राहकसंपर्क केंद्राच्या माध्यमातून कार्ड वापर करण्याच्या दृष्टीने पुन्हा सक्रिय करण्याची विनंती करू शकेल.

२.६. सर्व प्रकारचा पत्रव्यवहार फक्त प्रायमरी कार्डधारकालाच पाठविला जाईल.

२.७. जेव्हा बँकेला असे वाटेल की दिलेल्या सूचना खऱ्याखुऱ्या नाहीएत किंवा त्या स्पष्ट नाहीत किंवा त्यांच्याविषयी शंका येऊ शकते किंवा अन्यथा अयोग्य आहेत आणि त्या कोणत्याही कारणास्तव अमलात आणल्या जाऊ शकत नाहीत, तेव्हा बँक स्वत:च्या विवेकाधिकारात त्या अमलात न आणण्याचा निर्णय घेऊ शकते.

२.८. कार्डधारकाचा कोणताही व्यवहार सफल किंवा पूर्ण झाला नाही तर त्यासाठी बँक त्यासाठी जबाबदार आणि/किंवा उत्तरदायी नसेल.

२.९. प्रायमरी कार्डधारकाची आणि ॲड-ऑन कार्डधारकाची एकूण बाकी रक्कम, शुल्क, आकार, व्याज आणि कर यांच्यासह पतमर्यादेपेक्षा (क्रेडिट लिमिट) अधिक नसायला हवी.

२.१०. कोणत्याही वास्तूवर प्रदर्शित करण्यात आलेले कार्ड प्रमोशनल साहित्य किंवा व्हिजा/रुपे सिंबॉल म्हणजे अशी वॉरंटी नाही की, त्या वास्तूमध्ये सर्व वस्तू आणि सेवा त्या वास्तूमध्ये उपलब्ध आहेत आणि त्या कार्डच्या साह्याने खरेदी केल्या जाऊ शकतात.

२.११. कार्डच्या मागील बाजूवरील सिग्नेचर पॅनेलवर कार्डधारकाची सही असेल, तरच ते मान्य केले जाईल. कार्ड प्राप्त होताच कार्डधारकाने त्याच्या मागील बाजूवर तात्काळ सही केली पाहिजे.

२.१२. कार्डचे नूतनीकरण केलेले नसेल, तर कार्डच्या दर्शनी बाजूवर एंबॉस करण्यात आलेल्या मुदत संपण्याच्या महिन्यातील शेवटच्या तारखेनंतर कार्डधारकाने त्याचा उपयोग करू नये. कार्डधारक कार्डाच्या नूतनीकरणासाठी त्याची मुदत संपण्यापूर्वी २० दिवस आधी लेखी विनंती करू शकतो. बँक स्वत:च्या विवेकाधिकारात बँकेन कळविलेल्या नियम व अटींवर नूतनीकरण केलेले कार्ड देऊ शकेल.

२.१३. ह्या कार्डचा उपयोग फक्त कायदेशीर, प्रामाणिक, वैयक्तिक किंवा कार्यालयीन उपयोगासाठी केला जाऊ शकतो आणि ह्याचा वापर कार्डधारकाच्या व्यवसायात व्यापारीदृष्ट्या शोषण करण्यासाठी परवानगी नाही.

२.१४. आरबीआयच्या दिनांक ६ एप्रिल २०१८ च्या परिपत्रक क्र. डीबीआर नं. बीपी बीसी. १०४/०८.१३.१०२/२०१७-१८च्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेने या गोष्टीसाठी बंदी केलेली आहे की, बँकेने कोणत्याही प्रकारच्या क्रिप्टो/व्हर्च्युल करन्सीज् (व्हीसीज्) मध्ये व्यवहार करू नयेत किंवा कोणालाही व्हीसीज्मध्ये व्यवहार करण्यासाठी किंवा ते पूर्ण करण्यासाठी सेवा पुरवू नयेत किंवा मदत करू नये, ज्यात व्हीसीज्च्या खरेदी/विक्रीशी संबंधित खात्यात पैसे पाठवणे/प्राप्त करणे याचाही समावेश आहे. कार्डधारकाला हेही समजते आणि तो/ती मान्य करतो/ते की, त्याने/तिने अशा प्रकारचे व्यवहार केलेले आढळले, तर बँक कोणतीही सूचना न देता त्याचे/तिचे खाते तात्काळ बंद करण्याचा अधिकार स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

२.१५. कार्डधारकाने कोणत्याही वेळी त्याचे/तिचे कार्ड त्याच्या/तिच्यावतीने वापरण्यासाठी इतर कोणत्याही व्यक्तीला देऊ नये. कार्डधारक व्यवहार करताना एटीएम/पीएमई/इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये तो/ती प्रत्यक्ष उपस्थित असेल ह्याची खातरजमा करावी.

## ३. नियम व अटी लागू करणे:

३.१. कार्डधारक मान्य करतो आणि कबूल करतो की, कार्ड जारी करणे आणि त्याचा वापर करणे हे वेळोवेळी लागू असलेल्या रिझर्व्ह बँकेची, फेमाची नियमावली, फेमाच्या अंतर्गत तयार करण्यात आलेले सर्व नियम आणि नियमावली, वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या अधिसूचना/परिपत्रके आणि इतर कोणतेही संबंधित कायदे यांच्या अधीन असेल. ह्या कार्डचा उपयोग भारतात आणि परदेशात केला जाऊ शकतो, पण परकीय चलनातील रक्कम काढण्यास नेपाळ आणि/किंवा भूतानमध्ये केला जाऊ शकत नाही. शिवाय, हे कार्ड

भारत, नेपाळ आणि भूतानमध्ये पीएमईमध्ये परकीय चलनातील पेमेंट करण्यासाठी वैध नाहीए, म्हणजेच नेपाळ किंवा भूतानमध्ये कार्ड वापरताना व्यवहाराचे चलन हे त्या देशांचे स्थानिक चलन असले पाहिजे किंवा भारतीय रुपयांमध्ये असले पाहिजे. यांचे पालन न केल्यास फेमा आणि इतर संबंधित नियमावलींच्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या कारवाईसाठी कार्डधारकाला जबाबदार धरले जाईल.

३.२. कोणत्याही नियम व अटींची किंवा कोणत्याही नियम व नियमावलींचा भंग केल्यास किंवा अनुपालन न केल्यास कार्डधारकाला बँकेद्वारे किंवा आरबीआयद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर ग्लोबल क्रेडिट कार्ड धारण करण्यास मनाई करण्यात येईल.

३.३. परदेशात जाणाऱ्या कार्डधारकाकडून कार्डचा उपयोग, आरबीआयने वेळोवेळी निर्धारित केलेल्या परकीय चलनाच्या पात्रतेच्या मर्यादेत सर्व प्रामाणिक वैयक्तिक खर्चांसाठी, स्वतःच्या वापरासाठी केला जाऊ शकतो, मात्र परदेशवारीच्या दरम्यान घेतलेले एकूण चलन अशा पात्रतेच्या मर्यादेपेक्षा अधिक नसावे. परदेशात अशा प्रकारे खरेदी केलेल्या वस्तूंच्या आयातील वेळोवेळी लागू असलेले सामानाच्या वजनाचे नियम आणि कस्टम कायदा, १९६२/एक्झिम पॉलिसीनुसार नियम लागू असतील.

३.४. कार्डधारकाची इच्छा असल्यास तो/ती फेमा नियमावलीनुसार अधिकृत वितरकाकडून/पूर्णतः कार्यरत मनीचेंजरकडून कार्डवर पात्रतेच्या मर्यादेपर्यंत परकीय चलनातील नोटा/ट्रॅव्हलर्स चेक्स काढू शकेल. अशा परकीय चलनातील नोटांची/ट्रॅव्हलर्स चेक्सची पात्रतेनुसारच्या विक्रीला अस्तित्वातील नियमावली लागू असेल आणि ती लागू असलेल्या मर्यादेच्या अधीन असेल. परकीय चलनाच्या अधिकृत वितरकाकडून कॅलेंडर वर्षात परकीय चलनी नोटांच्या/ट्रॅव्हलर्स चेक्सच्या रूपाने घेतलेल्या परकीय चलनाच्या संबंधात कार्डधारक त्याचा पासपोर्ट एंडॉर्स करून घेऊ शकतो.

३.५. कोणत्याही पद्धतीने परकीय चलनात केलेल्या ट्रेडिंगला (इलेक्ट्रॉनिक/इंटरनेट ट्रेडिंग पोर्टल्सच्या माध्यमातून केलेल्यासहित) परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) १९९९ अंतर्गद बंदी घालण्यात आलेली आहे. शिवाय, आरबीआयने अनेक वेळा हे स्पष्ट केलेले आहे की, ओव्हरसीज फॉरिन एक्सचेंज ट्रेडिंगसाठी केलेला कोणत्याही रेमिटन्ससाठी (इलेक्ट्रॉनिक/इंटरनेट पोर्टल्सच्या माध्यमातून किंवा क्रेडिट/डेबिट कार्डचा उपयोग करून यांसह) परवानगी देण्यात आलेली नाही. अशा प्रकारच्या अनधिकृत व्यवहारांसाठी पैसे पाठवू किंवा जमा करू नयेत किंवा क्रेडिट/डेबिट कार्डचा उपयोग करू नये अशा सावधानतेच्या सूचना आरबीआयने जनतेस दिलेल्या आहेत. त्यानुसार अशा अनधिकृत व्यवहारांसाठी तुमच्या क्रेडिट/डेबिट कार्डवर घातलेली बंदी लक्षात घ्या आणि फेमा आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमावलीच्या विरोधात व्यवहार केल्यास आणि कोणत्याही नियमांचे उल्लंघन झालेच तर त्यासाठी शिक्षा होऊ शकेल किंवा आरबीआय किंवा अंमलबजावणी संचालनालय अशा नागरिकांविरुद्ध कारवाई करू शकेल. ग्राहकाने जर याआधी म्हटल्यानुसार काही अशा प्रकारचे किंवा कोणतेही व्यवहार केलेच किंवा फेमा कायद्याचे किंवा नियमावलीचे किंवा इतर अधिसूचनांचे किंवा नियमांचे किंवा भारतातील कायद्यांचे उल्लंघन करणारी कोणतीही कृती केली, तर त्यासाठी फक्त ग्राहकच जबाबदार असेल.

३.६. सध्या अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार ज्या उद्देशांसाठी परकीय चलन रिलिज करण्यासाठी परवानगी नाही, जसे (क) निषिद्ध/बंदी घातलेल्या यादीत असलेली मॅगझिन्स (ख) पूल्स, स्वीपस्टेक्स, लॉटरिज्, गॅम्बिंग, इत्यादी (ग) ज्यांच्यासाठी परकीय चलन रिलिज करण्यास परवानगी नाही उत्पादनांची/सेवांची विक्री करणाऱ्या इंटरनेट साईट्स (घ) इतर कोणत्याही बेकायदेशीर किंवा समाजविघातक कृती अशा उद्देशांसाठी रेमिटन्सेस करण्यासाठी कार्डचा वापर केला जाऊ शकत नाही. अशा प्रकारच्या उल्लंघनाची माहिती पूर्ण तपशिलासह चलन नियंत्रण विभागाला देण्याचा अधिकार बँक स्वतःकडे राखून ठेवीत आहे. अशा प्रकारे उल्लंघन झाल्यास कार्डधारकाच्या कार्ड वापरण्याचा अधिकार त्यानंतर निश्चित करण्यात येईल.

३.७. कोणत्याही परिस्थितीत कार्डधारकाने त्याने पात्रतेची मर्यादा ओलांडलेली आहे ह्या कारणास्तव कार्ड बिलाचे पेमेंट/देय रक्कम भरण्यास विलंब करू नये. अशा कारणामुळे कार्ड बिलाचे/देय रकमेचे पेमेंट न केल्यास कार्डधारकाला त्याचे कार्ड धारण करणे मागे घेतले जाण्याची जोखीम आहे.

३.८. आरबीआयने प्रस्तुत केलेल्या आणि वेळोवेळी सुधारित केलेल्या विनिमय नियंत्रण नियमावलीचे अनुपालन केले नाही किंवा अन्यथाही जर कार्ड रद्द करण्यात आले, तर भारतात किवा परदेशात कार्ड वापरण्याचा प्रयत्न केला गेल्यास आणि परिणामस्वरूपी कार्ड डिसऑनर झाल्यास त्यासाठी बँक जबाबदार असणार नाही.

३.९. फेमाचे किंवा त्यात केलेल्या सुधारणांचे आणि त्याअंतर्गत प्रसृत केलेल्या सर्व नियमांचे आणि नियमावलींचे, अधिसूचनांचे, एक्सचेंज कंट्रोल मॅन्युअलचे, प्रचलित सामानाच्या वजनाच्या नियमांचे, कस्टम कायदा, १९६२ चे आणि लागू असलेल्या एक्झिम पॉलिसीचे अनुपालन करण्याची जबाबदारी फक्त कार्डधारकाची आहे.

३.१०. कार्डधारकाने जर ह्या नियम व नियमावलींचा भंग करून जर कार्डचा दुरुपयोग केला, तर तो/ती त्यामुळे झालेले नुकसान, हानी, व्याज, रूपांतरण, इतर कोणताही आर्थिक खर्च, आकार किंवा बँकेला करावा लागणारा आणि/किंवा सोसावा लागणारा खर्च यासाठी कार्डधारकच जबाबदार असेल.

३.११. नोकरीसाठी किंवा स्थलांतरित होण्यासाठी परदेशात जाणारे निवासी कार्डधारक परकीय चलन काढण्यासाठी कार्डचा उपयोग करू शकणार नाहीत आणि परदेशात जाण्यापूर्वी त्यांनी देय रक्कम भरून कार्ड खंडित केलेच पाहिजे.

**४. मालमत्ता**

४.१. कार्ड ही बँकेची मालमत्ता आहे आणि विनंती केल्यास ते परत केलेच पाहिजे. हे कार्ड हस्तांतरणीय नाही.

४.२. कार्डची मुदत संपल्यानंतर बँक स्वत:च्या पूर्ण विवेकाधिकारात कार्ड किंवा पिन किंवा दोन्हीही, त्याच नियम व अटींवर किंवा बँकेला योग्य वाटतील अशा इतर नियम व अटींवर बदलून देईल. जेव्हा कार्डची मुदत संपेल तेव्हा कार्डधारकाने असे कार्ड मॅग्नेटिक स्ट्रीपवरून कणरिषेत कापून नष्ट केले पाहिजे. कार्डची मुदत संपण्यापूर्वी जर २० दिवस आधी नूतनीकरणासाठी विनंती केली गेली, कार्डखात्याची स्थिती उत्तम असेल तर बँकेच्या एकमेव विवेकाधिकारात कार्डची मुदत संपण्यापूर्वी बँक कार्डधारकाला नूतनीकरण केलेले कार्ड पाठवील आणि त्याविषयीची आगाऊ माहिती कार्डधारकाला दिली जाईल.

४.३. कार्ड/कार्ड्स कार्डधारकाने रद्द केल्यास, कार्डधारकाने कार्डवरील सर्व देय रक्कम भरून कार्ड रद्द केल्याविषयी बँकेला ऑनलाईन किंवा ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करून माहिती दिली पाहिजे आणि मॅग्नेटिक स्ट्रीपवरून कणरिषेत कार्ड कापून ते नष्ट केले पाहिजे. ॲड-ऑन कार्डसुद्धा याच प्रकारे नष्ट केली पाहिजेत.

४.४. याआधी उल्लेख केलेल्या तरतुदींच्या अधीन राहून, कोणत्याही तृतीय पक्षाच्या हाती कार्ड पडल्यास किंवा तृतीय पक्षाला पिन कळल्यामुळे कार्डचा किंवा पिनचा अयोग्य/लबाडीने/अनधिकृत/नक्कल करून/चुकीने वापर झाल्यास त्यासाठी कार्डधारक बँकेला जबाबदार धरणार नाही.

## ५. कार्डधारकाच्या जबाबदाऱ्या

५.१. कार्डधारकाच्या संपर्कासाठीच्या माहितीत, ज्यात सध्याच्या, कार्यालयाच्या किंवा कायमस्वरूपी पत्त्यात, राहण्याच्या ठिकाणात, कार्यालयात किंवा मोबाईल फोन क्रमांक आणि ईमेलमध्ये कोणताही बदल झाल्यास कार्डधारक त्याविषयी बँकेला लेखी स्वरूपात कळविण्याचे मान्य करतो/ते. अशा प्रकारची कोणतीही लेखी सूचना प्राप्त न झाल्यास बँकेच्या दप्तरी असलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर मासिक विवरण/णे पाठविले/ली जाईल/जातील आणि कोणतेही व्याज किंवा विलंब शुल्क देय झाल्यास त्यासाठी कार्डधारकच पूर्णत: जबाबदार असेल.

५.२. कार्डधारक कार्ड सुरक्षित जागी ठेवील आणि कोणत्याही परिस्थितीत ते इतर व्यक्तींना वापरण्यास देणार नाही.

५.३. कार्डधारकाला पुढील गोष्टी कळल्यानंतर त्याने त्या तात्काळ बँकेला कळविल्या पाहिजेत:-

(ख) कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास किंवा त्याची नक्कल केली गेल्यास किंवा इतर कोणत्याही मार्गाबद्दल, ज्यामुळे कार्डचा लबाडीने उपयोग केला जाऊ शकेल.

(ii)कार्डधारकाच्या खात्यात कोणत्याही अनधिकृत व्यवहाराची नोंद झाल्यास.

(iii) बँकेद्वारे कार्डखाते राखण्यातील कोणतीही चूक किंवा इतर अनियमितता.

५.४. कार्डधारक हे मान्य करतो की, त्याला प्रत्येक कॅलेंडर वर्षात, कार्डखात्यसाठीची पतमर्यादा काहीही असली तरीही वेळोवेळी जाहीर केल्यानुसार रोख रक्कम काढण्याची/वस्तू किंवा सेवा खरेदी करण्याची/आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्याची परवानगी देण्यात येईल.

५.५. कार्डखात्यात जर पुरेसे क्रेडिट/कॅश लिमिट उपलब्ध नसेल, तर कार्डचा उपयोग करून पैसे काढण्याचा/खरेदी करण्याचा प्रयत्न करणार नाही असे कार्डधारक मान्य करतो. कार्डखात्यात पुरेशी रक्कम शिल्लक राखणे ही संपूर्णपणे कार्डधारकाची जबाबदारी आहे. जर कार्डखात्याचा मर्यादेपेक्षा अधिक वापर झाला (ओव्हरड्रॉ) तर त्याला खात्यातील शिल्लक रक्कम तात्काळ पुरेशा प्रमाणात करावी लागेल व त्यासाठी बँकेने वेळोवेळी लागू केलेले योग्य ते आकार व दंडात्मक व्याज भरावे लागेल. हे आकार बँकेद्वारे ठरविले जातील आणि ते वेळोवेळी घोषित केले जातील.

५.६. कार्डधारकाचे कार्डखाते जर ओव्हरड्रॉ झाले किंवा डेलिंक्वंट झाले, तर कार्डधारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता कार्डधारकाच्या बँकेत असलेल्या संयुक्त किंवा एकट्याच्या खात्यात शिल्लक असलेल्या रकमेतून अशा प्रकारची रक्कम वळती करून घेण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे आणि कार्डधारक याद्वारे तसे करण्यासाठी बँकेला खास परवानगी देत आहे.

५.७. बँकेने विनंती केल्यास कार्डधारकाने त्याच्या कार्डखात्याशी संबंधित सर्व किंवा कोणत्याही बाबतीतील सर्व माहिती, नोंदी किंवा प्रमाणपत्रे पुरविली पाहिजेत.

५.८. बँकेचे कर्मचारी तसेच ज्या बँकांच्या एटीएमज्ना पार्टिसिपेटिंग एटीएमज् असे संबोधले जाते त्यांचे कर्मचारी, पीएमईचे कर्मचारी यांच्यासह कोणत्याही व्यक्तीकडे पिन उघड करू नये किंवा तो कोणत्याही परिस्थितीत कुठेही अशा प्रकारे लिहून ठेवू नये की तो इतरांना सहज समजले किंवा अन्यथा तृतीय पक्षाच्या हाती लागेल, मग तो त्यांनी तो प्रामाणिकपणे मिळविलेला असो वा अप्रामाणिकपणे.

५.९. कार्डधारक मान्य करतो की, बँकेने आता दिलेल्या किंवा यानंतर ज्या दिल्या जाऊ शकतील अशा कोणत्याही लेखी स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स किंवा त्याने विनंती केल्यामुळे आणि त्याच्या जबाबदारीवर बँकेने त्याला कार्डचा वापर करून व्यवहार करण्याची सुविधा पुरविलेली आहे.

५.१०. कार्डधारकाने दिलेल्या सूचनांनुसार बँकेने नेहमीच्या कार्यपद्धतीप्रमाणे सद्हेतूने काही कृती केल्यास त्याबद्दल कार्डधारक बँकेला जबाबदार

धरणार नाही. अशा प्रकारच्या सूचनांचे पालन करताना, बँक अशा कृती सर्वोत्तम प्रयत्न करून करील आणि कार्डधारकाच्या सूचनांनुसार तात्काळ कृती करण्यास जर विलंब झाला किंवा असमर्थता असली किंवा त्यांवर काहीही कृती करता आली नाही, तर बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरता येणार नाही.

५.११. हा करार खंडित झालेला आहे किंवा नाही ह्याचा विचार न करता, जारी करण्यात आलेल्या प्रायमरी आणि ॲड-ऑन कार्डस्‌वर बँकेद्वारे देण्यात आलेल्या सर्व सुविधांसाठी आणि व्यवहारांसाठी व या सुविधांवर लागू होणाऱ्या आकारांसाठी कार्डधारक जबाबदार असेल आणि तो कार्डशी संबंधित सर्व व्यवहाराच्या बाबतीत बँकेबरोबर प्रामाणिक कृती करील. कार्डद्वारे दिलेल्या कोणत्याही सूचना मागे घेता येण्याजोग्या नसतील. कार्डधारकाने सर्व परिस्थितींमध्ये ॲड-ऑन कार्डसकट कार्डच्या वापरासाठी पूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे, मग ती त्याला माहिती असताना वा नसताना त्यावर पक्रिया केलेली असली आणि आणि त्याने दिलेल्या स्पष्ट किंवा अध्याहृत आधिकारासह किंवा अधिकाराशिवाय असेल तरीही. कार्डधारक त्याने काढलेल्या किंवा हस्तांतरित केलल्या रकमेसाठी त्याच्या कार्डखात्यातून पैसे वजा करण्याचा किंवा कार्डचा वापर करून प्राप्त झालेल्या अशा सूचनांचे बँकेच्या व्यवहारांच्या नोंदीनुसार (रेकॉर्ड ऑफ ट्रँझॅक्शन्स) पालन करण्याचा अधिकार बँकेला देत आहे.

## ६. क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा

६.१. बँकेला योग्य वाटेल त्यानुसार कार्डधारकाला पूर्वसूचना न देता कार्डचे क्रेडिट लिमिट (पतमर्यादा) निश्चित करण्याचा/त्यात सुधारणा करण्याचा किंवा ते कमी करण्याचा पूर्ण अधिकार बँकेला आहे, जे अर्जदाराने त्याच्या वैयक्तिक स्रोतांची केलेली घोषणा आणि कार्डधारकाची खर्च करण्याची पद्धत यांवर अधारित असेल, पण तेवढ्यापुरतीच मर्यादित नसेल आणि पतमर्यादेतील कोणत्याही बदलांविषयी बँक कार्डधारकाला माहिती देईल. ही पतमर्यादा कार्डखात्याला लागू असेल आणि कार्डधारकाला देण्यात आलेल्या सर्व प्रायमरी कार्डसला आणि ॲड-ऑन कार्डसला लागू असेल. कार्डधारकाला जर त्याची पतमर्यादा वाढवून हवी असेल, तर तो बँकेला तसे लिहून कळवून आणि बँकेला आवश्यक असल्यानुसार त्याची आर्थिक स्थिती दर्शविणारी कागदपत्रे सादर करून करू शकेल. बँक स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात आणि अशा प्रकारच्या नव्या कागदपत्रांच्या आधारे कदाचित कार्डधारकाच्या पतमर्यादेत वाढ करील.

६.२. कार्डधारकाने कार्डसाठी अर्ज करताना जर त्याच्या/तिच्या कार्डवर आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्याचा पर्याय निवडलेला असेल, तर आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठीची पतमर्यादा ही कार्डधारकाला देण्यात आलेल्या कमाल मर्यादेएवढीच असेल.

६.३. कार्डधारकाला त्याच्या/तिच्या क्रेडिट कार्डवरील आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठीची सुविधा निष्क्रिय करायची असेल किंवा कार्डवरील आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठीची पतमर्यादा वाढवायची/कमी करायची असेल, तर तो/ती त्यासाठी बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राशी संपर्क साधू शकेल.

६.४. बँक रोख रक्कम काढण्यासाठी वेगळी मर्यादा निश्चित करील, जी देण्यात आलेल्या पतमर्यादेपेक्षा कमी असेल. फॉर्च्युन कार्डधारकांचा चालू वर्षाचा खर्च हा त्याच्या फॉर्च्युन कार्डच्या चालू वर्षाच्या शेवटच्या बिलिंग सायकलच्या ४०% पेक्षा अधिक असेल, तर त्याला रोख रक्कम काढता येणार नाही. वर्ष या शब्दाचा अर्थ कॅलेंडर वर्ष असा आहे.

६.५. कोणत्याही परिस्थितीत कार्डधारकाने त्याच्या पतमर्यादेच्या/रोख रकमेच्या मर्यादेपलीकडे व्यवहार करू नयेत. ज्या व्यवहारांमध्ये पतमर्यादा/रोख रकमेची मर्यादा ओलांडलेली असेल, असे सर्व व्यवहार नाकारण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

६.६. कार्डधारकाने जर त्याची पतमर्यादा/रोख रकमेची मर्यादा ओलांडली, तर ओलांडलेल्या पतमर्यादेच्या/रोख रकमेच्या मर्यादेच्या बदल्यात तात्काळ बँकेकडे तेवढ्या रकमेचा भरणा केला पाहिजे आणि त्यानंतर आकारांच्या सूचीत वेळोवेळी घोषित केल्यानुसार बँक त्यावर आकार/शुल्क आकारील.

६.७. या मर्यादांच्या व्यतिरिक्त, फसवणुकीचे प्रसंग टाळण्यासाठी बँक दरदिवशी प्रत्येक प्रकारच्या व्यवहारासाठी लागू असणाऱ्या उप-मर्यादा इत्यादी लागू करू शकेल.

६.८. कार्डधारक त्याच्या कार्डखात्यात काही क्रेडिट बॅलन्स असलाच, तर त्यासाठी कोणत्याही व्याजासाठी किंवा रिवॉर्ड पॉईंट्ससाठी पात्र नसेल.

## ७. अतिरिक्त कार्ड्स

७.१. बँक स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात प्रायमरी कार्डधारकाच्या कुटुंबातील सदस्यांना, म्हणजेच पती/पत्नी, भावंडे, मुले आणि आईवडील यांना ॲड-ऑन कार्ड्स देण्यासाठी परवानगी देऊ शकेल. प्रायमरी कार्डधारक, ॲड-ऑन कार्डससहित त्याच्या सर्व कार्डांवर लागू करण्यात आकारांसाठी जबाबदार असेल.

७.२. बँक स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात ॲड-ऑन कार्ड जारी करण्यासाठी शुल्क आकारू शकेल. ॲड-ऑन कार्डवर सुविधा पुढे सुरू ठेवणे हे फक्त प्रायमरी कार्डधारकाच्या किंवा कार्डखात्याच्या क्रेडिट स्टेटसवर अवलंबून असेल.

७.३. कार्ड, मग ते प्रायमरी असो वा ॲड-ऑन, ते १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या कोणत्याही व्यक्तीला जारी करण्यात येणार नाही. ॲड-ऑन कार्ड जारी करणे हे ॲड-ऑन कार्डधारकाचे सर्व केवायसी दस्तऐवज सादर करण्याच्या अधीन असेल.

७.४. गोल्ड, कॉर्पोरेट, बिझिनेस, प्लॅटिनम आणि सिग्नेचर यांसारख्या प्रकारची कार्ड्स बँक स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात जारी करण्याचा हक्क स्वत:कडे राखून ठेवीत आहे. प्रायमरी कार्डधारकाला जारी करण्यात आलेल्या कार्ड्सच्या व्यतिरिक्तची कार्ड्स बँकेच्या धोरणानुसार ॲड-ऑन कार्डधारकांना जारी कली जाऊ शकतात.

७.५. ॲड-ऑन कार्डसाठी विशिष्ट मर्यादा असू शकते, जी प्रायमरी कार्डधारकासाठी किंवा कार्डखात्यासाठी ठरवून दिलेल मर्यादेची उप-मर्यादा असेल आणि ती प्रायमरी कार्डधारकाने सुरुवातीला ज्या सूचना दिलेल्या असती, त्यांनुसार प्रत्येक ॲड-ऑन कार्डधारकासाठी वाटून दिली जाईल. प्रायमरी कार्डधारक त्यानंतर ज्या सूचना देईल त्यानुसार, पण बँकेच्या एकमेव विवेकाधिकारात ह्या मर्यादा सुधारून त्या जास्त किंवा कमी केल्या जाऊ शकतात.

७.६. प्रायमरी कार्डधारकाला लागू असलेला रिवॉर्ड प्रोग्रॅम विचारात न घेता, ॲड-ऑन कार्डधारकाला जारी करण्यात आलेल्या कार्डच्या प्रकारानुसार जोडण्यात आलेल्या रिवॉर्ड प्रोग्रॅमनुसार रिवॉर्ड पॉईंट्स जमा होतील. परंतु फक्त प्रायमरी कार्डधारकालाच रिवॉर्ड पॉईंट्स रिडीम करण्याचा हक्क असेल आणि या बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास तो बँकेला कोणतीही हानी पोहोचवणार नाही असे मान्य करतो.

७.७. प्रायमरी कार्डधारकाला पूर्वसूचना देऊन देण्यात किंवा जारी करण्यात आलेल्या ॲड-ऑन कार्ड्सचे प्रकार किंवा अटी बदलण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

## ८. खरेदी:

८.१. कार्डधारकाने, व्हिज़ा/रुपे कार्ड्स स्वीकारणाऱ्या भारतातील आणि परदेशातील पीएमईज्मध्ये/इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, यापैकी जे असेल त्यासाठी, केलेल्या व्यवहारांवर लागू असलेले आकार भरण्यासाठी कार्डधारक कार्डचा उपयोग करू शकेल. कोणत्याही कारणासाठी पीएमईमध्ये करण्यासाठी, कोणतीही पूर्वसूचना न देता, कोणत्याही वेळी कार्डचा उपयोग करण्यास नकार देण्याचा अधिकार बँक आणि पीएमईज् स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. कार्ड ऑनर करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अशा कोणत्याही नकाराची जबाबदारी बँक स्वीकारीत नाही.

८.२. कोणतेही कारण न देता, कोणताही व्यवहार मंजूर करण्याचा, शिफारस करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

८.३. व्यवहार करताना कार्डधारकाने चार्ज स्लीप गोळा केलीच पाहिजे. बँक चार्ज स्लीपची दुसरी प्रत देणार नाही. परंतु, तिच्या विवेकाधिकारात आणि कार्डधारकाने विनंती केल्यास, बँक लागू असलेले आकार आकारून तिच्या प्रती देऊ शकेल.

८.४. कार्डधारकाची प्रामाणिकपणे केलेली सही असलेली सेल्स स्लीप व त्यासोबत त्यावर लिहिलेला कार्ड क्रमांक हा कार्डधारकासाठी लागू असलेल्या जबाबदारीपुरता बँक आणि कार्डधारक यांच्यामध्ये समर्पक पुरावा असेल. कार्डधारकाने वैयक्तिक सही केलेली कोणतीही सेल्स स्लीप म्हणजे अनधिकृत व्यवहार समजला जाईल आणि त्यासाठी कार्डधारक जबाबदार असेल.

८.५. कार्डधारकाच्या जबाबदारीत कार्डधारकाने पीएमईमध्ये/इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कार्डचा उपयोग करून केलेल्या परवानगी दिलेल्या खर्चांसाठीच्या पेमेंटच्या, ज्याची नोंद चार्ज स्लीपमध्ये कलेली नसेल, त्याच्या जबाबदारीचाही समावेश आहे.

८.६. हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की, कार्डची सुविधा ही फक्त कार्डधारकाला वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी दिलेली सुविधा आहेत आणि बँक अशा वस्तूंच्या आणि सेवांच्या गुणवत्तेविषयी, प्रमाणाविषयी, मूल्याविषयी, डिलिव्हरीविषयी किंवा अन्यथाही कोणत्याही प्रकारची कोणतीही वॉरंटी देत नाही किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करीत नाही आणि त्यासंबंधीचा कोणताहव वाद थेट पीएमईने सोडवला पाहिजे. कोणताही वाद अस्तित्वात आहे ह्या कारणास्तव कार्डधारकाची त्याच्या बँकेच्या बाबतीत असलेल्या जबाबदारीतून मुक्तता होणार नाही आणि असा वाद त्याच्या निकालासाठी प्रलंबित आहे किंवा काय हे विचारात न घेता, कार्डधारकाने त्याची सर्व रक्कम बँकेला प्रदान करण्याची खातरजमा करावी. परंतु कार्डधारकाने मर्चंटसोबत असलेल्या वादाविषयी, ठिकाणाचे नाव, व्यवहाराची तारीख आणि वेळ यांचे तपशील, आणि बँकेला त्याचे अन्वेषण करण्यास साह्यभूत ठरतील असे इतर तपशील देऊन बँकेला माहिती द्यावी.

८.७. अन्याय झाल्याची भावना असलेल्या कार्डधारकांनी विवरणात दर्शविलेले लागू असलेले आकार मान्य नसल्याबद्दलच्या तक्रारीसंबंधी सूचना मिळाल्यानंतर ती सोडविण्याचा बँक प्रामाणिक आणि रास्त प्रयत्न करील.अशा प्रयत्नांनंतरीही जर बँकेने हे निश्चित केले की, दर्शविलेले आकार बरोबर आहेत, तर तसे कार्डधारकाला कळविण्यात येईल.

८.८. विवादास्पद आकारांच्या बाबतीत बँक स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात तात्पुरत्या स्वरूपात असे आकार मागे घेऊ शकेल. त्यानंतर केलेले अन्वेषण पूर्ण झाल्यानंतर जर अशा विवादास्पद आकारांची जबाबदारी कार्डधारकाची असेल, तर तो आकार त्यानंतरच्या विवरणात पुन्हा लागू केला जाईल आणि अशा प्रकारच्या व्यवहारावर लागू होणार असलेले व्याज कार्डखात्याच्या बिलात समाविष्ट केले जातील आणि कार्डधारक ते भरण्यास जबाबदार असेल.

८.९. सर्व व्यवहार, विशेषत: दागदागिन्यांसाठी, इलेक्ट्रॉनिक वस्तूंसाठी आणि रोख रक्कम आणि बँकेने निश्चित केलेले मोठी जोखीम असलेल्या मर्चंट संवर्गातील व्यवहारांना बँकेच्या विवेकाधिकारानुसार निवडकपणे मान्यता दिली जाईल.

८.१०. हे स्पष्ट करण्यात येते की, भरलेल्या आकारांमध्ये काही एटीएम्सच्या/पीएमईज्च्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या बाबतीत, खरेदीची किंवा इतर सुविधांचा लाभ घेतल्याबद्दलच्या आकारांचा समावेश असू शकतो. कोणत्याही पीएमईने लागू केलेल्या आणि कार्डधारकाच्या खात्यातून वजा केलेल्या व्यवहारासाठीच्या रकमेसाठी बँक कोणतीही जबाबदारी घेत नाही.

८.११. कार्डधारक हे मान्य करतो की, बँक निवडकपणे त्याला मेल ऑर्डरवरून किंवा टेलिफोनवरून ऑर्डर देऊन खरेद करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे मान्य करते. कार्डधारकाला ह्याची जाणीव आहे की, मेल ऑर्डरमुळे किंवा टेलिफोनवर दिलेल्या ऑर्डरमुळे जर काही आकार लावले गेले असतील (उदा. इंटरनेट), जेथे सही करण्यासाठी कदाचित चार्ज स्लीप किंवा व्हाऊचर उपलब्ध नसेल, तर कार्डधारक हे मान्य करतो की, अशा प्रकारच्या आकाराच्या अधिकृततेविषयी किंवा वैधतेविषयी काही वाद झाल्यास, कार्डधारक प्रथम त्याच्या काडवरील येणे बाकी रक्कम असलेली रक्कम भरील आणि त्यानंतर थेट संबंधित मर्चंट एस्टॅब्लिशमेंटसोबत हा वाद मिटविण्याचा प्रयत्न करील. यासाठी बँक कोणत्याही आणि कशाही प्रकारे जबाबदार नसेल.

८.१२. शिवाय, पीएमई/मर्चंट एस्टॅब्लिशमेंटमध्ये कोणत्याही प्रकारचे रोख रकमेचे व्यवहार, म्हणजेच रक्कम काढणे किंवा ठेवणे, करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

८.१३. असे घडल्यास, चुकीमुळे किंवा मर्चंडाईझ रिटर्नमुळे जर मर्चंटला असा पूर्ण केलेला व्यवहार रद्द करण्याची इच्छा असल्यास आधीची विक्रीची पावती मर्चंटद्वारे रद्द केली गेलीच पाहिजे आणि रद्द केलेल्या पावतीची प्रत त्याने त्याच्याजवळ ठेवलीच पाहिजे. कोणत्याही मर्चंट/डिव्हाईस किंवा कम्युनिकेशन लिंकमधील चुकीमुळे परत द्यावयाची रक्कम किंवा समायोजन हातांनी केली पाहिजे आणि योग्य ती पडताळणी केल्यानंतर आणि लागू असलेले व्हिजा/रुपे नियम आणि विनियम यांच्यानुसार कार्डखात्यात ती रक्कम जमा केली जाईल. कार्डधारक हे मान्य करतो की, या कालावधीत प्राप्त झालेले कोणतेही डेबिट्स. फक्त कार्डखात्यातील उपलब्ध पतमयर्दिच्या आधारे, ह्याचा विचार कर करता मान्य केले जातील. कार्डधारक अशा प्रकारच्या पेमेंटसंबंधीच्या सूचना अमान्य न करण्याचीही हमी बँकेला देतो.

## ९. रोख रकमेचा अग्रीम/कॅश ॲडव्हान्स

९.१. कोटक महिंद्रा बँक कार्डधारकाला त्यांच्या क्रेडिट कार्ड्सवर पुढील माध्यमातून रोख रकमेचा अग्रीम प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध करूद देत आहे:

(ख) एटीएम आणि शाखांमधून रोख रकमेचा अग्रीम - कार्डधारक कोटक महिंद्रा बँकेच्या निवडक शाखांमधील टेलर काऊंटर्सकडून/ऑटोमेटेड टेलर मशिन्स (एटीएमज्) मधून रोख रकमेचा अग्रीम घेऊ शकतो. अशा ठिकाणांची/एटीएमज्ची यादी.ज्ञेंरङ्म.लो वर उपलब्ध आहे.

(ii) ऑनलाईन फंड्स ट्रान्सफरच्या माध्यमातून रोख रकमेचा अग्रीम - कार्डधारक त्याच्या कार्डखात्यातून बँकखात्यात पैसे हस्तांतरित करून रोख रकमेचा अग्रीम घेण्यासाठी क्रेडिट कार्डचा उपयोग करू शकतो.

(iii) ड्राफ्टच्या माध्यमातून रोख रकमेचा अग्रीम - कार्डधारक बँकेकडे नोंदवलेल्या त्याच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर डीडी पाठविण्याची विनंती करून रोख रकमेचा अग्रीम घेण्यासाठी त्याच्या कार्डचा उपयोग करू शकतो.

**९.२. सर्वसाधारण नियमः**

(ख) ह्या सुविधेच्या अंतर्गत कोणत्याही एका वेळी घेतलेला रोख रकमेचा एकूण अग्रीम बँकेने प्रत्येक कार्डधारकासाठी निर्धारित केलेल्या उपलब्ध पतमर्यादेपेक्षा किंवा दैनंदिन मयर्दिपेक्षा/ प्रत्येक मार्गासाठी ठरवून दिलेल्या मयर्दिपेक्षा, यापैकी जे कमी असेल, त्यापेक्षा अधिक असायला हवा.

(ii) क्रेडिट खात्याची रोख रकमेची मर्यादा ही लाभ घेतलेल्या रोख रकमेच्या अग्रीमाच्या प्रमाणात ब्लॉक केली जाईल आणि या करारात दिलेल्या अपॉर्शन लॉजिकनुसार परतफेड केल्यानंतर ते रिलिज केले जाईल.

(iii) एका व्यवहारात जो जास्तीतजास्त रोख रकमेचे अग्रीम घेतला जाऊ शकतो, तो बँकेद्वारे ठरावीक कालावधीनंतर निर्धारित केला जाईल किंवा ठरवून दिला जाईल. कार्डधारकाला पूर्वसूचना न देता बँक ह्या मर्यादांमध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.

(iv) आकारांच्या सूचीनुसार व्यवहारावरील शुल्क प्रत्येक रोख रकमेच्या अग्रीमाच्या व्यवहारावर लागू केले जाईल आणि कार्डधारकाला मासिक कार्डखाते विवरणात बिलिंग केले जाईल. त्याव्यतिरिक्त, रोख रकमेच्या सर्व अग्रीमांवरही लागू असलेल्या दरांनुसार व्याज लावले जाईल. कार्डच्या वेगवेगळ्या व्हेरिएंट्ससाठी लागू असलेल्या व्याजदरांच्या तपशिलांसाठी कृपया www.kotak.com वर उपलब्ध असलेल्या आकारांची सूची (शेड्यूल ऑफ चार्जेस) पहा. अशा व्यवहाराच्या तारखेपासून बँकेद्वारे पेमेंट प्राप्त होईपर्यंत डेली आऊटस्टँडिंग बॅलन्स मेथडने व्याज आकारले जाईल. हे व्याज कार्डखात्यातून वजा केले जातील आणि ते मासिक खातेविवरणात दिसून येतील. वर उल्लेख केलेले व्यवहारासाठीचे शुल्क आणि व्याज हे परत न मिळण्याजोगे असतात.

(v) फॉर्च्युन आणि ८११# ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्डधारक सर्व रोख रकमेच्या अग्रीमासाठी व्याजमुक्त कालावधीचा लाभ घेऊ शकतील. हा व्याजमुक्त कालावधी रोख रकमेचा अग्रीम घेतल्यापासून सुरू होऊन त्या विशिष्ट बिलिंग सायकलच्या पेमेंटच्या देय तारखेला संपतो. ह्या

कालावधीतील सर्व रोख रकमेचे अग्रीम हे नेहमीची किरकोळ खरेदी आहे असे समजले जाईल आणि त्यांच्यासाठीचे पेमेंट बँकेला जर त्या विशिष्ट बिलिंग सायकलच्या देय तारखेस किंवा त्यापूर्वी प्राप्त झाले, तर त्यांवर व्याज आकारले जाणार नाही. फॉर्च्युन कार्डधारकाला जर त्याचे कार्ड पेमेंटच्या देय तारखेच्या आधी रद्द करायचे असेल, तर रोख रकमेचा अग्रीम घेतल्यापासून बँकेद्वारे रोख रकमेच्या अग्रीमावर व्याज आकारले जाईल आणि ते तात्काळ कार्डखात्यातून वजा करण्यात येईल. कार्डधारकाने नोंद घ्यावी की, हे वैशिष्ट्य फक्त फॉर्च्युन आणि ८११# ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्डसाठीच उपलब्द आहे आणि बँकेच्या इतर कोणत्याही कार्डसाठी नाही.

(vi) ह्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी, बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेली कागदपत्रे सही करून देण्याचे कार्डधारक हे मान्य करतो

(vii) रोख रकमेसाठीच्या अग्रीमाची विनंती स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार बँकेच्या एकमेव विवेकाधिराधीन असेल. कार्डधारकाने विनंती केलेल्या संपूर्ण रोख रक्कम अग्रीमासाठी क्रेडिट अप्रेजल करण्याचा हक्क बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

९.३. विशेष नियम:

९.३.१. एटीएम आणि शाखेतून रोख रकमेचा अग्रीम

(ख) ही सुविधा प्रायमरी कार्डधारकासाठी तसेच ॲड-ऑन कार्डधारकांसाठी उपलब्ध आहे.

(ii) काढलेली रक्कम ज्या दिवशी काढली त्याच दिवशी कार्डधारकाच्या खात्यातून वजा केली जाईल.

(iii) ओळख पटविल्यानंतर आणि लागू असलेली आवश्यक कागदपत्रे गोळा केल्यानंतर कार्डधारकाला त्याच्या कार्डचा उपयोग ठरावीक ठिकाणांवरील निवडक शाखांमधील टेलर काऊंटरवरील पैसे काढण्याची स्लीप भरून रोख रक्कम काढण्यासाठी करता येईल.

(iv) जेथे कार्ड स्वीकारले जाते अशा एटीएमज्मध्ये कार्डचा उपयोग करून रोख रक्कम प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अशा प्रकारचा उपयोग सक्रिय करण्यासाठी कार्डधारकाला सहा अंकी एटीएम पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (एटीएम पिन) बँकेद्वारे देण्यात येईल आणि कार्डधारकाच्या सोयीसाठी हा पिन, कार्डधारकाला कार्डची डिलिव्हरी देण्यापूर्वी, कार्डधारकाच्या जबाबदारीवर, कार्डवर एनकोड केला जाईल. जर कार्डशी संबंधित पिन दिला गेला नसेल, तर तो कार्डधारकाला पोस्टाने किंवा कुरिअरने, कार्डधारकाच्या पूर्ण जबाबदारीवर पाठवला जाईल. कार्डधारक हे मान्य करतो की:

(क) कार्डधारकाने कोणत्याही व्यक्तीकडे एटीएमचा पिन उघड करू नये आणि तो कोणत्याही व्यक्तीला शोधून काढता येऊ नये म्हणून शक्य होईल ती सर्व काळजी घ्यावी;

(ख) काडधारकाने त्याला माहीत असताना किंवा नसतानाही एटीएमचा पिन वापरून केलेल्या सर्व व्यवहारांसाठी कार्डधारक बँकेला उत्तरदायी असेल.

(ग) कोणत्याही हरवलेल्या किंवा चोरी झालेल्या कार्डच्या बदल्यात बँक फक्त तिच्या पूर्ण विवेकाधिकारात त्याऐवजी नवीन एटीएम पिनसह नवीन कार्ड देईल.

(घ) कोणत्याही तृतीय पक्षाचे कार्ड हाती पडल्यामुळे किंवा कोणत्याही तृतीय पक्षाला एटीएम पिन माहीत झाल्यामुळे जर कार्डचा लबाडीने/अनधिकृतपणे उपयोग करण्यात आला, तर याआधीच्या तरतुदींच्या अधीन राहून, कार्डधारक त्यासाठी बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरणार नाही.

(v) एटीएम नीट काम करीत नसल्यामुले किंवा एटीएममध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने किंवा एटीएमची साईट बंद झाल्यामुळे किंवा अन्यथा कशाहीमुळे जर कार्डधारक रोख रक्कम काढू शकला नाही, तर त्याच्या कोणत्याही परिणामासाठी कार्डधारक बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदाार धरणार नाही.

(vi) सहभागी होणाऱ्या एटीएमज्/टर्मिनल्सवर कार्डच्या वापरासाठी व्हिजाच्या/रुपे शेअर्ड पेमेंट नेटवर्कमध्ये सहभागी असलेल्या सभासद बँकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी, बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही, ज्यात वस्तू आणि/किंवा सेवांचा पुरवठा यांचा समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही. अशा प्रकारच्या एटीएमज्वर उपलब्ध करून देण्यात आलेले व्यवहार बँकेच्या स्वत:च्या नेटवर्कवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या व्यवहारांपेक्षा वेगळे असू शकतात. बँक फक्त इतर नेटवर्कच्या मालकीच्या एटीएमज्वर उपलब्ध करून देऊन निश्चित करण्यात आलेल्या किमान व्यवहारांनाच सपोर्ट करील. कार्डधारकाला कोणतीही सूचना न देता, निश्चित केलेल्या व्यवहारांमध्ये बदल करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

९.३.२. ऑनलाईन फंड्स ट्रान्सफरच्या माध्यमातून रोख रकमेचे अग्रीम:

(I) ही सुविधा फक्त प्रायमरी कार्डधारकांसाठीच उपलब्ध आहे.

(ii) हस्तांतरित केलेली रक्कम ही रक्कम हस्तांतरित करण्यासाठी केलेल्या विनंतीच्या तारखेस कार्डधारकाच्या कार्डखात्यातून वजा केली जाईल. याच तारखेपासून सर्व शुल्क आणि आकार मोजले/आकारले जातील.

(iii) बँकेत असलेल्या कार्डधारकाच्या स्वत:च्या खात्यातच फक्त पैसे हस्तांतरित करण्यात येतील.

(iv) इलेक्ट्रॉनिक मेसेजच्या डिलिव्हरीसाठी झालेला उशीर किंवा त्याची डिलिव्हरी न होणे किंवा कोणतीही चूक, वगळणे किंवा पाठवण्यातील किंवा डिलिव्हरीतील चूक किंवा मेसेजचा अर्थ लावण्यात झालेली चूक अशा बँकेच्या नियंत्रणात नसलेल्यया बाबी यांसाठी बँक जबाबदार नसेल. पेमेंट संबंधीच्या सर्व सूचना कार्डधारकाने काळजीपूर्वक तपासून पहाव्यात.

(v) या नियम व अटींचे वाचन, एनईएफटीसाठीच्या विनंतीसाठीच्या प्रपत्रात नमूद केलेल्या नियम व अटी, बँकेच्या नेट बँकिंगसाठीची खाती आणि सेवा यासाठीचे नियम व अटी आणि नियम (रुल्स) सोबत करावयाचे आहे.

(vi) कार्डधारकाने दिलेल्या सूचनांनुसा रक्कम हस्तांतरित करण्याचा कोणताही व्यवहार कोणत्याही कारणास्तव फलद्रूप किंवा पूर्ण होऊ शकत नाही आणि अशा प्रकारे व्यवहार फलद्रूप न होणे आणि/किंवा पूर्ण न होणे यासाठी बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरता येणार नाही.

९.३.३. ड्राफ्टच्या माध्यमातून रोख रकमेचा अग्रीम:

(i) ही सुविधा फक्त प्रायमरी कार्डधारकांसाठी उपलब्ध आहे, जे बँकेकडे नोंदवलेल्या त्यांच्या पत्त्यावर डिमांड ड्राफ्टची (''डीडी'') डिलिव्हरी करण्यासाठी विनंती दूरध्वनीच्या माध्यमातून किंवा यूनिक टेलिफोन-पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (''टी-पिन'') किंव नमूद केलेले इतर तपशील यांच्या माध्यमातून करू शकतात. जर अशी विनंती दूरध्वनीच्या माध्यमातून करण्यात आलेली असेल, तर कार्डधारकाने नोंद घ्यावी की, कार्डधारकाबरोबरचे संपूर्ण संभाषण ध्वनिमुद्रित करण्याचा आणि कार्डधारकानेच अशी विनंती केलेली आहे हे सिद्ध करण्यासाठी आवश्यकता भासल्यास अशा संभाषणाचा उपयोग करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे. सर्व विनंत्यांवर बँकेद्वारे प्रक्रिया केली जाईल आणि ज्या विनंत्या बँकेचे पात्रतेचे निकष पूर्ण करतात, त्याच पूर्ण केल्या जातील.

(ii) बँक सर्वोत्तम प्रयत्न करून ड्राफ्ट तयार करील आणि तो कार्डधारकाच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर मेल/कुरिअर करील. ड्राफ्ट देण्यास विलंब झाला किंवा तो डिलिव्हर किंवा प्राप्त झाला नाही, तर त्यासाठी बँक जबाबदार नसेल.

(iii) प्राप्त केलेला रोख रकमेचा अग्रीम हा डीडीच्या डिलिव्हरीसाठी विनंती केल्याच्या तारखेस कार्डधारकाच्या कार्डखात्यातून वजा करण्यात येईल. याच तारखेपासून सर्व शुल्क आणि आकार मोजले/आकारले जातील.

(iv) प्रत्येक डिलिव्हरीसाठी व्यवहाराच्या शुल्काव्यतिरिक्त जास्तीचे शुल्क आणि डीडीच्या रकमेवर व्याज अकारले जाऊ शकते.

(v) या सेवा बँकेद्वारे कुरिअरच्या (''डिलिव्हरी पर्सन'') पुरविल्या जातील. ओळख पटविण्यासाठी कार्डधारकाने डिलिव्हरी पर्सनची ओळख काळजीपूर्वक तपासून पाहिली पाहिजे. बँकेने नमूद केल्यानुसार कार्डधारकाने डिलिव्हरी पर्सनला अधिकृततेबद्दलच्या दस्तऐवजाची प्रत दाखवली किंवा पुरवली पाहिजे. कार्डधारकाच्या क्रेडिट कार्डच्या मागील बाजूस असलेली सही कार्डधारकाचीच आहे किंवा काय हे पडताळून पाहणे डिलिव्हरी पर्सनवर बंधनकारक नाही.

(vi) फक्त प्रायमरी कार्डधारकाच्या नावानेच डीडी दिला जाईल. डीडीच्या डिलिव्हरीसाठी विनंती करताना कार्डधारकाला ज्या बँकखात्यावर डीडी हवा असेल, त्या खात्याचे तपशील द्यावे लागतील.

(vii) कोणत्याही कारणास्तव डीडी प्राप्त झाला नसेल किंवा उशिरा प्राप्त झाला असेल, तर कार्डधारकाला जो तोटा, हानी, दायित्वे यांचा सामना करावा लागेल, त्यासाठी बँक जबाबदार नसेल.

(viii) जर ड्राफ्ट हरवला किंवा चोरीला गेला, तर बँकेला तात्काळ कळविले गेले पाहिजे. बँक कदाचित पुन्हा ड्राफ्ट देईल किंवा ड्राफ्टची मुद्दल रक्कम फक्त कार्डखात्यात पैसे जमा करून परत करील, मात्र यासाठी कार्डधारकाकडून सही केलेल्या/भरलेल्या इंडेम्निटीसह विनंती प्राप्त झाली पाहिजे.

(ix) यात काहीही म्हटलेले असले, तरी कार्डधारकाने फोनवरून किंवा ऑनलाईन दिलेल्या सूचनांची अधिकृतता तपासून पाहण्यासाठी किंवा सूचना देणारी आणि कार्डधारकाचा पिन/पासवर्ड/युजर आयडी वापरणारी किंवा इतर ओळख पटविणारी व्यक्ती म्हणजे कार्डधारकच आहे, ह्याची अधिकृतता पटविण्यासाठी बँक जबाबदार नसेल. बँकेला योग्य वाटेल त्यानुसार बँक कार्डधारकाकडून मिळालेल्या सूचनांची नोंद ठेवील.

(x) कार्डधारकाला कोणत्याही कारणास्तव डीडी प्राप्त झाला नाही, ज्यात इतर कारणांबरोबरच, डिलिव्हरीच्या वेळी कार्डधारक त्याच्या नोंदणीकृत पत्त्यावर उपस्थित नसल्याचाही समावेश आहे, तर त्यासाठी बँकेला जबाबदार धरता येणार नाही.

(xi) डीडी भारताबाहेर डिलिव्हर केला जाणार नाही आणि बँक ज्या भौगोलिक मर्यादा लागू करील त्यांच्या अधीन असेल.

## १०. हप्त्यांची सुविधा

हप्त्यांची सुविधा म्हणजे ईएमआयची सुविधा आणि क्रेडिट कार्डवर वैयक्तिक कर्जाची सुविधा.

१०.१. ईएमआयची (मासिक हप्त्यांची) सुविधा

(ख) प्राथमिक कार्डधारकाने ₹२५,००/- किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची किरकोळ खरेदी केल्यास, अशा खरेदीचे रूपांतर त्याच्या मोबाईल बँकेच्या माध्यमातून, नेट बँकिंगच्या माध्यमातून किंवा ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करून, अशा किरकोळ व्यवहारापासून ४५ दिवसांच्या

आत ३/६/९/१२/२४/३६ मासिक हप्त्यांमध्ये करू शकतो.

(ii) किरकोळ व्यवहारासाठी ईएमआयची सुविधा घेण्यासाठी अंतिम मान्यता हे बँकेच्या विवेकाधिकाराधीन आहे.

(iii) कार्डधारकाने जर एकापेक्षा अधिक खरेदीचे व्यवहार केले असतील, तर तो/ती प्रत्येक व्यवहाराचे रूपांतर ईएमआयमध्ये करू शकेल (मात्र त्यासाठी प्रत्येक व्यवहाराची रक्कम ₹२,५०० पेक्षा अधिक असली पाहिजे) किंवा रूपांतर करताना बँकेच्या त्या-त्या वेळेच्या धोरणानुसार पात्र व्यवहारांचे रूपांतर करू शकेल.

(iv) बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कार्डधारकांच्या निवडक संचासाठी एकूण ₹२५००* किंवा त्यापेक्षा अधिक रुपयांच्या खरेदीचे रूपांतर ३/६/९/१२/३६/४८ महिन्यांच्या मासिक हप्त्यांमध्ये करण्याची सुविधा उपलब्ध करू शकेल*.

(v) मासिक हप्त्यांसाठीच्या सर्व विनंत्या (ज्यात ॲड ऑन कार्डवर केलेल्या व्यवहारांचाही समावेश आहे) ह्या प्रायमरी कार्डधारकानेच केल्या पाहिजेत. मासिक हप्त्यांचे रूपांतर करण्याच्या विनंत्या ग्राहकसंपर्क केंद्र, नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग किंवा बँकेने मान्यता दिलेल्या इतर अधिकृत चॅनेलच्या माध्यमातून केल्या जाऊ शकतात.

(vi) किरकोळ खरेदीचे रूपांतर मासिक हप्त्यांमध्ये करण्याची विनंती करण्याच्या वेळेस कार्डधारकाचा कार्ड बॅलन्स जर रिव्हॉल्व्हिंग असेल, तर, मासिक हप्त्यांमध्ये प्रत्यक्ष रूपांतर होईपर्यंत त्याला त्याच्या रिव्हॉल्व्हिंग बॅलन्सवर क्रेडिट कार्डला लागू असलेले आकार आकारले जातील. कार्डच्या विविध व्हेरिएंट्सवर लागू असलेल्या व्याजदराच्या तपशिलांसाठी कृपया www.kotak.com वर उपलब्ध असलेले शेड्यूल ऑफ चार्जेस पहा.

(vii) किरकोळ व्यवहारांचे रूपांतर केल्याच्या तारखेपासून मासिक हप्त्यांचे वेळापत्रक सुरू होईल आणि ते मासिक हप्ते पूर्ण होण्याच्या कालावधक्षपर्यंत चालू राहील. पहिल्या महिन्याचा मासिक हप्ता, व्यवहाराचे रूपांतर मासिक हप्त्यात झाल्यानंतरच्या कार्डखात्याच्या विवरणात प्रतिबिंबित होईल.

(viii) कार्डधारक पहिल्या मासिक हप्त्याच्या देय तारखेच्या आधी मासिक हप्ता रद्द करण्यासाठी लेखी विनंती करू शकेल किंवा बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करू शकेल. विनंती प्राप्त झाल्यानंतर मासिक हप्त्याची मुद्दल रक्कम पुन्हा एकदा कार्डधारकाच्या रिटेल बॅलन्समध्ये वळविण्यात येते आणि कार्डधारक डेलिंक्वंट होऊ नये म्हणून त्याने एमएडीचे (किमान देय रक्कम) पेमेंट करण्याची आवश्यकता असते.

१०.२. क्रेडिट कार्डच्या सुविधेवर वैयक्तिक कर्ज (पीएलसीसी सुविधा)

(i) प्रोफाईल, क्रेडिट बिहेविअर आणि बँकेने ठरवल्यानुसार इतर निकषांनुसार बँकेच्या एकमेव विवेकाधिकारात पीएलसीसी सुविधा कार्डधारकाला उपलब्ध करून दिली जाऊ शकते.

(ii) कर्जाची रक्कम कार्डधारकाच्या बँकेत असलेल्या/इतर बँकांमधील खात्यात एनईएफटी/आयएमपीएसच्या माध्यमातून हस्तांतरित केली जाईल.

(iii) कार्डधारक एका वेळेला फक्त एकच कर्ज घेऊ शकतो/ते आणि ते उपलब्ध पतमर्यादेच्या ७५%च्या आत असले पाहिजे. असे कर्ज बँकेने ठरवलेल्या कालावधीसाठी उपलब्ध करून दिले जाईल. कर्जावरील व्याजाचा दर व्यवहारावरील शुल्काची रक्कम आणि कर्जाचे मासिक हप्ते भरण्याचा एकूण कालावधी आणि पेमेंटविषयीचे इतर तपशील हे बँकेने स्वत:च्या विवेकाधिकारात वेळोवेळी ठरवल्यानुसार कार्डधारकानुसार वेगवेगळे असतील आणि कर्जाचे वितरण करण्यापूर्वी ते कार्डधारकाला कळविण्यात येतील.

(iv) बँक स्वत:च्या विवेकाधिकारानुसार विद्यमान क्रेडिट कार्ड लिमिटपेक्षा जास्तीची कर्जाची रक्कमही देऊ शकते.

(v) कार्डधारक हे कबूल करतो की, कर्जावर लागू असलेले व्याज हे पीएलसीसी सुविधेच्या अंतर्गत उपलब्ध विशिष्ट कर्जानुसार असेल. कर्जाच्या मासिक हप्त्याची रक्कम व त्यासोबत कर्जाचे इतर तपशील (व्याजदर, शुल्क, इत्यादींसह) बँकेद्वारे कार्डधारकाला कळविले जातील.

(vi) कार्डधारक हे मान्य करतो आणि हमी देतो की, कर्जाच्या रकमेचा उपयोग जुगारासाठी, भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यासाठी किंवा काळ्या पैशाचे रूपांतर पांढऱ्या पैशात करण्यासाठी आणि/किंवा समाजविघातक हेतूसाठी केला जाणार नाही.

१०.३. हप्त्याच्या सुविधेसाठी सर्वसाधारण नियम व अटी

(i) हप्त्याची सुविधा बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या व्यवहार/प्रक्रिया शुल्काच्या अधीन असेल. व्यवहार/प्रक्रिया शुल्क कार्डधारकाच्या क्रेडिट कार्डखात्यातून वजा केली जाईल आणि ते मासिक विवरणात दिसून येणाऱ्या किमान देय रकमेचा भाग असेल.

(ii) सेवाकर, जीएसटी, लागू असलेल्या दराने कोणतेही/सर्व लागू असलेले कर (लागू असलेला उपकर आणि अधिभार) हे व्याज/आर्थिक आकाराचे घटक यांवर, प्रक्रिया शुल्कावर, मुदतपूर्व परतफेडीच्या शुल्कावर (असल्यास) आणि इतर कोणत्याही बिल केलेल्या आर्थिक आकारांवर/शुल्कावर वेळोवेळी लागू केले जाईल.

(iii) कार्डधारकाने एकदा हप्त्याचा पर्याय निवडल्यानंतर हप्त्याच्या सुविधेत बदल/सुधारणा करण्याची कोणतीही विनंत मान्य केला जाणार

नाही.

(iv) हप्त्याच्या सुविधेच्या कालावधीत कार्डधारकाला योग्य ती माहिती देऊन कर्जाचा कालावधी आणि व्याजदर यांमध्ये बदल करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

(v) मासिक हप्त्याची गणना (मुद्दल रक्कम+व्याजाचा आकार, असल्यास) कालावधी म्हणून केली जाते. मासिक कार्डखात्याच्या विरणात प्रतिबिंबित होणारी मासिक हप्त्याची बँकेने केलेली गणना अंतिम असते. कोणत्याही परिस्थितीत कार्डधारकाला मासिक हप्त्याच्या रकमेच्या गणनेला आव्हान देता येणार नाही/प्रश्न विचारता येणार नाही.

(vi) हप्त्याची सुविधा घेत असताना क्रेडिट कार्डवरील पतमर्यादा ही घेतलेल्या कर्जाच्या रकमेच्या प्रमाणात ब्लॉक करण्यात येईल/जी कार्डधारकाच्या विनंतीवर प्रक्रिया केल्यानंतर मासिक हप्त्यांमध्ये रूपांतरित होते. जेव्हा केव्हा त्यानंतरच्या महिन्यात हप्त्याची रक्कम बिल करून भरणा केली जाईल, तेव्हा पतमर्यादा रिलिज केली जाईल.

(vii) मासिक हप्त्याच्या सुविधेंतर्गत १००% प्रक्रिया शुल्क आणि मासिक हप्त्याची रक्कम, कार्डखात्यात दिसून येणाऱ्या किमान रकमेत समाविष्ट करण्यात येईल.

(viii) किमान देय रक्कम भरली नाही किंवा ती कमी भरली, तर त्यासाठी नेहमीचे विलंब शुल्क भरावे लागेल आणि हप्त्याच्या सुविधेंतर्गत भरणा न केलेल्या बिल केलेल्या मासिक हप्त्यावर लागू असलेला व्याजदर लागू होईल. कार्डच्या विविध व्हेरिएंट्सवर लागू असलेल्या व्याजदरांच्या तपशिलांसाठी कृपया ु.ज्ञींरज्ञ.ले वर उपलब्ध असलेले शेड्यूल ऑफ चार्जेस पहा.

(ix) जेव्हा कार्ड डेलिंक्वंट बनेल, तेव्हा हप्त्यांची सुविधा रद्द/खंडित करण्यात येईल किंवा हप्ता आकारला जाईल तेव्हा ब्लॉक केला जाईल. येणे बाकी असलेली मुद्दल रक्कम कार्डधारकाच्या रिटेल बॅलन्समध्ये परत पाठवली जाईल आणि भरणा न केलेल्या बिल केलेल्या मुद्दल रकमेवर आणि बिल केलेल्या भरणा न केलेल्या मासिक हप्त्यांवर व्याज आकारले जाईल.

(x) मासिक हप्त्यांचा लाभ घेण्यासाठी रूपांतरित केलेली रक्कम किंवा पीएलसीसी सुविधेंतर्गत घेतलेले व्याज यांवर कोणतेही रिवॉर्ड पॉईंट्स मिळणार नाहीत.

(xi) हप्त्यांची सुविधा घेतल्यानंतर जर मूळ व्यवहारावर काही रिवॉर्ड पॉईंट्स जमा झालेले असलेच तर ते मागे घेतले जातील

(xii) त्यानंतर, हप्त्यांच्या सुविधेंतर्गत कर्जाच्या एकूण रकमेचा भरणा केल्यामुळे अशी हप्त्यांची सुविधा आपोआप बंद होणार नाही. बाकी असलेल्या रकमेवर मुदतपूर्व परतफेडीसाठी ४% दराने व्याज आकारले जाईल. मुदतपूर्व परतफेडीसाठीचे आकार स्वत:च्या विवेकाधिकारात मागे घेण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे. शेवटची सायकलची तारीख आणि मुदतपूर्व परतफेडीचा दिवस यांमधील कालावधीमध्ये जमा झलेल्या व्याजाची रक्कम त्या प्रमाणात कार्डधारकाला बिल केली जाईल.

(xiii) कोणत्याही वेळी कोणतीही पूर्वसूचना न देता ह्या नियम व अटींमध्ये भर घालण्याची, बदल करण्याची किंवा सुधारणा करण्याचा किंवा ही एकूणच हप्त्यांची सुविधा रद्द करण्याचा आधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

(xiv) हप्ते आकारण्यापूर्वीच जर कार्ड बंद करण्यात आले, तर हप्त्यांच्या सुविधेंतर्गत घेतलेली बाकी रक्क क्रेडिट कार्डखात्यातून एकत्रच वजा केली जाईल.

(xv) कोणत्याही हप्त्यांच्या पेमेंट्स त्यांच्या संबंधित देय तारखेस भरण्यास विलंब झाल्यास नेहमीच्या क्रेडिट कार्ड विलंब शुल्क आणि न भरलेल्या हप्त्यावर व्याज लागू होईल. याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, कार्डधारकाने त्याच्या कार्डवरील येणे रक्कम भरली नाही किंवा पेमेंट उशिरा केले, तर ज्याप्रमाणे कार्डवर आकार लागू केले जातात, त्याप्रमाणेच व्याज आणि लागू असलेले सर्व आकार सर्व आकारांवर लागू करण्यात येतील, ज्यात त्या महिन्यात देय असलेल्या हप्त्यांच्या सुविधेंतर्गतच्या मासिक हप्त्याचाही समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाहीत. याआधी जे म्हटले गेले आहे, ते, हप्त्यांची सुविधा खंडित करून येणे बाकी असलेली संपूर्ण रक्कम तात्काळ भरण्याची मागणी करण्याच्या बँकेच्या अधिकारास बाधा न आणता म्हटले गेले आहे.

(xvi) हप्त्यांच्या सुविधेंतर्गत कार्डखात्यात मासिक हप्त्यापेक्षा केलेले कोणतेही जास्तीचे पेमेंट हे हप्त्यांच्या सुविधेसाठी केलेले पेमेंट समजले जाणार नाही आणि जास्तीची रक्कम कार्डधारक करारामधील कलम १५.२ (v) नुसार समायोजित करण्यात येईल.

## ११. शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्याची सुविधा

११.१. शिल्लक रक्कम हस्तातरित करण्याची सुविधा (''बीटी फॅसिलिटी'') प्रायमरी कार्डधारकाने निवडलेल्या पर्यायानुसार, कोटक महिंद्रा बँकेने देऊ केलेल्या उपलब्ध योजनेनुसार प्रमोशनल व्याजदर देऊ करते. या बाबतीत ॲड ऑन कार्डधारकाकडील कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही.

११.२. बीटी फॅसिलिटी फक्त इतर क्रेडिट कार्डखात्यातून हस्तांतरित करण्यात आलेल्या येणे बाकी असलेल्या शिल्लक रकमेवरच घेतली जाऊ शकते. ह्या सुविधेचा लाभ दुसऱ्या कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्डवरील शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्यासाठी घेतला जाऊ शकत नाही.

११.३. शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्याची सुविधा बँकेच्या एकमेव विवेकाधिकाराधीन आहे. शिल्लक रक्कम हस्तातरित करण्याची सुविधा बँकेने ठरविल्यानुसार ९० दिवसांच्या कालावधीसाठी किंवा मासिक हप्त्याच्या आधारे घेतली जाऊ शकते.

११.४. बँकेच्या विद्यमान कार्डधारकांसाठी शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्याची अंतिम मान्यता ही विनंती प्राप्त झाल्याच्या वेळी कार्डच्या कामगिरीच्या अधीन असेल.

११.५. ₹२,५०० पेक्षा कमी आणि पतमर्यादेच्या ७५% पेक्षा जास्त रकमेसाठी शिल्लक रक्कम हस्तांतरणावर प्रक्रिया केली जाणार नाही.

११.६. शिल्लक रक्कम हस्तांतरणाच्या ऑफरअंतर्गत कार्डवरील पतमर्यादा, जी रक्कम हस्तांतरित केलेली आहे, तेवढ्यापुरती ब्लॉक केली जाईल.

११.७. प्रमोशनच्या कालावधीमध्ये बिलिंग सायकलसाठी देय असलेल्या एकूण रकमेपेक्षा दिलेली कोणतीही जास्तीची रक्कम ही येणे बाकी असलेल्या शिल्लक रकमेच्या हस्तांतरणासाठी समायोजित केली जाईल आणि त्या प्रमाणात पतमर्यादा रिलिज केली जाईल.

११.८. इतर बँकांच्या क्रेडिट कार्डखात्यामध्ये एनईएफटी/आयएमपीएसच्या माध्यमातून बँक निधी हस्तांतरित करील आणि तोपर्यंत कार्डधारकाने त्याच्या इतर क्रेडिट कार्डखात्यांमध्ये पेमेंट करीत राहिले पाहिजे.

११.९. कार्डधारकाच्या इतर क्रेडिट कार्डखात्यामधून कोणत्याही कारणास्तव वजा केलेल्या सेवाआकारासाठीच्या किंवा विलंबशुल्काच्या रकमेसाठी बँकेला जबाबदार धरता येणार नाही.

११.१०. कार्डधारकाच्या इतर क्रेडिट कार्डखात्यातून हस्तांतरित करण्यात आलेल्या शिल्लक रक्कमेवर लागू असणारे कोणतेही रिवॉर्ड पॉईंट्स मिळणार नाहीत.

११.११. हस्तांतरित केलेल्या शिल्लक रकमेवर बँकेने निर्धारित केलेल्या दराने कार्डधारकाला व्याज आकारले जाईल. हस्तांतरित केलेल्या शिल्लक रकमेवरील सध्याचा व्याजदर ९० दिवसांच्या कालावधीसाठी (''प्रमोशनल पिरेड'') दरमहा ०% आहे.

११.१२. बीटी सुविधेसाठीचा प्रमोशन कालावधी हा इतर कार्ड देणाऱ्यांच्या नावे केलेल्या एनईएफटीच्या/आयएमपीएसच्या तारखेस किंवा कार्डखात्याला रक्कम आकारल्याच्या तारखेस (यापैकी जी लवकर असेल ती) सुरू होईल.

११.१३. कार्डधारकाने जर बिलिंग सायकलसाठी देय असलेल्या एकूण रकमेचे पेमेंट प्रमोशन कालावधीमध्ये केले, तर कार्डधारकाच्या कार्डखात्याला व्याज आकारले जाणार नाही.

११.१४. कार्डधारक करारामध्ये उल्लेख केल्यानुसार प्रमोशनल कालावधीनंतर जर कोणतीही शिल्लक रक्कम पुढे नेण्यात आली (कॅरी फॉरवर्ड) तर त्यावरील व्याजाची गणना करण्यासाठी डेली बॅलन्स मेथडचा उपयोग केला जाईल.

११.१५. बीटी सुविधेवरील व्याजदरात सुधारणा करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

११.१६. प्रमोशनच्या कालावधीत हस्तांतरित रक्कम ही देय असलेल्या एकूण रकमेचा किंवा किमान देय रकमेचा भाग नसेल. परंतु हस्तांतरित करावयाची शिल्लक रक्कम प्रमोशनच्या कालावधीत हस्तांतरित करावयाची रक्कम कार्डधारकाच्या मासिक कार्डखात्याच्या विवरणात एकूण येणे रक्कम (बीटी, ईएमआय आणि कर्ज यांसह) या शीर्षकांतर्गत दाखवण्यात येईल.

११.१७. प्रत्येक वेळी शिल्लक रक्कम हस्तांतरित करताना एकदाच (वन-टाईम) प्रक्रियाशुल्क आकारले जाईल. सध्या प्रत्येक ₹१०,०००/- किंवा त्याच्या काही अंशी रकमेवर ₹३४९/- प्रक्रियाशुल्क आकारले जाईल. हे प्रक्रियाशुल्क व त्यावर लागू असलेला सेवाकर, जीएसटी, वेळोवेळी लागू असलेले कोणतेही/सर्व लागू असलेले कर मासिक कार्डखात्याच्या विवरणात बिल केले जातील.

११.१८. बीटी सुविधेसाठीचा प्रमोशन कालावधी हा इतर कार्ड देणाऱ्यांच्या नावे केलेल्या एनईएफटीच्या/आयएमपीएसच्या तारखेस किंवा कार्डखात्याला रक्कम आकारल्याच्या तारखेस (यापैकी जी लवकर असेल ती) सुरू होईल.

११.१९. ज्या क्रेडिट कार्डचे स्टेटस ओव्हरड्यू आहे, ज्यात पतमर्यादा ओलांडली गेली असेल, तर शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

११.२०. बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कोणतेही कारण न देता कार्डधारकाची शिल्लक रक्कम हस्तांतणाची विनंती नाकारू शकेल.

११.२१. शिल्लक रक्कम हस्तांतरित करण्याच्या विनंतीला एकदा मान्यता दिल्यानंतर आणि त्यावर प्रक्रिया केल्यानंतर ती रद्द करता येणार नाही.

११.२२. कार्डधारक वेगवेगळ्या कार्डवरील रक्कम हस्तांतरित करण्यासाठी विनंती करू शकतो (मात्र त्यासाठी ही सर्व कार्ड्स इतर कोटक महिंद्रा बँकेची असली पाहिजेत). कार्डधारकाने अशा प्रकारच्या सर्व हस्तांतरांची विनंती एकाच वेळी केली पाहिजे (ह्याचा अर्थ असा आहे की, एकापेक्षा अधिका कार्डांवरची रक्कम एकाच वेळी हस्तांतरित करणे - ते टप्प्याटप्प्याने केले जाऊ शकत नाही.

११.२३. सर्व हप्ते आकारले जाण्यापूर्वीच जर खाते बंद झाले, तर येणे बाकी असलली रक्कम एकरकमी कार्डखात्यातून वजा करण्यात येईल.

११.२४. कार्डधारकाकडून कोणतीही अतिरिक्त रक्कम मागण्याचा हक्क बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

## १२. कॅश बॅक

१२.१. डिलाईट प्लॅटिनम कार्ड आणि त्यांच्या ॲड-ऑन कार्ड्सवर १०% कॅश बॅक सुविधा उपलब्ध आहे. व्हिजाने व्याख्या केल्यानुसार 'रेस्टॉरंट' आणि 'एंटरटेनमेंट' मर्चंट कॅटेगरी कोड (एमसीसी) अंतर्गत ज्यांचे वर्गीकरण मर्चंट एस्टॅब्लिशमेंट म्हणून करण्यात आलेले

आहे, त्यांच्याकडे केलेल्या व्यवहारांवरच कॅश बॅक उपलब्ध आहे. यात बार्स, पब्ज आणि रेस्टॉरंट्स एमसीसी अंतर्गत वर्गीकरण केलेल्या कशाचाही समावेश होतो. एंटरटेनमेंटमध्ये चित्रपण आणि नाट्यगृहांचा समावेश होतो.

१२.२. फक्त एकेकट्या दुकानांतून केलेल्या व्यवहारांवरच कॅश बॅक देऊ करण्यात येते आणि जी दुकाने (आऊटलेट्स) कोणत्याही हॉटेल्स/शॉपिंग मॉल्स/डिपार्टमेंटल स्टोअर्स, इत्यादींशी संलग्न असतील आणि ज्यांचे वर्गीकरण ''हॉटेल'', ''ग्रोसरी'' ''अपारेल्स'', ''डिपार्टमेंटल स्टोअर्स'', इत्यादींसाठी नाही.

१२.३. डिलाईट प्लॅटिनम कार्ड कॅश बॅकवरील कॅश बॅक किमान ₹१०,००० रक्कम खर्च केल्यानंतर बिलिंग सायकलच्या आत डायनिंग आणि एंटरटेनमेंट वगळून इतर कॅटेगरिज्‌वर मिळेल.

१२.४. मासिक बिलिंग सायकलमध्ये डायनिंग आणि एंटरटेनमेंट या दोहोंसह जास्तीतजास्त₹६०० कॅश बॅक उपलब्ध असेल. ज्या एकाच डायनिंग किंवा मूव्ही ट्रँझॅक्शनचे मूल्य ₹४०००/- पेक्षा अधिक असेल, त्यावर कॅश बॅक उपलब्ध नसेल. विशिष्ट बिलिंग सायकलसाठीचा कॅश बॅक पुढील महिन्याच्या बिलिंग सायकलमध्ये जमा केली जाईल.

१२.५. कॅश बॅकसाठी पात्र असलेले व्यवहार ते ज्या तारखेस बिल केले जातील त्याच तारखेस विचारात घेतले जातील आणि ज्या तारखेस कार्डधारकाद्वारे डिलाईट प्लॅटिनम कार्ड स्वाईप केले जाईल, त्या तारखेस नाही.

१२.६. उलट फिरवलेले किंवा रद्द केलेले कोणतेही व्यवहार कॅश बॅकसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

१२.७. कार्डधारकाल संपूर्ण व्यवहाराची रक्कम बिल केली जाईल आणि कॅश बॅक एक क्रेडिट एंट्री म्हणून दिसून येईल.

१२.८. व्हिजाने व्याख्या केल्यानुसार जर कोणत्याही मर्चंट एस्टॅब्लिशमेंटने तिचे एमआयडी (मर्चंट आयडी) अंतर्गत मॅपिंग केलेले नसेल, तर कार्डधारक कोणत्याही कॅश बॅकसाठी पात्र नसेल.

१२.९. कार्डधारकाचे खाते जर डेलिंक्वंट झाले, तर कॅश बॅक मागे घेतले जाईल आणि जोपर्यंत कार्डधारक त्याच्या देय असलेल्या एकूण रकमेचे पूर्ण पेमेंट करीत नाही, तोपर्यंत कोणत्याही नव्या खरेदीला परवानगी देण्यात येणार नाही.

१२.१०. कार्डखात्यात चुकून जमा केलले कोणतेही कॅश बॅक कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता बँक स्वत:च्या विवेकाधिकारात परत घेईल.

## १३. को-ब्रँडेड कार्ड्स

१३.१. बँकेने दिलेली को-ब्रँडेड किंवा ॲफिनिटी कार्ड्स नियम व अटींच्या व्याप्तीत समाविष्ट केली जातात. विशिष्ट को-ब्रँडेडशी संबंधित खास वैशिष्ट्ये आणि लाभ वेळोवेळी को-ब्रँड कार्ड्सच्या साहित्यात (लिटरेटचर) आरि अर्जांमध्ये कळविण्यात येतील आणि कोणत्याही वेळी को-ब्रँडशी संबंधित वैशिष्ट्ये आरि लाभ यांमध्ये बदल करण्याचे अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे आणि ते त्यानंतर ते बँकेला योग्य वाटेल त्या पद्धतीने कळविले जातील.

१३.२. पीव्हीआर गोल्ड/प्रीव्ही प्लॅटिनम क्रेडिट कार्डसाठी कार्डधारक मासिक क्रेडिट कार्ड विवरणात बिल केलेल्या ट्रँझॅक्शन्सच्या (रिव्हर्सल्स वजा जाता, काही असल्यास) आधारे पीव्हीआर तिकिटांसाठी पात्र होईल.

## १४. हरवलेली, चोरीस गेलेली किंवा गैरवापर केलेली कार्ड्स

१४.१. कार्डधारक कार्ड, कार्ड क्रमांक किंवा पिन यांच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार आहे आणि ते सुरक्षित ठेवण्यासाठी त्याने पावले उचलली पाहिजेत.

१४.२. कार्डधारकाना कार्ड, कार्ड क्रमांक किंवा पिन हरवल्याची माहिती त्याच्या शहरातील फोन बँकिंग क्रमांकावर कळवून हरवल्याबद्दल बँकेला तात्काळ माहिती द्यावी. गैरवापर होऊ नये म्हणून बँक तात्काळ कार्ड निष्क्रिय करण्याचा प्रयत्न करील.

१४.३. परंतु घरफोडी/चोरीमुळे कार्ड किंवा पिन हरवला किंवा त्याचा गैरवापर झाला, तर कार्डधारकाने तात्काळ स्थानिक पोलीस ठाण्यात पहिली खबर (''एफआयआर'') नोंदवली पाहिजे.

१४.४. कार्ड हरवले किंवा चोरीस गेले तर अनधिकृत व्यवहारांपासून कार्डधारकाला संरक्षण पुरविण्यात आलेले आहे. न्यू इंडिया ॲश्युअरन्स कंपनी लिमिटेडच्या माध्यमातून विम्याच्या रकमेसाठी पात्रतेची ग्रीड खाली दिलेली आहे - कार्डचा प्रकार, दरवर्षीची विम्याची रक्कम

| कार्डचा प्रकार | प्रत्येक वर्षासाठी विम्याची रक्कम (₹) |
|---|---|
| सिल्व्हर कार्ड | ₹२५,००० |
| गोल्ड कार्ड | ₹१,००,००० |
| प्लॅटिनम कार्ड | ₹१,२५,००० |
| सिग्नेचर कार्ड | ₹२,५०,००० |
| प्रिमिअम कार्ड्स | ₹१०,००,००० |

विम्याच्या अटींनुसार बँकेच्या विवेकाधिकारात विम्याच्या दाव्यावर प्रक्रिया केली जाईल. कोणत्याही दाव्यावर प्रक्रिया करण्यासाठी असलेल्या कागदपत्रांच्या यादीत उल्लेख नसेलेल्या इतर अतिरिक्त कागदपत्रांची/पुराव्याची (आवश्यकता असल्यास) बँक त्यांची मागणी करू शकते.

कार्ड हरवल्याची माहिती बँकेला देण्यापूर्वी ७ दिवस आधी केलेले कोणतेही व्यवहार विम्याच्या दाव्यासाठी पात्र आहेत. कार्ड हरवल्याची माहिती बँकेला देण्यापूर्वी ७ दिवस आधी केलेल्या कोणत्याही अनधिकृत व्यवहारासाठी कार्डधारकच जबाबदार असेल.

कार्डधारकाने खाली दिलेल्या क्रमांकांवर बँकेशी संपर्क साधून दावा नोंदवला पाहिजे. तुमच्या कोटक क्रेडिट कार्डसंबंधीच्या अधिक चौकशीसाठी तुम्ही तुमच्या इंटरनेट बँकिंग युजर आयडी आणि पासवर्डच्या साह्याने ु.ज्ञींरज्ञ.लोवर ईमेल पाठवू शकता. दुसरा पर्याय म्हणजे तुम्ही आमच्या २४ तास चालू असलेल्या संपर्क केंद्राशी १८६०२६६२६६६ शी संपर्क साधू शकता (स्थानिक कॉलदर लागू होतील) आणि खाली उल्लेख केलेली कागदपत्रे आमच्या www.kotak.com या संकेतस्थळावर (सीडीएफ आणि एफआयआर यांच्या प्रती) आम्हाला ूरींं.लरीवीूज्ञींरश्र.लोआणि ज्ञींरज्ञलीशवळीं.लरीवरश्रशींीूज्ञींरज्ञ.लोवर ईमेल करू शकता, तुमच्या शंकेशी संबंधित.

कार्डधारकाने त्याचा/तिचा दावा नोंदविण्यासाठी मागणी नोंदवल्यानंतर ७ दिवसांच्या आत बँकेकडे पुढील कागदपत्रे सादर केलीच पाहिजेत -

१. भरलेला कार्डहोल्डर डिस्प्युट फॉर्म

२. एफआयआरची प्रत

३. पासपोर्टची प्रत (संपूर्ण ३६/६० पाने)

४. दाव्यावर प्रक्रिया करण्यासाठी/अन्वेषण करण्यासाठी बँकेला/विमा कंपनीला आवश्यक वाटतील अशी इतर सर्व कागदपत्रे. जर दाव्याचा निकाल कार्डधारकाच्या बाजूने लागला नाही, तर अनधिकृत व्यवहारांसाठीची जबाबदारी कार्डधारकाची असेल.

१४.५ सही न केलेले कार्ड हरवल्यास, त्यावर केलेल्या सर्व खर्चाच्या आकारांसाठी कार्डधारक जबाबदार असेल.

१४.६ कार्डधारकाने जर त्याचे कार्ड परदेशात हरवले, तर त्याने उपरोक्त प्रक्रिया पार पाडावी किंवा व्हिजा ग्लोबल कस्टमर असिस्टन्स हेल्पलाईन्सच्या माध्यमातून त्याविषयी माहिती द्याव. कार्डधारकाने जर व्हिजा ग्लोबल कस्टमर असिस्टन्स सर्व्हिसेसचा उपयोग केला, तर अशा सेवांचा वापर केल्याबद्दलचा आकार कार्डधारकाला भरावा लागेल.

१४.७ वीर - प्लॅटिनम/सिलेक्टसाठी - कार्डधारकाने जर त्याचे कार्ड परदेशात हरवले, तर त्याने एकतर वरील कार्यप्रणालीचे पालन केले पाहिजे किंवा कार्ड हरवल्याबद्दलची माहिती रूपे कस्टमर असिस्टन्स हेल्प-लाईन्सच्या माध्यमातून दिली पाहिजे. जर ग्राहकाने रूपे कस्टमर असिस्टन्स सेवेचा उपयोग केला, तर अशा सेवांचा वापर करण्यासाठीचे आकार कार्डधारकाला भरावे लागतील.

१४.८ असेही की, कार्डधारकाने सर्व नियम आणि अटींची पूर्तता सर्व बाबतीत केलेली असेल, तर बँक स्वत:च्या विवेकाधिकारात हरवलेल्या/चोरी झालेल्या कार्डच्या बदल्यात दुसरे कार्ड देईल.

१४.९ कार्ड जर हरवले, चोरीस गेले किंवा त्याचा गैरवापर केला गेला आणि वरीलप्रमाणे बँकेला आणि विमा कंपनीला लेखी कळविण्यात आले नाही, तर त्यासाठीच्या आकारांसाठी कार्डधारक पूर्णत: जबाबदार असेल आणि कार्डधारक याद्वारे कार्ड हरवणे, चोरी किंवा गैरवापर यांविषयीची जबाबदारी, नुकसान, उत्पादनखर्च, खर्च किंवा नुकसानभरपाई याविषयी बँकेला पूर्णत: हमी देतो.

१४.१० परंतु जेव्हा कोणीतरी कार्डधारकाच्या किंवा ॲड-ऑन कार्डधारकाच्या संमतीने/संमतीशिवाय कार्ड किंवा पिन मिळवून त्याचा गैरवापर करीत असेल, तर कार्डधारक सर्व नुकसानासाठी जबाबदार असेल.

१४.११ बँकेने जर असे ठरवले की, कार्डधारक लबाडीने वागलेला आहे किंवा कोणतीही काळजी न घेता निष्काळजीपणे वागला असेल, तर कार्ड हरवल्यामुळे, चोरीला गेल्यामुळे किंवा गैरवापर केल्यामुळे होणारे आर्थिक नुकसान कार्डधारकाने सोसले पाहिजे.

१४.१२ कार्ड हरवल्याची/चोरीला गेल्याची/खराब झाल्याची माहिती दिल्यानंतर आणि बँकेने कार्ड सस्पेंड केल्यानंतर जर कोणताही अनधिकृत व्यवहार करण्यात आला, तर त्यासाठी कार्डधारक जबाबदार नसेल. अशा प्रकारची माहिती दिल्यानंतर जर कोणताही व्यवहार केला, तर त्याची जबाबदारी बँकेची असेल. परंतु माहिती देण्यासंबंधीची वेळ आणि/किंवा माहिती दिल्यानंतर कार्डवर केलेला कोणताही व्यवहार यांविषयी जर वाद असेल, तर वेळ आणि/किंवा विवादास्पद व्यवहाराची अधिकृतता यांची शहानिशा बँक करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

१४.१३ कार्ड देण्यासाठी ज्या व्यक्तीने विनंती केलेली आहे तिला कार्ड दिले जाते. तुमच्याव्यतिरिक्त तुम्हाला दिलेले कार्ड इतर कोणाही व्यक्तीस ओळखीचा पुरावा म्हणून किंवा अन्य कारणासाठी वापरण्याची परवानगी नाही. तुम्ही जर इतर कोणाला तुमचे कार्ड वापरण्यास दिले असेल किंवा तुम्ही स्वेच्छेने कार्डचा प्रत्यक्ष ताबा सोडलेला असेल, तर त्यामुळे तुम्हाला दिलेल्या कार्डच्या बाबतीतील पेमेंट करण्यासंबंधी आमच्या बाबतीत असलेल्या तुमच्या जबाबदारीवर परिणाम होणार नाही. **कार्ड जर हरवले, चोरीस गेले, खराब झाले, दबाव टाकून, शारीरिक हल्ला करून, दहशतवादी हल्ल्यात, करार अमलात आल्यानंतर वेडसरपणामुळे, बेकायदेशीर बाबी, म्हणजेच अमली पदार्थांचा व्यापार, बंदुकीचा धाक दाखवून बेकायदेशीररीत्या वापरले गेले किंवा तुमच्या परवानगीशिवाय कार्डचा वापर केला जातोय असा तुम्हाला संशय आल्यास तुम्ही तात्काळ त्याविषयीची माहिती (२४ तास ग्राहक सेवा क्रमांकांवर) दिली**

**पाहिजे.** कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास, तुम्ही तात्काळ जेथे घटना घडली तेथून जवळ असलेल्या पोलीस ठाण्यात पहिली खबर (एफआयआर) नोंदवली पाहिजे आणि अशा प्रसंगाची तपशीलवार माहिती देऊन त्यासोबत एफआयआरची एक प्रत आम्हाला सादर केली पाहिजे. परंतु जेव्हा कोणीतरी कार्ड प्राप्त करून कार्डचा किंवा पिनचा गैरवापर कार्डधारकाच्या किंवा ॲड-ऑन कार्डधारकाच्या संमतीने/संमतीशिवाय करील किंवा कार्डधारक लबाडीची कृती केलेली असेल किंवा पुरेशी काळजी न घेता कृती केलेली असेल, तव्हा कार्डधारक सर्व नुकसानासाठी जबाबदार असेल.

**१५. बिलिंग, स्टेटमेंट (विवरण) आणि पेमेंट्स**

१५.१ बिलिंग आणि स्टेटमेंट्स

(ख) बँक प्रायमरी खातेधारकाला त्याने दिलेल्या शेवटच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर मासिक कार्ड खातेविवरण पाठवील, ज्यात कार्ड व त्यासह दिलेल्या कोणत्याही ॲड-ऑन कार्डच्या वापरासाठी लावलेल्या आकारांचे बिलिंग करून, अधिक लागू असलेले सर्व आकार आणि अटींमध्ये तरतूद केल्यानुसार आकारांचा समावेश असेल. जर ₹१०० किंवा त्यापेक्षा कमी रक्कम येणे बाकी असेल आणि कार्डवर कोणताही व्यवहार केला नसेल, तर त्या कालावधीचे विवरण तयार केले जाणार नाही आणि पाठवले जाणार नाही.

(ii) बँक विवरणाची प्रत्यक्ष प्रत नेहमीच्या टपालाने किंवा कुरिअरने प्रायमरी कार्डधारकाच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवील. तथापि, कार्डधारक त्याच्या कार्डचे विवरण प्राप्त करण्यासाठी ''ई-मेल'' हा पर्याय निवडू शकेल. या बाबतीत कार्डधारकाने त्याचे विवरण नोंदणीकृत ई-मेलवर प्राप्त करण्यास संमती दिल्यानंतर बँक प्रत्यक्ष प्रत पाठविणे बंद करील. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारकांना, प्रायमरी कार्डहोल्डर बँक प्रोफाईलमध्ये अपडेट केलेल्या त्याच्या ''प्रेफर्ड'' ई-मेल आयडीवरच इलेक्ट्रॉनिक स्टेटमेंट पाठवील.

(iii) परकीय चलनात लागू करण्यात आलेले सर्व आकार कार्डधारकाच्या विवरणात फक्त भारतीय रुपयांमध्ये बिल केले जातील. कार्डधारक मान्य करतो आणि परकीय चलनात लागू केलेले आकार, आरबीआयने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या त्यावेळी प्रचलित असलेल्या, विशिष्ट टक्केवारीने वाढवलेल्या - जे बँकेद्वारे खाली उल्लेख केल्यानुसार स्पष्टपणे उघड केले जातील - त्या चलनाच्या विनिमय दराने त्याच्याएवढ्या मूल्याच्या भारतीय रुपयांमध्ये रूपांतरित करण्याचे याद्वारे बँकेला अधिकार देत आहे.

(iv) कार्डधारकाने विनंती केल्यास बँक कार्डखात्याच्या विवरणांचा १२ (बारा) महिन्यांच्या आतील आधीच्या विवरणांची फक्त नक्कल प्रत देईल. बँक स्वत:च्या विवेकाधिकाराने अशा प्रकारची कार्डखात्याची नक्कल प्रत देण्यासाठी, बँकेने तिच्या शेड्यूल ऑफ चार्जेसमध्ये वेळोवेळी उघड केल्यानुसार कदाचित आकार लागू करील.

(v) कार्डधारक मान्य करतो की, बँक विवरण प्राप्त झाले नाही किंवा त्यात काही त्रुटी असल्यास त्याविषयी त्याच्या स्टेटमेंट बिलिंग डेटच्या १५ दिवसांच्या आत कळविणे ही त्याची जबाबदारी आहे. कार्डधारकाने जर अशा प्रसंगाची माहिती बँकेला दिली नाही, तर विवरण दिले गेले आहे आणि ते अंतिम आहे असे समजण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव विवरण प्राप्त न होणे हे देय असलेली रक्कम न भरण्याचे कारण होऊ शकत नाही.

(vi) बँकेने पुरविलेल्या विवरणात खालील तपशील असतील:

क. ''एकूण देय रक्कम'' - व्याजाचे आकारले जाऊ नये म्हणून पेमेंट ड्यू डेटच्या आधी देय असलेली थकीत रक्कम.

ख. ''किमान देय रक्कम'' - बँकेने वेळोवेळी ठरवलेल्या एकूण देय रकमेचा काही हिस्सा.

ग. ''पेमेंटची देय तारीख'' - विलंबशुल्क लागू नये म्हणून कार्डधारकाने त्याच्या शिल्लक रकमेसाठी पेमेंट करावयाची तारीख.

घ. कार्डवर ''येणे बाकी असलेली एकूण रक्कम'', ज्यात एकूण देय रक्कम आणि शिल्लक रक्कम हस्तांतरण, कर्जे आणि मासिक हप्ते यांची येणे बाकी असलेली मुद्दल रक्कम यांचा समावेश आहे. ही रक्कम कार्डधारकाच्या संदर्भासाठी असेल

१५.२ पेमेंट्स:

(i) कार्डधारक कबूल करतो की, तो ॲड-ऑन कार्डसहित कार्डचा वापर केल्याने लागू होणाऱ्या सर्व आकारांसाठी, अधिक नियम व अटींमध्ये देण्यात आलेले सर्व आकार यासाठी बँकेचे पेमेंट्स देणे लागतो आणि ते करील.

(ii) बँक कार्डधारकाला मासिक विवरणात दर्शविलेली फक्त 'किमान देय रक्कम' 'पेमेंटच्या देय तारखेस किंवा त्यापूर्वी' भरणा करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. बँक कोणत्याही कार्डधारकाच्या बाबतीत स्वत:च्या विवेकाधिकारात पूर्वसूचना देऊन पेमेंट करण्याची ही सुविधा कोणत्याही वेळी मागे घेऊ शकेल. जर कार्डधारकाने पेमेंटच्या देय तारखेस ''किमान देय रक्कम'' भरण्याचा पर्याय निवडला, तर तो विलंबशुल्क टाळतो. परंतु जर कार्डधारकाने किमान देय रक्कम किंवा किमान देय रकमेपेक्षा जास्त कितीही रक्कम, पण एकूण देय रकमेपेक्षा कमी रक्कम भरणा केली, तर येणे बाकी असलेल्या रकमेवर डेली ॲक्रुल बेसिसवर (शुल्क आणि आकार विभागात उदाहरण दिल्यानुसार) गणना केलेले व्याज लागू असलेल्या दरांनी भरावे लागेल. तुम्ही जर ''एकूण देय रक्कम'' भरण्याचा पर्याय निवडला, तर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. कार्डच्या वेगवेगळ्या व्हेरिएंट्सवर लागू असलेल्या व्याजदरांच्या तपशिलांसाठी कृपया www.kotak.com वर उपलब्ध असलेले शेड्यूल ऑफ चार्जेस पहा.

(iii) किमान देय रक्कम अशी असेल:

- एकूण देय रक्कम किंवा बँकेने स्वत:च्या विवेकाधिकारात ठरवून दिलेली इतर कोणतीही रक्कम यावर ५% किंवा १०%. कृपया नोंद घ्या की, सामील होण्याचे शुल्क (जॉयनिंग फीज) आणि सर्व प्रक्रियाशुल्क तुमच्या किमान देय रकमेमध्ये पूर्णपणे जोडले जाते.
- आधीच्या विवरणातील जर काही न भरलेली किमान देय रक्कम असली, तर तीसुद्धा चालू विवरणाच्या किमान देय रकमेत जोडली जाईल.
- जर एकूण येणे बाकी असलेली रक्कम पतमर्यादेपेक्षा अधिक असेल, तर जेवढ्या रकमेने पतमर्यादा ओलांडलेली असेल, तीसुद्धा किमान देय रकमेत जोडली जाईल.

(iv) किमान देय रक्कम भरण्याच्या पर्यायामुळे कार्डधारकाच्या तात्काळ जबाबदारीवर परिणाम होणार नाही आणि कार्डधारकाला 'क्लोजिंग बॅलन्स'चे पूर्ण पेमेंट करण्यास सांगणच्याचा हक्क बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

(v) कार्डवरील येणे बाकी रकमेचे मिळालेल्या पेमेंटचा विभागणी अशी केली जाईल: सर्व कर, शुल्क आणि इतर आकार, व्याजासाठीचे आकार, मासिक हप्ते, रोख रकमेचे अग्रीम, खरेदी आणि शिल्लक रकमेचे हस्तांतरण या क्रमाने. कार्डवरील येणे बाकी असलेल्या रकमेसाठी केलेल्या पेमेंट्ससाठी त्यानंतरच्या विवरणात पोचपावती दिली जाते. सर्व पेमेंट्स फक्त भारतीय रुपयांमध्ये करावयाची आहेत. कोणतीही जास्तीची पेमेंट्स कोणतेही येणे बाकी असलेले मासिक हप्ते/कर्ज किंवा बीटी यांसाठी त्या क्रमाने समायोजित केली जातील.

(vi) कार्डखात्यात करावयाची पेमेंट्स खालीलपैकी कोणत्याही मार्गांनी करता येतील:

- **स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्सच्या (ऑटो डेबिट) पैसे भरा**

  कार्डधारक त्याच्या क्रेडिट कार्डची बिले पेमेंटच्या देय तारखेस त्याच्या कोटक महिंद्रा बँकखात्याच्या माध्यमातून दरमहा पेमेंट वजा करण्यासाठी लेखी सूचना देऊन भरू शकतो. कार्डधारक त्याच्या खात्यातून किमान देय रक्कम किंवा एकूण देय रक्कम भरण्यासंबंधी सूचना देण्याचा पर्याय निवडू शकतो. जर पेमेंटच्या देय तारखेस रविवार आला किंवा सुट्टी असली, तर अशी रक्कम अशा खात्यातून त्याच्या आदल्या दिवशी वजा केली जाईल. याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी कार्डधारकाने बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राला कॉल करावा. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारकासाठी एकूण देय रकमेच्या पेमेंटसाठी बँकेतील त्याच्या एनआरई/एनआरओ बचत खात्यातून ऑटो डेबिटसाठी सूचना देणे अनिवार्य आहे.

- **कोटक महिंद्रा बँकखात्यादून ऑनलाईन पैसे भरा.**

  कोटक महिंद्रा बँकेचे बचत/चालू खातेधारक म्हणून कार्डधारक क्रेडिट कार्डचे बिल त्याच्या घरून किंवा कार्यालयातून आरामात ऑनलाईन भरू शकतो. यासाठी कार्डधारक www.kotak.com वर लॉग ऑन करू शकतो. कार्डधारकाकडे त्याच्या कोटक महिंद्रा बँक खात्यासाठी जर इंटरनेट पासवर्ड नसेल, तर कार्डधारक बँकेच्या टोल फ्री ग्राहकसंपर्क क्रमांकावर कॉल करू शकेल. कोटक एनआरआय कार्डधारक त्याच्या कोटक महिंद्रा बँक एनआरई/एनआरओ बचत खात्यातून ऑनलाईन पैसे भरू शकतो.

- **इतर बँकांमधील तुमच्या बचत खात्यातून ऑनलाईन पेमेंट करण्यासाठी.**

  जर तुमच्या दुसऱ्या बँकेने एनईएफटी (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्सफर) सुविधा सक्रिय केलेली असेल, तर क्रेडिट कार्डवरील देय रक्कम तुमच्या इतर बँकखात्यातूनही इलेक्ट्रॉनिकली भरली जाऊ शकते.कोटक महिंद्रा बँकेसाठी डेस्टिनेशन बँक म्हणून तुम्ही ट्रान्झॅक्शन कोड ५२ आणि आयएफएस कोड'KKBK०००९५८' वापरू शकता. अधिक माहितीसाठी www.kotak.com वर नेट बँकिंग फीचर्स पहा.

- तुमच्या नॉन कोटक बँक साईटवर लॉग ऑन करा.
- एनईएफटी पर्याय निवडा
- कोटक क्रेडिट कार्ड्सचे पेमेंट करण्यासाठी रजिस्टर करा.
- तपशील प्रविष्ट करा - (हे बँकेच्या साईटनुसार विशिष्ट असू शकतात)
- पेयीचे नाव - ४१६ काचे नाव
- पर्याय निवडा - एनईएफटीसाठी अकाऊंटचा प्रकार म्हणून ५२ निवडा
- लोकेशन सिटी निवडा - मुंबई
- डेस्टिनेशन बँक निवडा - कोटक बँक
- बँक कोड मेन ब्रँच मुंबई - आयएफएससी कोड - KKBK०००९५८

- पेयी खाते क्र. ४१६६ निवडा (तुमचा १६ अंकी कोटक क्रेडिट कार्ड क्र. अचूकपणे द्या). कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक त्याच्या क्रेडिट कार्डच्या बिलाचे पेमेंट इतर बँकांतील खात्यातून एनआरई/एनआरओमधून एनईएफटीचा उपयोग करून भरू शकतो.
- **शाखांमध्ये रोख रक्कम भरून पैसे भरा.**

  कार्डधारक त्याच्या क्रेडिट कार्डचे बिल कोटक महिंद्रा बँकेच्या फक्त विशिष्ट ठिकाणच्या शाखांमध्ये कामकाजाच्या वेळेत रोख रक्कम भरून भरू शकतो. हे पेमेंट कार्डधारकाच्या क्रेडिट कार्डखात्यात २४ तासांच्या आत प्रतिबिंबित होईल. कार्डधारक ज्या शाखांमध्ये त्याचे क्रेडिट कार्ड बिल भरू शकेल अशा शाखांची यादी www.kotak.com वर उपलब्ध आहे. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक त्याच्या क्रेडिट कार्ड बिलाचे पेमेंट शाखांमध्ये रोख रक्कम भरून करू शकतील.
- **चेक किंवा डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून पैसे भरा**

  कार्डधारकाने फक्त एवढेच करायचे आहे की, कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्ड क्र. (कृपया १६ अंकी क्रेडिट कार्ड क्रमांक अचूक लिहा) या नावे लोकल किंवा अॅट पार चेक/ड्राफ्ट तयार करायचा. कार्डधारकाने चेकच्या मागील बाजूवर त्याचे नाव आणि संपर्काचे तपशील लिहिणे लक्षात ठेवावे. कार्डधारकाने बाहेरचे (आऊटस्टेशन) चेक किंवा पोस्टडेटेड चेक्स टाकू नयेत, कारण ते पेमेंटसाठी स्वीकारले जाणार नाहीत. चेक/ड्राफ्ट बँकेकडे पेमेंटच्या देय तारखेस किंवा त्यापूर्वी पोहोचला पाहिजे. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक त्याच्या क्रेडिट कार्ड बिलाचे पेमेंट त्याच्या एनआरई/एनआरओ खात्यातून चेक किंवा ड्राफ्ट तयार करून पेमेंट करू शकतात.

  कार्डधारक पुढील ठिकाणी चेक/ड्राफ्ट टाकू शकतील:
- फक्त विशिष्ट ठिकाणी उपलब्ध असलेल्या कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये
- फक्त विशिष्ट ठिकाणी उपलब्ध असलेल्या पार्टनर ड्रॉप बॉक्सेसमध्ये
- **व्हिजा क्रेडिट कार्ड पेमेंट**

  कार्डधारक त्यांच्या व्हिजा डेबिट कार्डमधून त्याचे क्रेडिट कार्डचे बिल भरण्यासाठी पैसे हस्तांतरित करू शकेल. कोटक एनआरआय क्रेडिट कार्डधारक त्याच्या एनआरई/एनआरओ खात्यावर दिलेल्या डेबिट कार्डच्या माध्यमातून पेमेंट करू शकेल.

(vii) बँकेकडे देय रक्कम भरण्यासाठी पाठविण्यात आलेले चेक्स/ड्राफ्ट्स अशा प्रकारे लिहिले पाहिजेत की, ते बँकेने ठरवून दिलेल्या शहरांमध्ये देय असले पहिजेत आणि जेथे कार्डधारकाचे बँकखाते असले पाहिजे आणि/किंवा तो अॅट पार देय असला पाहिजे. बँकेच्या शाखा नसलेल्या शहरांमध्ये देय असलेले चेक्स स्वीकारले जाणार नाहीत आणि यामुळे निर्माण होणारे दायित्व किंवा कार्डधारक खात्यावर लागू होणारे व्याज किंवा इतर आकार यांसाठी बँक जबाबदार नसेल. कार्डधारकाने विनंती केली तरच बाहेरगावचे चेक्स बँक परत देईल. बँकेच्या ज्या शाखांमध्ये रोख रक्कम स्वीकारली जाईल त्यांची यादी बँकेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. परंतु ह्या यादीत पूर्वसूचना न देता बदल होऊ शकतात.

(viii) केलेली कोणतीही खरेदी आणि त्यानंतर ती रद्द करणे हे दोन वेगवेगळे व्यवहार आहेत.

विलंबशुल्क किंवा इतर कोणतेही आकार टाळण्यासाठी कार्डधारकाने मासिक विवरणात दिसत असलेले सर्व खरेदीच्या व्यवहारांसाठी पैसे भरले पाहिजेत. परत देण्यात येणारे पैसे जेव्हा बँकेकडे प्राप्त होतील, तेव्हा कार्डखात्यात जमा करण्यात येतील (रद्द करण्यासाठी काही आकार असल्यास ते वजा करून). व्यवहार केल्यानंतर ३० (तीस) दिवसांच्या आत जर कार्डखात्यात क्रेडिट पोस्ट करण्यात आले नाही, तर कार्डधारकाने तात्काळ बँकेला कळवले पाहिजे.

(ix) पेमेंट करण्यात जर विलंब झाला किंवा चेक/ड्राफ्ट डिसऑनर झाला नाही किंवा करारात उल्लेख केलेल्या नियम व अटींचे उल्लंघन झाल्यास, बँकेला स्वत:च्या विवेकाधिकारात कार्डधारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता कार्डअंतर्गत पुरविण्यात आलेली पतसुविधा तात्काळ काढून घेण्याचा हक्क असेल आणि येणे बाकी असलेली संपूर्ण शिल्लक रक्कम तात्काळ देय आणि भरणा करण्याजोगी बनेल. बँक पीएमईज्ना कार्ड ऑनर न करण्याविषयीच्या आणि/किंवा वॉर्निंग बुलेटिनमध्ये कार्ड क्रमांक सूचीबद्ध करून किंवा अन्यथा कार्ड ताब्यात घेण्यासंबंधी सूचना देऊ शकेल.

(x) कोणताही चेक/ड्राफ्ट डिसऑनर झाल्यास बँक त्यासाठी शुल्क आकारील. परत पाठवलेल्या इन्स्ट्रुमेंटसाठीचे शुल्क बँकेने कळविल्यानुसार बँकेद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येईल.

(xi) येणे बाकी असलेली रक्कम वसूल करण्यासाठी बँकेला स्वत:च्या विवेकाधिकारात सर्व उपाययोजना हाती घेण्याचा अधिकार आहे, ज्यात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायदा, १८८१ अंतर्गत फौजदारी खटला दाखल करण्याचाही समावेश आहे.

(xii) कार्डधारक कबूल करतो आणि स्वीकार करतो की, बँक किंवा तिने नियुक्त केलेले प्रतिनिधी कोणत्याही वेळी कार्डवर आधी केलेल्या व्यवहारांसाठी/आकारांसाठी/शुल्कासाठीच्या पेमेंटसाठी कार्डधारकाकडे पाठपुरावा करू शकतील. बँकेने देय रक्कम जमा करण्यासाठी, प्रासंगिक बाबींसाठी केलेल्या आकारांसाठी सर्व देय रक्कम, ज्यात नूतनीकरणासाठीचे/कार्ड बदलून देण्याचे आकार, विवरणाची/चार्ज

स्लीपची नक्कल प्रत, रोख रकमेच्या अग्रीमासाठी व्यवहारशुल्क, परत आलेल्या पेमेंटसाठीचे दंडात्मक आकार आणि तशाच प्रकारचे खर्च, कर आणि जर कायदेशीर कारवाई सुरू केली, तर कायदेशीर खर्च आणि मुद्दल रक्कम व त्यावरील व्याज यांचा समावेश असेल पण तेवढ्यापुरतेच मर्यादित नसतील असे खर्च भरण्याचे मान्य करतो.

(xiii) बँक स्वत:च्या विवेकाधिकारात सर्व पोस्ट-डेटेड चेक्स नाकारू शकते.

(xiv) पेमेंटसाठी दिलेल्या चेक/ड्राफ्टवर १६ अंकी क्रेडिट कार्ड क्रमांकाचा चुकीचा उल्लेख केला म्हणून देय असणारे कोणतेही आकार भरण्यासाठी कार्डधारक जबाबदार आहे.

**१६. कार्डधारकाचा मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व**

यात जे काही म्हटले गेले आहे, त्याला बाधा न आणता, कार्डधारकाचा मृत्यू झाला किंवा त्याला कायमस्वरूपी अपंगत्व आले, तर कार्डवरील येणे बाकी रकमेसह कार्डखात्यावरील येणे बाकी असलेली कोणतीही थकीत रक्कम कोणत्याही विमासंरक्षणातून किंवा कार्डधारकाच्या वारसांकडून/एक्झिक्युटर्सकडून/ॲडमिनिस्ट्रेटर्सकडून वसून करण्यासाठी कायद्याच्या आणि इक्विटीच्या अंतर्गत उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांचा अवलंब करण्याचा हक्क बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

**१७. कुचराईचे प्रसंग**

१७.१ खाली उल्लेख केलेल्या कोणताही प्रसंग घडल्यास (यात ज्यांचा उल्लेख ''कुचराईचे प्रसंग'' असा केला गेला आहे) ते कुचराईचे प्रसंग समजले जातील आणि कुचराईच्या प्रसंगांसाठी पात्र होतील:

(i) बँकेला देय असलेली कोणतीही रक्कम देय तारखेस भरणा करण्यास कार्डधारक असमर्थ ठरला;

(ii) कार्डधारकाकडून ह्या नियम व अटींच्या अंतर्गत कोणतेही कॉव्हेनंट्स, अटी किंवा करार यांचे पालन करण्यात कुचराई झाल्यास;

(iii) चेक्स आणि/किंवा स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स यांसह बँकेला दिलेल्या कोणतेही इन्स्ट्रुमेंट सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव मान्य झाले नाहीत (डिसऑनर) किंवा त्याच्या देय तारखेस भरणा केला नाही किंवा रोखीकरण/कृती केली नाही;

(iv) कार्डधारकाकडून केले गेलेले किंवा बँकेला कार्डच्या अर्जामध्ये दिलेले किंवा अन्यथा कोणतेही निवेदन जर चुकीचे, दिशाभूल करणारे, खोटे, लबाडीचे किंवा अपूर्ण आहे असे सिद्ध झाले, ज्यात बँकेला दिलेले उत्पन्नाच्या आणि/किंवा ओळखासाठीचे कागदपत्र/दस्तऐवज यांचाही समावेश आहे, पण ते तेढ्यापुरतेच मर्यादित नाही;

(v) कार्डधारकाचा मृत्यू झाल्यास किंवा संपूर्ण आणि/किंवा कायमस्वरूपी अपंगत्व.

(vi) कार्डधारकाने दिवाळखोरीची कृत्ये केल्यास किंवा स्वत:ला दिवाळखोर म्हणून घोषित करवून घेण्यास अर्ज केल्यास किंवा कार्डधारकाला दिवाळखोर म्हणून घोषित करणारा आदेश पारित करण्यात आल्यास;

(vii) कार्डधारकाच्या आर्थिक स्थितीमध्ये कोणताही मोठा विपरीत बदल झाल्यास किंवा इतर कोणतीही अशी स्थिती जी बँकेच्या एकमेव मतानुसार बँकेच्या हितास बाधा आणणारी असेल;

(viii) कार्डधारक जर कोणत्याही दिवाणी खटल्यात किंवा फौजदारी गुन्ह्यात सामील असेल किंवा कार्डधारकाविरुद्ध कोणत्याही प्राधिकरणाने, न्यायालयाने किंवा व्यावसायिकांच्या संस्थेने कोणत्याही गैरवर्तणुकीसाठी किंवा कोणत्याही कायदच्यादे किंवा नियमावलीचे किंवा आचारसंहिता, इत्यादींचे उल्लंघन केल्यामुळे कार्डधारकाविरुद्ध कारवाई केल्यास;

(ix) बँकेने, वित्तीय संस्थांनी किंवा इतर व्यक्तींनी कार्डधारकाला पुरविलेल्या इतर कोणत्याही कर्जांच्या/सुविधांच्या बाबतीतील कोणत्याही अटी, करार, नियम आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यात कुचराई केल्यास;

(x) कार्डधारक जर बँकेला आवश्यक असलेली कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे देऊ शकला नाही किंवा कोणत्याही टप्प्यावर बँकेच्या केवायसी मापदंडांचे अनुपालन करू शकला नाही.

१७.२ या नियम व अटींच्या अंतर्गत बँकेचे जे इतर अधिकार आहेत, त्यांना बाधा न येऊ देता, कुचराईचे प्रसंग घडल्यास कार्डधारकाला वेळोवेळी बँकेच्या प्रतिनिधींकडून स्मरणपत्रे पाठवली जातील, ज्यात कार्डखात्यावरील कोणतीही थकीत रक्कम वसूलन करण्यासाठी किंवा खत्यावर/कार्डधारकावर उपाययोजनात्मक कृती करण्यासाठी भेट देऊन (बँकेच्या/बँकेने नियुक्त केलेल्या तृतीय पक्षांच्या प्रतिनिधींनी), टपालाद्वारे, फॅक्स आणि दूरध्वनी, इलेक्ट्रॉनिक मेल, एसएमएस मेसेजिंग आणि/किंवा त्यांच्या प्रतिनिधींना आठवण करून देण्यासाठी, पाठपुरावा करण्यासाठी आणि देय रक्कम गोळा करण्यासाठी कामास लावणे यांसह बँकेने नियुक्त केलेल्या तृतीय पक्षांचा समावेश आहे. बँक आणि अशा प्रकारे नियुक्त केलेला असा कोणताही तृतीय पक्ष, देय रक्कम गोळा करण्यासाठी वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या बँकेच्या आदर्श आचारसंहितेचे पालन करील.

१७.३ जर कार्डधारकाने कोणतीही कुचराईची कृती केली, तर यात किंवा बँक आणि कार्डधारक यांच्यामध्ये समझोत्यासाठीच्या इतर कोणत्याही करारात/दस्तऐवजात त्याविरोधात काहीही म्हटलेले असले तरी, बँक तिच्या विवेकाधिकारात खालील गोष्टींसाठी हक्कदार असेल:

(i) कार्डधारकाला देण्यात आलेल्या कार्डवरील सर्व सुविधा तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी मागे घेणे, ज्यानंतर हा करार त्यानंतर संपुष्टात आला असे गृहीत धरण्यात येईल.

(ii) त्यानंतर पुढे ह्या नियम व अटींच्या अंतर्गत आणि/किंवा बँक आणि कार्डधारक यांच्यामधील करार, दस्तऐवज किंवा इन्स्ट्रुमेंट्स अंतर्गत बँकेला देय असलेली कार्डवरील सर्व येणे बाकी असलेली रक्कम तिच्यावरील व्याजासह/आकारांसह आणि शुल्कांसह भरण्यासाठी कार्डधारकाला सांगण्यात येईल.

(iii) बँक तिचा धारणाधिकाराचा (लीन) हक्क बजावील आणि ती रक्कम बँकेत कार्डधारकाच्या नावे येणे बाकी असलेले कोणतेही पैसे/ठेवी/खाती यांच्यासाठी विनियोग करील किंवा पैशांचा उपयोग कायद्यानुसार करील.

(iv) कोणत्याही धारणाधिकाराच्या/विनियोगाच्यासाठी बँकेला कार्डधारकाकडून येणे बाबी असलेली रक्कम बँकेला योग्य वाटेल अशा कायदेशीरपणे वसूल करील.

१७.४ कार्डधारकाने निदान किमान देय रक्कम भरली नाही, तर त्यासंबंधीची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) अधिकृत केलेल्या क्रेडिट ब्युरोज्ना मासिक सादरीकरणात कळविली जाईल. कार्डधारकांना त्यांची देय रक्कम त्यानंतरच्या विवरणात देण्याची आठवण करून देण्यात येईल. ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत शिल्लक रक्कम असल्यास कार्डधारक 'विलफूल डिफॉल्टर' आहे असे कळविण्यात येईल. हे विवरण म्हणजे कार्डधारकाचे हे स्टेटस माहिती देण्यासंबंधीची सूचना आहे असे मानण्यात येईल. जर आवश्यक ते पेमेंट करण्यात आले, तर कार्डधारकाचे रेकॉर्ड, क्रेडिट ब्युरोला पुढील अपडेटमध्ये 'करंट' म्हणून कळविण्यात येईल.

१७.५ बँकेला पुढील परिस्थितीत कोणताही डिफॉल्ट रिपोर्ट मागे घेण्याचा हक्क असेल:

(i) संबंधित कुचराई करणाऱ्याने (डिफॉल्टर) त्याची संपूर्ण थकीत रक्कम बँकेकडे भरणा केली किंवा बँकेला येणे असलेली रक्कम भरली.

(ii) बँकेने किंवा बँकेच्या विरोधात दाखल केलेल्या कायदेशीर प्रकरणातील निकालात कार्डधारकाचे नाव अशा यादीतून काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले. वैयक्तिक पुनरावलोकन केल्यानंतर प्रत्येक प्रकरणानुसार निर्णय घेतले जातील.

(iii) वर उल्लेख केलेल्या परिस्थितीत कार्डधारकाचे रेकॉर्ड पुढील मासिक रिफ्रेशमध्ये क्रेडिट ब्युरोज्कडे 'करंट' म्हणून अपडेट केले जाईल.

१७.६ कुचराई झाल्यास बँक ह्या करारांतर्गतच्या तिच्या कोणत्याही विशिष्ट हक्कांस बाधा न येऊ देता, कार्डधारकाला पूर्वसूचना देऊन कोणत्याही वेळी कार्डधारकाची सर्व किंवा कोणतीही खाती एकत्रित करून अशा एका किंवा अधिक खात्यांमध्ये शिल्लक असलेली कोणतीही रक्कम किंवा रकमा भरपाई करून घेईल किंवा हस्तांतरित करील किंवा बँकेने इतर बाबींसाठी धारण केलेल्या मालमत्तेवर धारणाधिकार/बँकर्स लीन बजावील, मग अशी दायित्वे वास्तविक असोत वा आकस्मिक, प्रायमरी, कोलॅटरल आणि वेगवेगळी किंवा संयुक्त असोत.

१७.७ कार्डधारक हे स्पष्टपणे कबूल करतो आणि स्वीकार करतो की, कार्डधारकाकडे जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक कोटक क्रेडिट कार्ड्स असतील, आणि जर त्यापैकी एका कार्डच्या बाबतीत कुचराई झाली, तर कार्डधारकाला त्याच्या इतर सर्व कोटक क्रेडिट कार्ड्सवर उपलब्ध करून देण्यात आलेली पतमर्यादा ब्लॉक करण्याचा तसेच अशा सर्व कार्ड्सवर उपलब्ध करून देण्यात आलेले सर्व विशेष अधिकार/फायदे मागे घेण्याचा बँकेला अधिकार आहे.

## १८. आकार आणि शुल्क

१८.१ सामील होण्यासाठीचे शुल्क, वार्षिक शुल्क आणि नूतनीकरण शुल्क, बँकेला दर्शविले/कळविले गेले नाही, तर प्रायमरी कार्डधारक आणि ॲड-ऑन कार्डधारक ह्या दोहोंसाठी लागू असतील. प्रत्येक कार्डधारकासाठी असलेले शुल्क आणि आकार वेगवेगळे असू शकतात.

१८.२ कार्डधारकाला कार्ड किंवा पिन देण्याबद्दल, पुन्हा देण्याबद्दल आणि कोणतेही ॲड-ऑन कार्ड देण्याबद्दल, वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार आकार लावण्याचा आणि/किंवा कार्डवर केलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी कोणताही शुल्क/आकार घेण्याचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे. लागू असलेले शुल्क आणि आकार यांचे तपशील बँकेकडून प्राप्त केले जाऊ शकतील आणि ते वेळोवेळी बदलू शकतात.

१८.३ बँकेच्या विवेकाधिकाराच्या अधीन राहून, तुमच्या कार्डवरील पेमेंटची देय तारीख विवरणाच्या तारखेनंतर १८ ते २१ दिवसांनंतरची असेल (तुमच्या पेमेंटच्या नेमक्या तारखेसाठी कृपया तुमचे विवरण तपासून पहा). म्हणून क्रेडिटसाठीचा मोफत कालावधी तुमच्या पेमेंटच्या देय तारखेनुसार १८-४८ दिवस ते २१-५१ दिवस असा असू शकतो. कार्डधारकाला पूर्वसूचना देऊन कोणत्याही वेळी सवलतीचा कालावधी बदलण्याचा अधिकार बँकेला आहे.

१८.४ कार्डधारक हे मान्य करतो की, कार्डधारकाने जर आधीच्या महिन्याची शिल्लक रक्कम पूर्णतः भरली नाही, तर सदरचा व्याजमुक्त पतकालावधी लागू होणार नाही. अशा प्रकारचे कोणतेही शुल्क आणि/किंवा आकार हे शुल्क किंवा आकार लागू झाल्यानंतर/बिल केल्यानंतर कार्डधारकाच्या खात्यातून आपोआप वजा केले जातील.

१८.५ कार्डधारकाला असा सल्ला देण्यात यावा की, काही एटीएमचे मालक किंवा शेअर्ड नेटवर्क्सचे ऑपरेटर्स प्रत्येक वेळी एटीएम/इतर डिव्हाईसचा वापर केल्यास अतिरिक्त आकार लावू शकतात आणि अशा प्रकारचा कोणताही आकार व त्यासोबतचे लागू असलेले

शुल्क/आकार कार्डखात्यातून वजा केले जातील.

१८.६ भारत सरकारच्या नियमावलीनुसार लागू असलेले सर्व शुल्क, व्याज आणि इतर आकार यांवर भारत सरकारने वेळोवेळी निश्चित केलेले सर्व सेवाकर, जीएसटी कोणतेही/सर्व लागू असले कर ज्यात सेसचाही समावेश असेल, ते लागू असतील. कार्डधारक त्यासाठी पैसे भरण्यास बांधील असेल. असा सेवाकर लावण्यात केंद्र सरकारने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार बदल होऊ शकतात. सरकारने वेळोवेळी घोषित करू शकेल असे लागू असलेले इतर कर भरण्याचे कार्डधारक मान्य करतो.

१८.७ कार्डधारक बँकेला त्याच्या कार्डच्या संबंधात जे पैसे देणे लागतो ते गोळा करण्यासाठी जे कोणते उत्पादनखर्च आकार आणि/किंवा खर्च करील ते त्याच्या कार्डखात्यातून वजा करण्याचे अधिकार देतो आणि त्याविषयी हमी देतो (ज्यात कायद्याने मान्य असलेल्या वकिलाला दिलेल्या योग्य त्या फीचा समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही).

१८.८ विशिष्ट कार्डधारकांसाठी किंवा विशिष्ट कालावधीसाठी सर्व किंवा काही शुल्क/आकार बँक ठरवू शकते. कार्डधारक मान्य करतो की, यामुळे कार्डधारकाला कोणतेही शुल्क/आकार सोडून देण्याचा गर्भित हक्क देत नाही आणि अशा प्रकारची सूट बँकेच्या एकमेव विवेकाधिकारात दिली जाईल.

१८.९ कार्डचा उपयोक करून केलेल्या व्यवहारासाठी कार्डधारक तात्काळ पैसे भरण्यासाठी उत्तरदायी बनेल, ह्याचा विचार न करता, जर काही येणे बाकी रक्कम असेल (बिल केलेली असो वा नसो; किमान देय रकमेपेक्षा जास्त किंवा कमी) आणि ती पेमेंटच्या देय तारखेस भरलेली नसेल, तर अशा थकीत रकमेवर विलंबशुल्कासह (लागू असल्यास) व्याज भरावे लागेल. लागू केलेला व्याजाचा आकार हा कार्डच्या प्रकारानुसार किंवा कार्डधारकानुसार विशिष्ट असू शकतो आणि तो वापर आणि पेमेंटचा पॅटर्न यावर आधारित असू शकतो. लागू असलेला व्याजाचा आकार बँक कार्डधारकाला एकतर आकारांच्या सूचीत, मासिक विवरणात, ईमेल नोटिफिकेशनमधून किंवा पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पत्र पाठवून किंवा बँकेला योग्य वाटेल अशा प्रमोशनल साहित्यातून उघड करून सांगेल. परंतु हा व्याजाचा आकार सूचना न देता बदलू शकतो आणि बँकेला वेळोवेळी योग्य वाटेल त्यानुसार, खालीलपैकी कोणत्याही प्रसंगातून असे दर लागू करील:

१८.१० कार्डधारकाने जर शेवटच्या एकूण शिल्लक रकमेपेक्षा (क्लोजिंग बॅलन्स) कमी पेमेंट केले, तर बिलिंगच्या तारखेपासून येणे बाकी असलेल्या संपूर्ण रकमेवर व्याज लागेल. बिलिंग तारखेच्या नंतर केलेल्या पण विवरणात समाविष्ट न केलेल्या सर्व व्यवहारावरही असे व्यवहार केल्याच्या तारखेपासून व्याज लागेल. न भरलेल्या रकमेवरील व्याजाचा हा आकार ('एकूण देय रक्कम' आणि भरलेली रक्कम यांमधील फरक) संपूर्ण रक्कम भरीपर्यंत चालूच राहील.

१८.११ 'किमान देय रकमेपैकी' जर काही रक्कम भरली गेली नाही, तर ती पुढे नेली जाऊन पुढील मासिक विवरणात 'किमान देय रकमेत' जोडली जाईल आणि वर वर्णन केल्याप्रमाणे त्यावर व्याज लागेल.

१८.१२ जर 'पेमेंटच्या देय तारखेपूर्वी''किमान देय रक्कम' किंवा तिचा काही भाग भरला गेला नाही, तर लागू असल्यानुसार विलंब आकार लावला जाईल. हा विलंब आकार आकरांच्या सूचीमध्ये देण्यात आलेला आहे आणि तो बदलू शकतो. कोणतीही किमान देय रक्कम किंवा तिचा काही हिस्सा जर भरला गेला, तर तिचे पेमेंट बँकेला प्राप्त झाल्याच्या तारखेनंतर त्यावर व्याज लावले जाणार नाही.

१८.१३ कार्डचा उपयोग करून केलेल्या सर्व व्यवहारांवर व्यवहारशुल्क आणि व्याजाचा आकार (लागू असल्यास) बँकेने वेळोवेळी ठरवल्यानुसार लागेल.

१८.१४ परकीय चलनातील सर्व व्यवहारांसाठीचे विनिमय दर बँकेद्वारे ठरवले जातील आणि ते कार्डधारकावर बंधनकारक असेल.

१८.१५ जर येणे बाकी असलेली एकूण रक्कम ही पतमर्यादेपेक्षा अधिक असेल, तर पतमर्यादेपेक्षा अधिक झालेल्या रकमेवर अतिरिक्त आकार लावला जाईल. हा आकार आकारांच्या सूचीत दिलेला आहे आणि तो कोणतीही सूचना न देता लावला जाईल आणि तो बँक वेळोवेळी ठरवील त्या दरांनी आकारला जाईल.

१८.१६ आकार आणि शुल्क वेळोवेळी लागू होतील त्यानुसार कार्डधारकाने त्याच्या कार्डखात्याच्या बाबतीत बँकेने कार्डधारकाला पुरविलेल्या सेवांच्या बाबतीत केलेल्या कुचराईबद्दल त्याने भरावयाचे असतात.

१८.१७ ज्या मर्चंट एस्टॅब्लिशमेंट्चे वर्गीकरण व्हिजाने 'फ्युअल' आणि 'रेल्वे' मर्चंट कॅटेगरी कोड (एमसीसी) अंतर्गत केलेले असेल, फक्त त्यांच्यासोबत केलेल्या व्यवहारांवरच इंधन आणि रेल्वे अधिभारात कार्डधारकांना सूट (वेव्हर) दिली जाईल. यात पेट्रोल पंप, रेल्वे तिकीट खिडक्या आणि भारतीय रेल्वेच्या अधिकृत तिकीट बुकिंग संकेतस्थळ यांचा समावेश होतो. सूट मिळण्यासाठी पात्र असलेल्या व्यवहाराच्या कमाल आणि किमान रकमेसाठी तसेच जास्तीतजास्त किती रकमेसाठी सूट मिळवता येते हे पाहण्यासाठी टॅरिफ अनेक्स्चर पहा. व्यवहार करून झाल्यानंतर कार्डधारकाच्या कार्डखात्यात अधिभारातील सूट दिसून येईल. कार्डधारकाला व्यवहाराची संपूर्ण रक्कम बिल करण्यात येईल आणि अधिभारातील सूट क्रेडिट एंट्री म्हणून दिसून येईल. जर एखाद्या मर्चंट एस्टॅब्लिशमेंटने व्हिजाने व्याख्या केल्यानुसार अचूक एमसीसी अंतर्गत तिचे एमआयडी (मर्चंट आयडी) मॅप केलेले नसेल, तर कार्डधारक अधिभारात कोणतीही सूट मिळण्यास पात्र नसेल. इंधनावरी अधिभारातील सूट हे वैशिष्ट्य अर्बेन, ट्रंप/फीस्ट, पीव्हीआर गोल्ड आणि पीव्हीआर प्लॅटिनम/इसेन्शिया प्लॅटिनम क्रेडिट कार्ड्सवर उपलब्ध नाही. रेल्वे अधिभारातील सूट हे वैशिष्ट्य अर्बेन, फॉर्च्युन, फीस्ट/ट्रंप

पीव्हीआर गोल्ड आणि पीव्हीआर प्लॅटिनम/इसेन्शिया प्लॅटिनम आणि सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम क्रेडिट कार्ड्सवर उपलब्ध नाही.

१८.१८ जर रेल्वे तिकीट रद्द केले गेले, तर सूट दिलेली अधिभाराची रक्कम परत घेतली जाईल आणि ती कार्डधारकाच्या कार्डखात्यातून वजा केली जाईल.

१८.१९ तुम्ही जर देय तारखेपूर्वी आधीच्या बिलाची पूर्ण रक्कम भरली नाही, तर तुम्हाला डेली अ‍ॅक्रुअल बेसिसवर व्याज आकारले जाईल; व्यवहाराच्या तारखेपासून ते रक्कम पूर्ण भरल्याच्या तारखेपर्यंत व्याज आकारले जाईल. तुमचा खर्च, पेबॅक आणि वापर करण्याचा पॅटर्न यांनुसार व्याजाचे दर दरमहा ३.५% (वार्षिक ४२.०%) पर्यंत बदलू/वाढू शकतात. पूर्ण रक्कम जर देय तारखेच्या नंतर पण पुढील महिन्याच्या विवणाच्या आधी प्राप्त झाली तरीही व्याज आकारले जाईल. तुम्ही जर काही अंशी पेमेंट करीत आलात पण तुम्ही चालू विवरणातील बाकी रक्कम, पेमेंटच्या देय तारखेस किंवा त्याआधी भरली, तर चालू विवरणातील एकूण येणे रकमेवर पूर्ण पेमेंट करीपर्यंत व्याज आकारले जाईल. अशा प्रकारे आकारण्यात आलेले व्याज त्यानंतरच्या विवरणात प्रतिबिंबित होईल, उदाहणार्थ, २० जून रोजीच्या विवरणातील शिल्लक रक्कम ₹५००० आहे. पेमेंटची देय तारीख ८ जुलै आहे. ₹५००० चे पेमेंट १ जुलै रोजी केले. ₹५००० च्या वर १० दिवसांचे व्याज २० जुलैच्या विवरणात बिल केले जाईल.

१८.२० सर्व रोख रकमेचे अग्रीम/पैसे काढणे यांवरही व्यवहाराच्या तारखेपासून ते रक्कम भरीपर्यंत (सेटलमेंट) लागू असलेल्या व्याजदराने व्याज आकारले जाईल.

१८.२१ कोटक फॉर्च्युन आणि कोटक ८११# ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्डधारकांना सर्व रोख रकमेच्या अग्रीमांवर व्याजमुक्त कालावधीचा लाभ मिळेल. हा व्याजमुक्त कलावधी अशा प्रकारे रोख रक्कम काढल्यापासून सुरू होऊन त्या विशिष्ट बिलिंग सायकलच्या पेमेंटच्या देय तारखेस संपतो. त्या विशिष्ट बिलिंग सायकलच्या पेमेंटच्या देय तारखेनंतर जर शिल्लक रक्कम येणे बाकी असेल, तर लागू असलेल्या दरानुसार व्याज आकारले जाईल आणि हे व्याज व्यवहाराच्या तारखेपासून आकारले जाईल.

## १९. शेड्यूल ऑफ चार्जेस/आकारांची सूची

१९.१ कार्डधारकाला लागू असलेले आणि त्याने देय असलेली सर्व शुल्क आणि आकार हे कार्डधारकाला स्वतंत्रपणे देण्यात आलेल्या आणि त्याशिवाय बँकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या सर्वात महत्त्वाचे नियम व अटी (एमआयटीसी) अंतर्गत असलेल्या आकारांच्या सूचीत देण्यात आलेले आहेत.

१९.२ आकारांच्या सूचीत नमूद करण्यात आलेले सर्व शुल्क आणि आकार यांमध्ये बँकेने ठरावीक कालावधीनंतर केलेल्या पुनरावलोकनाच्या आधारे बदल होऊ शकतात. शुल्क आणि आकारांमध्ये काही बदल झाल्यास त्याविषयी कार्डधारकाला वेळोवेळी कळविण्यात येईल. बँकेला योग्य वाटेल त्यानुसार, कार्डधारकाला योग्य ती सूचना देऊन कोणतेही नवीन शुल्क किंवा आकार सुरू करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

## २०. व्हिजाकडून आणीबाणीच्या प्रसंगीच्या सेवा

कोटक महिंद्रा बँक व्हिजा कार्ड्ससाठीच्या आणीबाणीच्या प्रसंगीच्या सेवांसाठी पत्रव्यवहार आणि व्यवस्था तृतीय पक्षीय सेवापुरवठादाराकडून पुरविल्या जातात आणि त्यासाठी व्हिजा इंटरनॅशनलकडून पैसे दिले जातात. वापरलेल्या कोणत्याही वैद्यकीय, कायदेशीर किंवा इतर सेवांसाठीच्या खर्चासाठी कार्डधारक जबाबदार असेल. सर्वोत्तम प्रयत्न करून मदत केली जाते आणि त्यात्या वेळेच्या समस्या, अंतर किंवा ठिकाणे यामुळे ती उपलब्ध नसू शकते. व्हिजा तृतीय पक्षीय सेवा पुरविणाऱ्यांनी सुचविलेले आणि/किंवा ठरवून दिलेले वैद्यकीय आणि/किंवा कायद्याच्या क्षेत्रातील व्यावसायिक हे व्हिजा तृतीय पक्ष सेवा पुरविणाऱ्यांचे कर्मचारी नसतात किंवा व्हिजाचे कर्मचारी किंवा ठेकेदार नसतात, म्हणून ते कोणत्याही वैद्यकीय, कायदेशीर किंवा वाहतूक सेवांचा उपयोग, कृती, कृती न करणे किंवा परिणाम यासाठी ते जबाबदार नसतील. बँक किंवा बँकेची जगभरातील कोणतीही शाखा अशा प्रकारच्या सेवांची जबाबदारी किंवा व्यवस्था करण्याची जबाबदारी घेत नाहीत.

## २१. तृतीय पक्षीयांची वैशिष्ट्ये आणि त्यांच्या सेवा

२१.१ कार्डधारकाला कार्डसोबत पुरविण्यात आलेल्या कोणत्याही किंवा सर्व वैशिष्ट्यांमध्ये भर घालण्याचा/ती काढून टाकण्याचा/त्यांमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे. बँक कार्डशी जोडलेल्या प्रमोशनल वैशिष्ट्यांमध्ये भर घालण्याचा/तयार करण्याचा प्रयत्न करील. परंतु हे फक्त सर्वोत्तम प्रयत्न करून करण्याचा प्रयत्न केला जाईल आणि ह्या प्रमोशनल वैशिष्ट्यांपासून उद्भवणारा कोणताही वाद म्हणजे बँकेची जबाबदारी समजला जाणार नाही.

२१.२ खरेदी केलेल्या वस्तू/प्राप्त केलेल्या सेवा यांसाठी कार्डधारकाला डिस्काऊंट देण्यासाठी बँक काही मर्चंट्ससोबत व्यवस्था करू शकेल. परंतु अशा मर्चंट्ससोबत कार्डधारकाच्या उद्भवणाऱ्या वादासाठी बँकेला जबाबदार किंवा उत्तरदायी धरता येणार नाही.

२१.३ कार्डधारकाला सवलतीच्या दरात सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बँक तृतीय पक्षीय सेवा पुरविणाऱ्यांसाठी समझोता (टाय-अप) करू शकेल. बँक त्यांच्या सेवेच्या दर्जाविषयी अजिबात समर्थन करीत नाही आणि जर अशी सेवा दोषयुक्त किंवा असमाधानकारक असेल, तर त्यासाठी बँक जबाबदार नसेल.

२१.४ कार्डधारकाने अशा तृतीय पक्षांकडून खरेदी केलेल्या वस्तूंच्या किंवा सेवांच्या मर्चंडाइझ, मर्चंडाईझ वॉरंटी यासाठी बँक कोणत्याही प्रकाररे जबाबदार नसेल, ज्यात कार्डधारकाला उशिराने डिलिव्हरी मिळणे, डिलिव्हरी न मिळणे, वस्तू न मिळणे किंवा सदोष वस्तू मिळणे याचाही समावेश असेल.

२२. **पेमेंट नाकारण्याची क्षमता**

कायद्याने आवश्यक असल्याचा अपवाद वगळून जर बँकेला कोणतीही प्रोसेस, समन्स, आदेश, मनाई हुकूम, अंमलबजावणी, लेव्ही, धारणाधिकार, माहिती किंवा नोटीस प्राप्त झाली, ज्यामुळे बँकेला प्रामाणिकपणे असे वाटले की, त्यामुळे व्यवहार करण्यासाठी कार्डधारकाच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित होत असेल किंवा कार्डधारकाद्वारे ज्या इतर कोणाला अधिकृत करण्यात येत असेल त्याच्या क्षमतेवर पश्न निर्माण होत असेल, तर बँक स्वत:च्या विवेकाधिकारात आणि कार्डधारकाची किंवा अशा प्रकारच्या दुसऱ्या व्यक्तीची कोणतीही जबाबदारी न घेता कार्डधारकाला त्याच्या पतमर्यादेपैकी कोणताही हिस्सा काढू देण्यास नकार देऊ शकेल आणि कार्डधारकाकडून थकीत रक्कम (काही असल्यास) वसूल करण्यासाठी इतर कोणतीही पावले उचलील.

२३. **सुविधांमध्ये भर घालणे आणि त्या काढून घेणे**

२३.१ बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कार्डधारकाला त्याच्या सोयीसाठी आणि वापरासाठी जास्तीची एटीएम्स, ईडीसी-पीओएस, आणि/किंवा शेअर्ड नेटवर्कच्या माध्यमातून इतर डिव्हायसेस (यानंतर ज्यांचा उल्लेख ''डिव्हायसेस'' असा केलेला आहे) उपलब्ध करून देऊ शकेल. ह्या डिव्हायसेसवर केलेल्या व्यवहारांसाठीचे सर्व शुल्क, आकार, बँकेने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार कार्डखात्यातून वजा करून वसूल केले जाईल. कार्डधारकाला हे समजते आणि तो मान्य करतो की, अशा शेअर्ड नेटवर्कमधून वेगळ्या प्रकारची फंक्शनॅलिटी, सर्व्हिस ऑफरिंग्ज पुरविले जाऊ शकतात आणि लाभ घेतलेल्या सेवांसाठी आणि/किंवा लोकेशन्ससाठी वेगळे आकार असू शकतात.

२३.२ बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कोणत्याही वेळी कार्डधारकाला पूर्वसूचना न देता, कार्डखात्यांवर एटीएममध्ये/भारतातील किंवा भारताबाहेरील इतर डिव्हायसेसवरील कार्ड वापरण्याची आणि/किंवा त्याच्याशी संबंधित सेवा वापरण्याची सुविधा मागे घेण्यास, खंडित करण्यास, रद्द करण्यास, निलंबित करण्यास किंवा बंद करण्यास हक्कदार असेल आणि अशा प्रकारच्या निलंबनामुळे किंवा रद्द करण्यामुळे कार्डधारकाला सहन करावा लागणारा कोणताही तोटा किंवा हानी यासाठी बँक जबाबदार नसेल. सुविधा मागे घेणे, खंडित करणे, रद्द करणे, निलंबित करणे किंवा बंद करणे यापैकी काही केल्यानंतर बँक कार्डधारकाला सूचित करील. कार्डधारकाने त्याच्या कार्डखात्यावर केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत बँक वगळता इतर कोणतीही संस्था कार्डधारकासाठी उत्तरदायी किंवा जबाबदार नसेल.

२३.३ देखभाल (मेंटेनन्स): सेवांच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ शकेल अशा देखभालीच्या कामाविषयीची आगाऊ सूचना सर्वोत्तम प्रयत्न करून दिली जाईल, तरीसुद्धा बँकेला योग्य वाटेल त्यानुसार कोणतीही पूर्व सूचना न देता एटीएम/इडीसीची किंवा तत्समान इतर डिव्हायसेसची सेवा किंवा सर्व किंवा कोणतीही सेवा पुरविणे, मग ते नेहमीच्या देखभालीमुळे असो वा इतर कोणत्याही कारणामुळे असो, निलंबित करण्याचा हक्क बँक राखून ठेवीत आहे.

२४. **परकीय चलनाविषयी मार्गदर्शक सूचना**

२४.१ जर पाठवावयाची रक्कम (रेमिटन्स) परवनगी दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी किंवा सममूल्य असेल आणि सत्कृद्दर्शनी जर विनिमय नियमन नियमावलीचे पालन करणारे असेल, तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्डधारकाने विनिमय नियमन नियमावलीनुसार परवानगी देण्यात आलेल्या हेतूंसाठी कार्डचा उपयोग केल्याचा पुरावा म्हणून इन्व्हॉईस/बिले यांसारखा कागदोपत्रीचा पुरावा देण्याची गरज असते.

२४.२ आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जर परदेशात दिलेल्या भेटींदरम्यानची कार्डच्या वापराची रक्कम कार्डधारकाच्या परकीय चलन पात्रतेपेक्षा जास्त असेल, तर वापरलेल्या परकीय चलनाचा कागदोपत्री पुरावा कार्डधारकाने सादर केला पाहिजे. ही बाब विनियम नियंत्रण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयास कळविण्याचा अधिकार बँकेला आहे.

२४.३ परकीय विनिमय नियमावलीनुसार कार्डधारकाने प्रत्येक परकीय चलनातील व्यवहारासाठी त्याचा पासपोर्ट एंडॉर्स करण्याची आवश्यकता नाही, परंतु जर या नियमावलीत बदल झाला, तर कार्डधारक हे कबूल करतो की, नवीन नियमावलीचे पालन करणे ही त्याची एकट्याची जबाबदारी असेल. तथापि, कार्डधारकाच्या वतीने कोणतीही कागदपत्रे भरण्यास किंवा सादर करण्यास बँक जबाबदार नसेल आणि कार्डधारकाने त्याचे पालन केले नाही, तर होणाऱ्या परिणामांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी नसेल.

२४.४ जी व्यक्ती निवासी भारतीय आहे, तिला बँक क्रेडिट कार्ड देईल. कार्डधारकाने बँकेला सादर केलेल्या अर्जामध्ये केलेली विधाने/घोषणा यांच्या आधारे बँक फक्त अनिवासी भारतीयांना एनआरआय कोटक क्रेडिट कार्ड देईल. कार्डधारकाच्या निवासाच्या स्थितीत जर बदल झाला, तर त्याविषयी बँकेला तात्काळ कळविणे हे कार्डधारकाचे कर्तव्य असेल.

२५. **उत्तरदायित्वातून अपवर्जन (सुटका)**

२५.१ कार्डधारक कबूल करतो की, पुढील बाबतीत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या होणाऱ्या नुकसानासाठी किंवा हानीसाठी बँक

कार्डधारकासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल:

(i) पीएमईने पुरविलेल्या कोणत्याही वस्तू किंवा सेवांमधील दोष;

(ii) कार्ड स्वीकारण्यास इतर कोणत्याही बँकेने किंवा पीएमईने दिलेला नकार;

(iii) कार्डधारकाव्यतिरिक्त इतरांना व्यवहाराच्या सूचना देणे, कार्डधारकाच्या निष्काळजीपणा, चूक, अप्राणिकपणा, गैरवर्तन, लबाडीने इतर व्यक्तीला कार्ड हाताळण्यास देणे यामुळे झालेला कार्डचा गैरवापर;

(iv) मशीन/तांत्रिक चुकांमुळे/बिघडल्यामुळे, बँकेच्या नेटवर्कमध्ये किंवा इतर बँकांच्या नेटवर्कमध्ये तांत्रिक ब्रेकडाऊनमुळे पीए/टर्मिनलने काम न करणे/सदोष काम करणे;

(v) कार्डची मुदत संपण्यापूर्वी कार्ड सुपूर्द करण्यासाठी मागणी करण्याच्या बँकेच्या हक्काची अंमलबजावणी करण्याची तारीख कार्डच्या दर्शनी भागावर एंबॉस केलेली आहे, ज्यात अशी मागणी आणि सुपूर्द करणे आणि/किंवा बँकेने किंवा बँकेने नियुक्त केलेल्या व्यक्तीने किंवा कोणत्याही एटीएम/ईडीसी मशीनच्या माध्यमातून प्राप्त करणे;

(vi) बँकेने कोणतेही कार्ड किंवा कार्डखाते बंद करण्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करणे;

(vii) कार्डधारकाच्या पतप्रतिष्ठेला आणि नावलौकिकाला पोहोचलेली कोणतीही हानी, जी कार्ड पुन्हा ताब्यात घेतल्यामुळे आणि/किंवा ते परत करण्यासाठी केलेली कोणतीही विनंती किंवा कोणत्याही पीएमईने किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियाने कार्ड ऑनर करण्यास किंवा स्वीकारण्यास नकार देणे किंवा कार्डवर केलेली सर्व खरेदी ताब्यात घेणे किंवा कोणत्याही एस्टॅब्लिशमेंटने/मेल ऑर्डर एस्टॅब्लिशमेंटने कार्ड ऑनर करण्यास किंवा स्वीकारण्यास नकार देणे यामुळे घडून आली असा दोषारोप केला जातो;

(viii) आरबीआयने वेळोवेळी निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसारच्या परकीयच चलन पात्रतेची मर्यादा ओलांडल्यामुळे आकारात घट होणे किंवा कार्डधारक त्याच्या पात्रतेची मर्यादा ओलांडीत आहे अशी बँकेला माहिती मिळणे;

(ix) बँकेने किंवा तिच्या एजंट्सने किंवा प्रतिनिधींनी कोणतेही चुकीचे विधान, चुकीचे निवेदन, चूक किंवा कृती न करणे;

(x) कोणतेही कम्युनिकेशन किंवा इतर उपकरण बिघडल्याने कार्डधारकाला एटीएममधून रोख रक्कम काढता न येणे;

(xi) एटीएम/पीएमईमधील कोणत्याही कारणामुळे कोणत्याही व्यवहारास नकार मिळणे.

२५.२ सिस्टीम किंवा उपकरण निकामी झाल्याने किंवा बँक तृतीय पक्षांच्या उत्पादनावर अवलंबून राहिल्याने किंवा एकमेकांवर अवलंबून राहिल्याने कोणतीही सेवा निकामी होणे किंवा त्यात अडथळे येणे (डेटा गहाळ झाल्यासह, पण तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही) यामुळे झालेल्या नुकसानासाठी किंवा हानीसाठी बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नाही, ज्यात इलेक्ट्रिसिटी किंवा टेलिकम्युनिकेशन्सचाही समावेश होतो, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही. निसर्गाचा कोप, दंगली, यादवी युद्ध, सरकारविरुद्धचा उठाव, महायुद्धे किंवा नियंत्रणापलीकडील इतर कोणतीही कारणे किंवा संप किंवा टाळेबंदी यांच्या परिणामांसाठी बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नाही.

२५.३ कार्डधारकाच्या सूचनांचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारे अपयश आले म्हणून, जेव्हा असे अपयश बँकेच्या नियंत्रणापलीकडे असलेल्या कारणांमुळे आलेले असते, तेव्हा होणाऱ्या नुकसानासाठी किवा हानीसाठी बँक जबाबदार नसेल; या बाबतीतील बँकेचे मत अंतिम असेल.

२५.४ कार्डच्या सुविधेसाठी अर्ज करून तिचा लाभ घेऊन कार्डधारक त्याने केलेले व्यवहार पूर्ण करण्यास कार्डधारक बँकेला स्पष्टपणे अधिकार देत आहे. पिन वगळता अन्य कोणत्याही मार्गांनी केलेल्या व्यवहाराची अधिकृतता पडताळून पाहण्याची जबाबदारी बँकेची नसेल.

२५.५ कोणत्याही परिस्थितीत बँक कार्डधारकाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला झालेल्या नुकसानाचे किंवा हानीचे दावे, मग ते प्रत्यक्ष असोत वा अप्रत्यक्ष, प्रासंगिक, परिणामस्वरूपी असोत, मग असा दावा महसुलाचे, गुंतवणुकीचे, उत्पादनाचे, ख्यातीचे, नफ्याचे, व्यवसायातील अडथळ्यामुळे झालेले नुकसान असले तरीही किंवा कोणत्याही प्रकारचे किंवा स्वरूपाचे नुकसान यासाठी बँक जबाबदार नसेल.

२५.६ जर कार्डधारकाकडून बँकेने किंवा बँकेच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने येणे थकीत रकमेसाठी मागणी केली, तर कार्डधारक मान्य करतो आणि कबूल करतो की, अशी मागणी किंवा दावा म्हणजे कोणत्याही प्रकारे अब्रुनुकसानीची कृती नसेल किंवा कार्डधारकाच्या चारित्र्याला बाधा आणणारे किंवा प्रतिबिंबित होणारे कृत्य नसेल आणि कार्डधारक या बाबतीत बँकेला आणि तिच्या कर्मचाऱ्यांना अशा जबाबदारीतून मुक्त करीत आहे.

## २६. कोटक महिंद्रा बँक रिवॉर्ड्स प्रोग्रॅम

कार्डच्या प्रकाराच्या आधारावर कार्डधारकाला बँक रिवॉर्ड प्रोग्रॅम(''प्रोग्रॅम्स'') देऊ करील. या प्रोग्रॅममुळे कार्डधारकाने त्याच्या कार्डवर देशांतर्गत/परदेशात केलेल्या खरेदी केलेल्या वस्तू आणि सेवांसाठी भरलेल्या वैध आकारांवर आणि बँकेने वेळोवेळी या प्रोग्रॅमसाठी समाविष्ट केलेल्या इतर कोणत्याही आकारांवर रिवॉर्ड पॉईंट्स प्राप्त करण्याची संधी मिळते. या प्रोग्रॅममध्ये अतिरिक्त नियम व अटी लागू केल्या जाऊ शकतात, ज्या कार्डधारकाला स्वतंत्रपणे कळविल्या जातील.

**२७. नुकसानभरपाई**

२७.१ बँकेला, तिच्या ग्राहकांना किंवा तृतीय पक्षांना झालेले कोणतेही नुकसार किंवा हानी व खर्च, तसेच कार्डधारकांनी किंवा त्यांचे कोणतेही एजंट्स, कर्मचाी आणि असोसिएट्स यांनी केलेल्या वापराच्या संबंधात तृतीय पक्षांनी आणलेले कोणतेही दावे किंवा कारवाई यासाठी कार्डधारक बँकेला नुकसानभरपाई देण्याचे व इजा पोहोचू न देण्याचे मान्य करतो.

२७.२ कार्डधारक मान्य करतो आणि बँकेला पुढील बाबींच्या परिणामस्वरूपी जे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जी सर्व दायित्वे, नुकसान, हानी आणि खर्च सोसावे किंवा करावे लागतील त्यांची भरपाई करण्याच्या बाबतीत बँकेला हमी देतो:

(I) कार्डधारकाचा निष्काळजीपणा/चूक किंवा चुकीचे प्रतिपादन किंवा गैरवर्तन

(ii) कार्ड किंवा कार्डखात्याशी संबंधित नियम/नियम व अटी यांचे उल्लंघन करणे किंवा अनुपालन न करणे

(iii) कार्डधारकाने किंवा त्याच्या कर्मचाऱ्यांनी/एजंट्सने कोणत्याही व्यवहाराच्या बाबतीतील केलेली फसवणूक किंवा अप्रामाणिकपणा.

(iv) एटीएम्स/ईडीसी आणि तशाच प्रकारची इलेक्ट्रॉनिक टर्मिनल्स किंवा मशीन्स आणि त्या ऑपरेट करताना येऊ शकणाऱ्या चुका (एरर्स); कार्डधारक अशा प्रकारच्या कोणत्याही मशीनमधील/तांत्रिक चुकांची हमी घेण्याचे मान्य करतो.

२७.३ आरबीआयची विनिमय नियमन नियमावली किंवा इतर कोणताही लागू असलेला कायदा, नियम किंवा नियमावली यांचे कार्डधारकाने पालन न केल्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामांसाठी कार्डधारक बँकेला नुकसानभरपाई देईल आणि इजा पोहोचू देणार नाही.

२७.४ कार्ड देण्यात बँकेला अपयश आले किंवा बँकेच्या नियंत्रणापलीकडे असलेल्या कारणांसाठी कोणत्याही नियम किंवा अटींचे पालन करता आले नाही, तर त्यासाठी बँक जबाबदार नसेल. बँक कार्डधारकाला पुरवीत असलेल्या सुविधांच्या मोबदल्याच्या बदल्यात बँकेला कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारच्या कराव्या लागणाऱ्या, सोसाव्या लागणाऱ्या, भोगाव्या लागणाऱ्या कोणत्याही कारवाई, दावे, मागण्या, प्रोसिडिंग्ज, नुकसान, नुकसानभरपाई, वैयक्तिक इजा, उत्पादनखर्च, आकार आणि खर्च किंवा कार्डधारकाला सदर सुविधा पुरविल्यामुळे किंवा कार्डधारकाने दिलेल्या सूचनांवर प्रामाणिकपणे कृती केल्याने किं कृती करण्यास नकार देण्याने किंवा कृती न केल्याने त्यामुळे बँकेला भरपाई देण्याचे कार्डधारक याद्वारे मान्य करीत आहे.

२७.५ कार्ड हरवल्यामुळे किंवा त्याचा गैरवापर झाल्यामुळे, कार्ड हरवले आणि त्याविषयी बँकेला कळविले नाही, तर त्यामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही दायित्वाविषयी (दिवाणी किंवा फौजदारी), नुकसान, उत्पादनखर्च, खर्च किंवा नुकसानभरपाई यासाठी कार्डधारक याद्वारे बँकेला भरपाई देण्याचे कार्डधारक मान्य करतो. कार्ड हरवल्याची/चोरीला गेल्याची माहिती बँकेला दिली असेल तर कार्डधारक बँकेला उत्तरदायी असेल आणि हरवलेल्या/चोरीला गेलेल्या कार्डमुळे निर्माण झालेल्या कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी दायित्वासाठी, उत्पादनखर्च, खर्च किंवा नुकसानभरपाई यासाठी कार्डधारक बँकेसाठी उत्तरदायी असेल आणि याद्वारे बँकेला तशी हमी देतो.

**२८. बंद करणे (समाप्ती)**

२८.१ कार्डधारक कोणत्याही वेळी लेखी विनंती करून किंवा बँकेच्या ग्राहकसंपर्क केंद्राला त्याच्या क्रेडिट कार्डशी जोडलेल्या सुविधा आणि फायदे बंद करण्याच्या विनंतीसह कॉल करून त्याची क्रेडिट कार्डची सुविधा बंद करण्याचा पर्याय निवडू शकतो. परंतु कार्डधारकाच्या खात्यात जर काही रक्कम येणे काबी असेल, तर कार्ड बंद करण्यासाठीची विनंती स्वीकारली जाणार नाही. कार्ड बंद करण्यासाठीची विनंती करण्यापूर्वी कार्डधारकाने त्याच्या खात्यावर येणे बाकी असली सर्व देय रक्कम भरणा केलीच पाहिजे.

२८.२ प्रायमरी कार्डधारक बँकेला लेखी कळवून किंवा ग्राहकसंपर्क केंद्राच्या माध्यमातून ॲड-ऑन कार्डचा उपयोग रद्द करू शकतो, पण हे काहीही असले तरी, ॲड-ऑन कार्डधारकाने केलेल्या सर्व आकारांसाठी/शुल्कासाठी प्रायमरी कार्डधारक जबाबदार राहील.

२८.३ कार्ड रद्द/बंद केल्यानंतर कार्ड मॅग्नेटिक स्ट्रीपवर कणरिषेत कापून नष्ट करण्यासाठी कार्डधारक जबाबदार असेल.

२८.४ बँकेला जर व्यवसायाच्या किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव बँकेला योग्य वाटल्यास बँक स्वत:च्या विवेकाधिकारात क्रेडिट कार्डवरील सुविधा, कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ निलंबित करू शकेल किंवा बंद करू शकेल किंवा क्रेडिट कार्डच्या सुविधेवर बंधने घालू शकेल. बँकेने जर क्रेडिट कार्डची सुविधा बंद केली, तर कार्डखात्यात येणे बाकी असलेल्या सर्व रकमा (ज्यात अजूनही वजा न केलेले आकार किंवा रोख रकमेचा अग्रीम यांच्यासह) तात्काळ देय होतील. अशा बाबतीत, बँकेच्या नोंदीनुसार, जे अंतिम असतील, क्रेडिट कार्डचा/पिनचा वापर करून काढलेल्या/हस्तांतरित केलेल्या सर्व रकमा कार्डखात्यातून वजा करण्याचे स्पष्ट अधिकार कार्डधारक बँकेला देत आहे.

२८.५ जर कार्डधारकाने नोकरी/व्यवसाय किंवा पत्ता बदलला किंवा वर्तमान नेमणुकीच्या जागेवरून बदली झाली किंवा संबंधित पगारखाते/बँकेतील मुख्य खाते, इत्यादी बदलले (जे असेल त्यानुसार) तर बँकेला स्वत:च्या विवेकाधिकारात कार्डसुविधा बंद करण्याचा अधिकार असेल. कार्डधारक खास कबूल करतो की, एकदा कार्डखाते रद्द केले/बंद केले आणि कार्डवरील विशेष अधिकार (सर्व फायदे आणि सेवा यांसह) मागे घेतल्यासमान असतात, ज्या आपोआप पुन्हा सुरू होत नाहीत आणि त्या फक्त बँकेच्या एकमेव विवेकाधिकारातच सुरू केल्या जातील. कार्ड रद्द केल्यानंतर/हा करार संपवल्यानंतर (कोणत्याही कारणासाठी) कार्डधारकाने:

(i) कार्डचा उपयोग करता कामा नये;

(ii) कार्ड मॅग्नेटिक स्ट्रीपवर कर्णरिषेत अर्ध्यावर कापून ते नष्ट केलेच पाहिजे;

(iii) ह्या नियम आणि अटींनुसार बॅंकेला पेमेंट केलेच पाहिजे.

२८.६ अशा प्रकारे कार्ड बंद केल्याचा अर्थ कार्डधारकाला बॅंकेने दिलेल्या सर्व सुविधा बंद केल्या असा होतो. जर कार्डधारकाने कार्ड नष्ट केल्याचा दावा केल्यानंतर आकार लागू करण्यात आलेले असतील, तर कार्डधार संपूर्णपणे अशा आकारांसाठी जबाबदार असेल, मग ते कार्डचा दुरुपयोग केल्यामुळे असोत वा अन्यथा आणि बॅंकेला कार्ड नष्ट केल्याबद्दल कळविलेले असो वा नसो.

## २९. नियम व अटींमधील बदल

२९.१ कार्डसंबंधीची धोरणे, वैशिष्ट्ये आणि त्यावर देऊ करण्यात आलेले फायदे यांमध्ये सुधारणा करण्याचे आणि वेळोवेळी नियम व अटींमध्ये बदल करण्याचे आणि बॅंकेला योग्य वाटेल त्या पद्धतीने अशा बदलांविषयी कार्डधारकाला कळविण्याचे अधिकार बॅंक स्वत:कडे राखून ठेवीत आहे. ज्या तारखेस असे बदल करण्यात आले त्यापूर्वीच जर कार्ड रद्द करण्यात आले, तर त्याचा अपवाद वगळून अशा बदलांना कार्डधारक बांधील राहील.

२९.२ खाली दिलेल्या हेतूंमध्ये/कारणांमध्ये (पण तेवढ्यापुरतेच मर्यादित नसलेले) बदल बॅंक करू शकेल:

(i) शुल्क, व्याजाचे आकार, कर किंवा फक्त कार्ड आणि पिन यांच्याशी संबंधित किंवा ॲड-ऑन कार्डच्या उपयोगाशी किंवा कार्ड बदलून देण्याशी संबंधित आकार बॅंक लागू करू शकते किंवा त्यांमध्ये वाढ करू शकते.

(ii) कार्डच्या साह्याने केलेल्या व्यवहारांसाठीच्या नुकसानासाठी कार्डधारकाच्या जबाबदारीमध्ये वाढ करू शकेल.

(iii) कार्डखात्याला लागू असलेली पत किंवा रोख रक्कम यांच्या मयदिचे समायोजन करू शकेल.

(iv) बॅंक सूचना न देता बदल करू शकेल, जर असे बदल इलेक्ट्रॉनिक सिस्टीमची किंवा कार्डवरील व्यवहारांची सुरक्षितता कायम राखण्यासाठी किंवा पुन्हा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असेल तर. असे बदल करण्यात आले तर, जर असे बदल उघड केल्याने इलेक्ट्रॉनिक सिस्टीमची किंवा उपकरणाची सुरक्षितता धोक्यात येणार नसेल, तर कार्डधारकाला कळविण्यात येईल.

२९.३ या आणि इतर कोणत्याही बदलांची अधिसूचना बॅंकेद्वारे कार्डधारकाल व्यक्तिश: प्रत्यक्ष रूपात किंवा त्याच्या अलीकडील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवून किंवा बॅंकेकडे नोंदवलेल्या ईलेक्ट्रॉनिक-मेलच्या माध्यमातून पाठविली जाईल. कार्डधारकाने त्याच्या पत्त्यात झालेला कोणताही बदल बॅंकेला तत्परतेने कळविला पाहिजे. अशा शेवटच्या अधिसूचित पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर टपाल पाठविल्याचा किंवा इलेक्ट्रॉनिक मेल पाठविल्याचा पुरावा हा, अशी अधिसूचना कार्डधारकाला प्राप्त न होता टपालाद्वारे परत आली, तरी ती नेहमीच्या वेळेप्रमाणे जेवढ्या कालावधीत मिळाली असती, तेवढ्या काळात ती मिळालेली आहे यासाठीचा अंतिम पुरावा असेल. ह्या नियम व अटींमध्ये झालेल्या बदलांची सूचना बॅंक कार्डधारकाला एटीएम/शाखा/कार्यालय यांच्या ठिकाणांवर किंवा त्यांच्या आसपास प्रदर्शित करून किंवा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन किंवा मासिक विवरणात संदेश पाठवून किंवा इंटरनेटवरील संकेतस्थळावर (www.kotak.com) संदेश देऊन देईल.

हे नियम व अटी (क) यापूर्वी केलेले प्रकट किंवा ध्वनित, तोंडी किंवा लेखी प्रस्ताव, निवेदने, समझोता करार आणि करार यांच्यापेक्षा वरचढ ठरतील, (ख) बॅंकेचे सर्वसाधारण नियम व अटी आणि खाती आणि सेवा यांच्यासाठीचे नियम आणि अन्यथा लागू असलेले बॅंकेचे नियम व अटी यांच्याव्यतिरिक्त लागू होतील. परंतु तंटा निर्माण झाल्यास, क्रेडिट कार्ड सुविधेंतर्गत केलेल्या व्यवहारासाठी हे नियम व अटी वरचढ ठरतील.

## ३०. माहिती उघड करणे

३०.१ क्रेडिट व्हेरिफिकेशन किंवा रेफरन्स चेक्स, हितसंबंधांची जपणूक, इत्यादींसाठी सर्व/कोणतीही माहिती/कार्डधारकाशी संबंधित कागदपत्रे/कार्डधारक करार आणि/किंवा इतर कोणतेही करार किंवा कार्डधारकाने कुचराई केल्यास भारतीय रिझर्व्ह बॅंकेला, आयकर अधिकाऱ्यांना, न्यायाधिकरणांना, न्यायालयांना, न्यायिक संस्थांना, इतर बॅंकांना, क्रेडिट ब्युरोजना, वित्तीय संस्थांना किंवा क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनीज (रेग्युलेशन्स) कायदा, २००५ अनुसार वेळोवेळी लागू असलेल्या माहिती उघड करण्याच्या मापदंडांशी सुसंगत असलेल्या तृतीय पक्षांना उघड करण्यासंबंधी कार्डधारक याद्वारे बॅंकेला अधिकृत करीत आहे.

३०.२ कार्डधारक याद्वारे मान्य करतो की, कार्डधारकाने अर्जात किंवा अन्यथा दिलेल्या माहितीचा उपयोग बॅंकेद्वारे वेळोवेळी कार्डशी संबंधित ऑफर्सच्या विक्रीसाठी मार्केटिंगसाठी केला जाऊ शकतो, ज्यात शिल्लक रकमेचे हस्तांतरण, मासिक हप्त्याच्या ऑफर्स, रोख रकमेशी संबंधित ऑफर्स, विमाउत्पादने, इत्यादींचा समावेश आहे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही. त्याहीपुढे, बॅंक ह्या माहितीचा उपयोग लागू असलेल्या माहिती उघड करण्याच्या मापदंडांशी सुसंगत असेल अशा प्रकाररे वेळोवेळी बॅंकेच्या उत्पादनांचे विपणन (मार्केटिंग) करण्यासाठी करू शकेल.

३०.३ कार्डधारकाने पुरविलेली माहिती बॅंक तिच्या उत्पादनांचे मार्केटिंग, बॅंकेला योग्य वाटेल अशा टेलिमार्केटिंग चॅनेल्स/कॉल्स किंवा थेट

मेल किंवा संपर्कासाठीचे इतर चॅनेल्स यांच्या माध्यमातून करण्यासाठी करू शकेल. कार्डधारक याद्वारे बँकेला कार्डधारकाचे क्रेडिट रिपोर्ट्स, क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो ऑफ इंडिया लिमिटेड (सिबिल) किंवा इतर कोणत्याही क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या यांच्याकडून, जेव्हा आणि जशी त्याची आवश्यकता असेल त्यानुसार, क्रेडिट व्हेरिफिकेशनसाठी किंवा कार्डधारकाच्या क्रेडिट रिव्ह्यूसाठी, प्राप्त करण्यासाठी स्पष्ट अधिकार देत आहे.

३०.४ कार्डधारक स्पष्टपणे ओळखतो आणि स्वीकार करतो की, बँक तिच्या अशा कृती तिच्या अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून स्वत:च करण्याच्या अधिकारास बाधा येऊ न देता, बँकेने निवडलेल्या एक किंवा अधिक तृतीय पक्षांना नियुक्त करून त्यांना कार्डधारक करारांतर्गत असलेली तिची सर्व कामे, हक्क आणि शक्ती नियुक्त करू शकते, जी कामे क्रेडिट कार्डचे ऑपरेशन आणि ॲडमिनिस्ट्रेशन, ज्यात कार्डधारक करारांतर्गत कार्डधारकाकडून कोणतेही पेमेंट आणि कार्डधारकाकडून देय असलेल्या इतर रकमा गोळा करण्याचे अधिकार आणि सर्व कायदेशीर कृती करणे, कार्डधारकाशी संपर्क साधणे, कार्डधारकाकडून रोख रक्कम/चेक्स/ड्राफ्ट्स/मँडेट्स प्राप्त करणे आणि वैध आणि परिणामकारक पावत्या देणे आणि कार्डधारकाला मुक्त करणे (डिस्चार्ज) यांचा समावेश होतो. उपरोक्त उद्देशासाठी बँकेस अशा तृतीय पक्षांना कार्डधारकाशी आणि क्रेडिट कार्डशी संबंधित आवश्यक आणि संबंधित माहिती उघड करण्याचला हक्क असेल आणि कार्डधारक अशा प्रकारे बँकेद्वारे माहिती उघड करण्यासाठी याद्वारे संमती देत आहे.

३०.५ वर काहीही म्हटलेले असले तरी कार्डधारकाने काहीही कुचराई केल्यास कार्डधारक स्पष्टपणे स्वीकारतो आणि बँकेला (आणि/किंवा बँकेने निवडलेल्या अशा इतर तृतीय पक्षाला) तृतीय पक्षांशी (कार्डधारकाच्या कुटुंबातील सभासदांसहित) संपर्क साधून कार्डधारकाशी आणि क्रेडिट कार्डशी संबंधित सर्व आवश्यक आणि संबंधित माहिती उघड करण्याचे अधिकार देत आहे आणि कार्डधारक याद्वारे बँकेला (आणि/किंवा बँकेने निवडलेल्या तृतीय पक्षाला) अशी माहिती उघड करण्यासाठी संमती देत आहे.

## ३१. सिबिल

क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो ऑफ इंडिया (सिबिल) आणि इतर क्रेडिट ब्युरोज् हे भारतीय आर्थिक प्रणालीची कार्यपद्धती सुधारण्यासाठी आणि तिच्या स्थैर्यासाठी असलेले भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) यांचे उपक्रम आहेत. बँका आणि वित्तीय संस्था यांच्यामध्ये माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी परिणामकारक यंत्रणा पुरविण्यासाठी आरबीआय करीत असलेल्या प्रयत्नांना धरून हे आहे. या उपक्रमात सहभागी होत असलेल्या सर्व बँका आणि आर्थिक संस्था यांनी सिबिल आणि इतर क्रेडिट ब्युरोज्कडे कार्डधारकाचा डेटा शेअर करणे आवश्यक असते. वर उल्लेख केलेल्याच्या दृष्टिकोनातून बँक कार्डधारकांना माहिती देऊ इच्छिते की, बँकेकडे असलेल्या कार्डधारकाच्या खात्यासंबंधीचा डेटा सिबिलला कळवील. कार्डधारक याहीपुढे कबूल करतो की, कार्डधारकाला पूर्वसूचना न देता असा डेटा शेअर करण्याचा बँकेला अधिकार आहे आणि अशी माहिती कार्डधारकाच्या सकारात्मक/नकारात्मक कामगिरीशी संबंधित असू शकते.

## ३२. वाद आणि समझोत्यासाठी कार्यकक्षा

३२.१ भारत वगळता इतर कोणत्याही देशांच्या कायद्यांचे पालन न केल्यामुळे निर्माण झालेली कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जबाबदारी बँक स्वीकारीत नाही. ग्राहकाद्वारे कार्ड भारत वगळता इतर देशांमध्ये ॲक्सेस करता येते, केवळ एवढ्या वस्तुस्थितीमुळे असा अर्थ लावला जाऊ शकत नाही आणि त्याचा तसा अर्थ होतही नाही की, सदर देशाचे कायदे या नियम व अटींना आणि/किंवा ग्राहकाच्या आणि/किंवा तृतीय पक्षांच्या कार्डखात्यांचे प्रचालन यासाठी लागू आहेत.

३२.२ या करारामुळे किंवा त्याच्याशी संबंधित उद्भवणारे कोणतेही विवाद, मतभेद आणि/किंवा दावे हे अर्बिट्रेशन अँड कॉन्सिलिएशन ॲक्ट, १९९६ मधील तरतुदींनुसार लवादाद्वारे सोडवले जातील आणि या कायद्यात जर यानंतर कोणतीही सुधारणा करण्यात आलीच तर बँकेने नियुक्त केलेल्या एकमेव पंचाद्वारे (अर्बिट्रेटर) सोडवले जातील. दिलेला कोणताही निवाडा/निर्देश अंतिम आणि पक्षकारांवर बंधनकारक असेल. लवादाची भाषा इंग्रजी असेल आणि अशा प्रकारच्या लवादाचे (अर्बिट्रेशन) ठिकाण मुंबई असेल.

३२.३ कार्डधारक करार संपुष्टात आला तरीही हे पोटकलम ३२ अमलात राहील.

## ३३. पर्यायी चॅनेल्समधून प्राप्त केलेल्या सेवांसाठी अतिरिक्त नियम व अटी

कार्डधारक मान्य करतो की, इतर चॅनेल्सच्या माध्यमातून सेवा प्राप्त करणे हे बँकेचे नियम व अटी तसेच सर्वसाधारण व्यवसायाच्या अटी यांच्या अधीन असेल आणि बँकेने वेळोवेळी प्रसृत केलेले खात्यांच्या संचालनासाठीचे नियम तसेच आरबीआयने किंवा इतर प्राधिकरणाने वेळोवेळी नव्याने केलेले नियम व अटी यांच्या अधीन असेल. नियम व अटींमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून ह्या सेवांसाठी असलेले नियम व अटी संबंधित असतील.

३३.१ व्याख्या:

''पर्यायी चॅनेल्स''/''इलेक्ट्रॉनिक बँकिंग'' मध्ये प्रायमरी कार्डधारकाला फोन बँकिंग, इंटरनेट बँकिंग आणि ईमेलद्वारे पाठवलेले विवरण, मोबाईल बँकिंग आणि मोबाईल अलर्ट्स यांचा समावेश आहे.

''अलर्ट्स'' म्हणजे शॉर्ट मेसेजिंग सर्व्हिस म्हणून पाठविलेल्या ट्रिगर्सना पाठविलेले कस्टमाईझ्ड मेसेजेस.

कार्डधारकाला त्याच्या मोबाईल फोनवर किंवा त्याच्या नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर पाठविलेले ई-मेल म्हणून पाठविलेले (''एसएमएस'').

''कामकाजाची वेळ'' म्हणजे ज्या वेळेत कामकाजाच्या दिवशी बँक उघडी असते ती वेळ आणि कामकाजाची वेळ बँकेच्या प्रत्येक शाखेसाठी वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसा वेगवेगळी असू शकते.

''सीएसपी'' म्हणजे सेल्युलर सर्व्हिस प्रोव्हायडर, ज्याच्यासोबत मोबाईल बँकिंग सुविधा पुरविण्यासाठी बँकेने व्यवस्था केलेली असते तो.

''ट्रिगर्स'' म्हणजे प्रायमरी कार्डधारकासोबत त्याच्या खात्याच्या संबंधात बँकांना संबंधित अलर्ट्स पाठवता यावेत म्हणून विशिष्ट प्रसंग/व्यवहार यासाठी प्रायमरी कार्डधारकाने सेट करायचे किंवा ठेवावयाचे कस्टमाईझ्ड ट्रिगर्स.

**३३.२ सेवा:**

पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सेवा बँकेद्वारे स्वत:च्या विवेकाधिकारात आणि कार्डधारकाच्या सोयीसाठी म्हणून पुरवल्या जातात. कार्डधारक ह्या सेवांचा लाभ त्याच्या स्वत:च्या जोखमीवर घेऊ शकतो. या नियम व अटींच्या व्यतिरिक्त बँकेने पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांचा उपयोग, ॲक्सेस आणि प्रचालन यांसाठी वेळोवेळी प्रस्तुत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे.

३३.३ कार्डधारकाची ओळख पटवणे आणि अधिप्रमाणित करणे:

(i) बँकेने निर्धारित केल्यानुसार कार्डधारकाचा पासवर्ड/पिन/युजर आयडी किंवा कार्डधारकाची ओळख पटविणाऱ्या इतर बाबींच्या माध्यमातून कार्डधारकाचे अधिप्रमाणन (ऑथेंटिकेशन) केल्यानंतरच इंटरनेट बँकिंगला परवानगी दिली जाईल. अधिप्रमाणन झाल्यानंतर कार्डधारक याद्वारे बँकेला पर्यायी चॅनेल्सच्या (त्याचा पासवर्ड / पिन / यूजर आयडी वापरुन) माध्यमातून प्राप्त झालेले व्यवहार करण्यासाठी स्पष्ट परवानगी देत आहे आणि ती अशा कार्डधारकाकडून उद्भवलेली आहे असे समजण्यात येईल. पर्यायी चॅनेल्समधून प्राप्त झालेली किंवा पासवर्ड/पिन/युजर आयडी यांची पडताळणी केल्याचा अपवाद वगळता कार्डधारकाने पाठविल्याचा अन्वयार्थ असलेल्या व्यवहाराच्या विनंतीची पडताळणी करण्यासाठी बँक उत्तरदायी नसेल.

(ii) बँकेला जर असे वाटले की, पर्यायी चॅनेलविषयीच्या सूचना कदाचित कार्डधारकाने अधिप्रमाणित केलेल्या नसू शकतात, तर त्याचे योग्य प्रकारे अधिप्रमाणन झाले होते का हे तपासून पाहण्याचा बँकेने योग्य ते प्रयत्न केल्यानंतर त्या सूचनांची अंमलबजावणी करण्यास किंवा त्या सूचनांच्या आधारे केलेली कोणतीही कृती मागे घेण्यास नकार देऊ शकते. बँकेला जर रास्तपणे असे वाटले की, दिलेल्या सूचना खऱ्या नाहीएत किंवा अन्यथा अयोग्य किंवा अस्पष्ट आहेत किंवा शंकास्पद आहेत तर बँक स्वत:च्या विवेकाधिकारात त्यांचे पालन करण्यास नकार देऊ शकते. अशा प्रकारे सूचनांचे पालन करण्यास नकार दिल्यामुळे किंवा त्या उलट फिरवल्यामुळे (रिव्हर्सल) कार्डधारकाला/तृतीय पक्षाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी बँक जबाबदार नसेल.

३३.४ फॅक्सद्वारे कार्डधारकाला संज्ञापन (कम्युनिकेशन):

कार्डधारकाने विनंती केल्यास बँक कार्डधारकाच्या कार्ड्स/कार्डखात्यांविषयीची माहिती फॅसिमेल (''फॅक्स'') (कार्डधारकाने दिलेल्या फॅक्स क्रमांकावर) पाठवू (कार्डधारकाने अपेक्षिलेली) पाठवू शकेल, जी खाजगी आणि गोपनीय स्वरूपाची असेल आणि अशी माहिती जर कोणत्याही तृतीय पक्षाच्या हाती पडली, तर त्यासाठी कार्डधारक बँकेला जबाबदार धरणार नाही.

३३.५ व्यवहारांच्या नोंदी:

पर्यायी चॅनेल्सवरील व्यवहारांच्या बँकेने स्वत: संगणक प्रणालीच्या माध्यमातून किंवा अन्यथा राखलेल्या नोंदी अंतिम म्हणून स्वीकारल्या जातील आणि त्या बँकेवर आणि कार्डधारकावर सर्व उद्देशांसाठी बंधनकारक राहतील आणि कार्डधारक बँकेच्या अशा नोंदी कोणत्याही हरकतीशिवाय किंवा निषेधाशिवाय ओळखतो, त्याविषयी हमी देतो आणि मान्य करतो. काही चॅनेल्सच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे कार्डधारकाने पर्यायी चॅनेल्सवर केलेल्या किंवा प्रयत्न केलेल्या व्यवहारांची प्रिंटआऊट घेऊ शकतो. परंतु फक्त बँकेने ठेवलेल्या नोंदीच मान्य केल्या जातील. पर्यायी चॅनेल्सवर व्यवहार करण्यासाठी विनंती केल्यानंतर बँकेने तो व्यवहार केल्याबद्दल किंवा न केल्याबद्दल कार्डधारक त्याविषयी प्रतिरोध न करण्याचे कार्डधारक विनाअट कबूल करतो आणि मान्य करतो.

३३.६ पासवर्ड (पासवर्ड्स)/युजर आयडी:

(i) कार्डधारकाला पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांचा लाभ घेण्यासाठी बँकेद्वारे पासवर्ड्स/पिन/कार्ड आणि/किंवा युजर आयडी दिला जाईल. प्रायमरी कार्डधारकाला हे छेडछाड न करता येण्याजोग्या सीलबंद लिफाफ्यातून (''मेलर'') प्राप्त होतील. प्रायमरी कार्डधारकाने मेलर कोणतीही छेडछाड न होता प्राप्त झालेला आहे ह्याची खातरजमा करावी आणि तो जर तसा नसेल, तर कार्डधारकाने त्यानंतर तात्काळ लेखी स्वरूपात किंवा फोनद्वारे बँकेला तसे कळवावे.

(ii) जर सलग ३ (तीन) वेळा (किंवा बँकेने वेळोवेळी ठरविलेल्या वेळा) चुकीचा पासवर्ड/पिन प्रविष्ट केला, तर कार्डधारकाला इलेक्ट्रॉनिक बँकिंगमधून मिळणाऱ्या सेवा निष्क्रिय करण्यात येतील. असे घडल्यास, बँक स्वत:च्या विवेकाधिकारात विशिष्ट

कालावधीनंतर असा ॲक्सेस आपोआप पुन्हा सक्रिय करील.

(iii) बँकेने निर्धारित केलेल्या सलग कालावधीसाठी जर सेवांचा उपयोग केला गेला नाही, तर बँक पासवर्ड/पिन/युजर आयडी निष्क्रिय करू शकेल. कार्डधारक असा ॲक्सेस तात्पुरत्या स्वरूपात निष्क्रिय करण्यासाठीही विनंती करू शकतो. पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांसाठी ॲक्सेस पुन्हा सक्रिय करण्यासाठी कार्डधारकाने बँकेला फोन करून किंवा बँकेने ठरवून दिलेल्या मार्गांनी, बँकेला आवश्यक असलेले किंवा विहित केलेले तपशील पुरवून कळविलेच पाहिजे आणि अशा प्रकारे पाठविलेली माहिती अचूक आहे असे समजले पाहिजे.

३३.७ पासवर्ड/पिन/युजर आयडी यांची सुरक्षितता आणि गोपनीयता:

(i) कार्डधारक मान्य करतो आणि कबूल करतो की, त्याच्या कार्डच्या तपशिलांची आणि पासवर्ड/पिनची गुप्तता राखण्यासाठी तो स्वत:च जबाबदार असेल. कार्डधारकाने त्याच्या पर्यायी चॅनेल्सच्या वापरासाठीच्या सुरक्षिततेचे संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या इतर कोणत्याही आवश्यकतांचे पालन केलेच पाहिजे, ज्या वेळोवेळी मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या असतात किंवा कार्डधारकाला कळविल्या जातात.

(ii) फक्त प्रायमरी कार्डधारकच एकटा पर्यायी चॅनेल्सशी संपर्क साधू शकेल आणि त्यांच्या माध्यमातून सूचना देऊ शकेल ह्याची खातरजमा करण्यासाठी त्याने सदैव पुढील सुरक्षा कार्यप्रणालींचे अनुपालन केले पाहिजे: (i) कार्डधारकाने त्याचा पासवर्ड/पिन नियमितपणे किंवा बँकेला तसे आवश्यक असल्यास बदलला पाहिजे; (ii) त्याने आधी वापरलेला किंवा ज्याचा इतरांना अंदाज लावता येईल असा पासवर्ड/पिन निवडू नये; (iii) त्याच्या पासवर्ड/पिनचे सदैव संरक्षण केले पाहिजे आणि त्याच्या पासवर्ड/पिनचे तपशल इतर कोणाकडेही (ॲड-ऑन कार्डधारक किंवा बँकेचे कर्मचारी यांच्यांसह) उघड करू नये; (iv) पासवर्ड/पिन अशा प्रकारे नोंदवून ठेवू नये की, ज्यामुळे तो कोणत्याही तृतीय पक्षाला वाचता किंवा मिळवता येईल; (v) शक्यतो पासवर्ड/पिन लक्षात ठेवावा आणि त्याच्या नोंदी नष्ट करून टाकाव्यात; (vi) त्याच्यावतीने इतर कोणाला पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातील सेवा वापरण्याची परवानगी देऊ नये; (vii) जेव्हा तो पर्यायी चॅनेल्सवर लॉग्ड ऑन असतो, तेव्हा त्याने सिस्टीम सोडून जाऊ नये आणि तो जेव्हा प्रत्येक वेळी अशा सिस्टीमपासून दूर जाईल तेव्हा त्याने पर्यायी चॅनेल्समधून लॉग-आऊट करावे; (viii) लोकल नेटवर्कला (एनएएन) जोडलेल्या कोणत्याही इक्विपमेंटवरून किंवा डिव्हाईसवरून पर्यायी चॅनेल्स ॲक्सेस करू नयेत, जसे कार्यालयातून, अशा प्रकारे की इतर कोणीही त्याचा पासवर्ड/पिन पाहू किंवा कॉपी करीत नाही, ह्याची खातरजमा करून. उपरोक्त सुरक्षा कार्यप्रणालीचे पालन करण्यात तो अयशस्वी झाल्यामुळे जर कोणतेही नुकसान झाले, तर कार्डधारकाने बँकेला त्याची भरपाई करण्याची हमी दिली पाहिजे.

(iii) कार्डधारकाच्या असे लक्षात आले किंवा शंका आली की, त्याचा पासवर्ड/पिन किंवा त्यापैकी काही भाग इतर कोणाला माहीत झालेला आहे, तर त्याने पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून स्वत:च तात्काळ पासवर्ड/पिन बदललाच पाहिजे. हे जर शक्य झाले नाही, तर कार्डधारकाने बँकेला फोनच्या माध्यमातून तात्काळ कळविले पाहिजे. नवीन पासवर्ड/पिन सेट अप होईपर्यंत बँक पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून मिळणाऱ्या सेवा निलंबित करू शकेल. अशा अधिसूचनेपूर्वी केलेला कोणताही व्यवहार संपूर्णपणे फक्त कार्डधारकाच्या जोखमीवर आणि त्याच्या खर्चाने केलेला असेल.

(iv) पासवर्ड/पिन/युजर आयडी गहाळ होणे: जर काडधारक त्याचा पासवर्ड/पिन विसरला किंवा तो गहाळ झाला, तर त्याने बँकेने निर्धारित केलेल्या पद्धतीने बँकेला कळविले पाहिजे, जी तिच्या स्वत:च्या विवेकाधिकारात नवीन पासवर्ड/पिन पुन्हा जनरेट करून पाठविण्याची व्यवस्था करील.

३३.८ कार्डधारकाची जबाबदारी/बँकेचे अधिकार:

(i) पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांची सुरक्षितता आणि त्यांच्यापर्यंत अनधिकृतपणे पोहोचता येऊ नये म्हणून बँकेला योग्य वाटेल अशा तंत्रज्ञानाचा वापर ती करू शकेल. बँक सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न करील, पण कार्डधारकाला हे समजते की, तंत्रज्ञानाच्या स्वरूपामुळे सिस्टीम निर्धोक आणि छेडछाड करण्यापासून सुरक्षित ठेवणे कदाचित शक्य होणार नाही.

(ii) कार्डधारक कबूल करतो आणि विनाअट स्वीकार करतो आणि मान्य करतो की, जर पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून आणि/किंवा पासवर्ड/पिनच्या गैरवापरामुळे/अनधिकृत वापरामुळे किंवा त्याच्या कार्डविषयीची किंवा कार्डखात्याविषयीची माहिती बँकेने इतर कोणा व्यक्तीकडे उघड केल्यामुळे किंवा पासवर्ड/पिनचा वापर करून व्यवहार किंवा सूचनांवर अमल केल्याने कार्डधारकाला नुकसान पोहोचले, तर तो त्यासाठी कोणत्याही प्रकारे बँकेला जबाबदार धरणार नाही. जर कार्डधारक सुरक्षिततेच्या आणि गोपनीयतेच्या आवश्यकतांचे पालन करू शकला नाही, तर त्याला अनधिकृत वापरासाठीची जबाबदारी घ्यावी लागू शकते. या बाबतीत बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदारी घेत नाही.

३३.९ व्यवहारांवर प्रक्रिया करणे:

(i) पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून केलेल्या व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठीचा वेळ हा त्यांवर हातांनी (मॅन्युअली) प्रक्रिया केली जाते की इलेक्ट्रॉनिकली केली जाते किंवा त्यांवर कामकाजाची वेळ संपल्यानंतर प्रक्रिया केली जाते किंवा काय यांनुसार वेगवेगळी असू शकते.

कार्ड ब्लॉक करण्याच्या विनंतीसाठी किंवा इतर तातडीच्या/महत्त्वाच्या विनंतीसाठी कार्डधारकाने बँकेकडे पाठपुरावा केला पाहिजे आणि त्यांची नोंद बँकेने प्रत्यक्ष केलेली असल्याची/त्यांवर कारवाई केल्याची खातरजमा केली पाहिजे.

(ii) कार्डधारकाने एकदा पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सूचना दिली, की कार्डधारकाला ती मागे घेता येणार नाही. कार्डधारकाने दिलेली सूचना मागे घेण्याबद्दल किंवा सशर्त किंवा मागे घेण्याजोगी सूचना किंवा नेहमीच्या बँकिंग प्रक्रियेचा अवलंब करून पैसे देणे शक्य असेल, त्यापेक्षा लवकर देण्यासाठी तृतीय पक्षाला पैसे देऊन स्वीकारण्यास बँक उत्तरदायी नसेल. बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कोणतीही एंट्री, जोपर्यंत ती नियमांतर्गत आणि बँकिंग सिस्टीमच्या प्रचलित रिवाजांतर्गत कार्डधारकाच्या खर्चाने उलटी फिरवणे (रिव्हर्स) शक्य असल्याच्या मर्यादेपर्यंत उलट फिरवण्याचा प्रयत्न करील.

(iii) कार्डधारक याद्वारे पुष्टी करतो आणि कबूल करतो की, निधीचे हस्तांतरण इलेक्ट्रॉनिक माध्यमातून केलेली पेमेंट्स ही आयकर कायदा, १९६१ च्या कलम ४०अ (३) च्या अधीन असतील.

(iv) पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांच्या मार्गाने उपलब्ध असलेली आर्थिक माहिती ही फक्त संदर्भासाठी असते. या सेवेच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये बँकेच्या हातात असलेल्या, पण ज्यांच्यावर प्रक्रिया करणे बाकी आहे किंवा ज्यांची पेमेंटसाठी पडताळणी अजून व्हायची आहे अशा व्यवहारांची माहिती कदाचित प्रतिबिंबित होणार नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही माहितीच्या परिणामस्वरूपी कार्डधारकाला किंवा तृतीय पक्षाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी किंवा हानीसाठी बँक जबाबदार नसेल.

(v) क्रेडिट/कॅश लिमिट उपलब्ध असल्यास पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून प्राप्त झालेले निधीचे हस्तांतरण आणि पेमेंटचे व्यवहार पूर्ण करण्याचा बँक प्रयत्न करील आणि अशी ही पेमेंट करण्याची कृती न केल्याच्या कारणास्तव किंवा बँकेच्या रास्त नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे पेमेंट उशिरा झाल्यास बँक जबाबदार असणार नाही.

३३.१० मर्यादा:

(i) बँक स्वत:च्या मर्जीने कार्डधारकाने पर्यायी चॅनेल्समध्ये केलेल्या व्यवहारासाठी किमान आणि कमाल मर्यादा पुन्हा ठरवू शकते. ह्या मर्यादा कार्डधारकाला दिलेल्या एकूणच पतमर्यादेपेक्षा कमी असू शकतात. अशा मर्यादा बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या प्रमापकांवर आधारित असू शकतात.

(ii) सर्व एटीएमज्ना किमान/कमाल व्यवहारांच्या मर्यादा लागू असतील आणि वेगवेगळ्या बँकांच्या नेटवर्कच्या मालकीच्या, वेगवेगळ्या देशांच्या एटीएमज्नुसार त्या वेगवेगळ्या असू शकतात. वेगवेगळ्या एटीएम्ज/नेटवर्क्स च्या माध्यमातून केलेल्या व्यवहारांसाठीच्या मर्यादेतील एकसमानतेच्या अभावामुळे कार्डधारकाचे होणारे कोणतेही नुकसान किंवा गैरसोय यासाठी बँक जबाबदार नसेल.

३३.११ पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांचा उपयोग करण्याची संधी:

पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांचा उपयोग करण्याची संधी कार्डधारकाने विनंती केल्यास आणि बँकेच्या विवेकाधिकारात उपलब्ध करून दिली जाईल. कार्डधारकाच्या कार्डसशी किंवा कार्डखात्यांशी जोडलेल्या सर्व खात्यांचा उपयोग करण्याची संधी पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून, ह्या नियम व अटींच्या अधीन राहून, दिली जाऊ शकते. परंतु प्रत्येक कार्डवर किंवा कार्डखात्यावर वापर करण्याची संधी उपलब्ध असलेल्या व्यवहारांचे स्वरूप त्या कार्डसच्या/कार्डखात्यांच्या ऑपरेटिंग मँडेटवर अवलंबून असेल.

३३.१२ मर्यादांचा पुरेसेपणा:

पुरेशी पतमर्यादा राखण्याची खातरजमा करणे ही पूर्णत: कार्डधारकाची जबाबदारी आहे. जर ह्या मर्यादेचे उल्लंघन करण्याचा जर प्रयत्न झाला, तर पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून पुरविण्यात आलेल्या सुविधा बँक काढून घेईल किंवा तिला योग्य वाटतील अशी पावले उचलील.

३३.१३ सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर:

बँकेच्या प्रणालीला अनुपूरक असलेल्या पर्यायी चॅनेल्ससच्या माध्यमातून सेवा प्राप्त करण्यासाठी वेळोवेळी लागू असेल त्यानुसार कार्डधारक त्याच्या खर्चाने सर्व सॉफ्टवेअर आणि संगणक आणि कम्युनिकेशन सिस्टीम्स प्राप्त करून त्यांची देखभाल करावी व ती अपडेट/अपग्रेड करावीत. सॉफ्टवेअर, हार्डवेअर, ऑपरेटिंग सिस्टीम, इत्यादींमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे किंवा अपग्रेड करण्याचे बँकेला स्वातंत्र्य असेल आणि कार्डधारकाच्या सॉफ्टवेअरला, हार्डवेअरला, ऑपरेटिंग सिस्टीमला सपोर्ट करण्याची जबाबदारी बँकेवर नसेल आणि ही फक्त कार्डधारकाचीच जबाबदारी असेल.

३३.१४ बौद्धिक संपदा:

कार्डधारक कबूल करतो आणि मान्य करतो की, सेवा पुरविणाऱ्या सॉफ्टवेअरमधील तसेच पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून कार्ड ॲक्सेस करण्यासाठीच्या सेवा प्राप्त करण्यासाठी असलेल्या इतर सॉफ्टवेअरमधील बौद्धिक संपदेचे अधिकार ही बँकेची किंवा संबंधित व्हेंडर्सची कायदेशीर मालमत्ता आहे. बँकेने कार्ड/कार्डखाती ॲक्सेस करण्यासाठी आणि सेवांचा उपयोग करण्यासाठी परवानगी दिल्याने सॉफ्टवेअरच्या बौद्धिक संपदेत मालकी किंवा मालकीहक्क निर्माण करणार नाही. कार्डधारकाने उपरोक्त सॉफ्टवेअरमध्ये बदल करण्याचा, भाषांतरित करण्याचा, वेगवेगळे करण्याचा, डिकंपाईल करणचया किंवा रिव्हर्स इंजिनिअर करण्याचा प्रयत्न करू नये किंवा सॉफ्टवेअरचा

सोर्स कोड कॉपी करू नये किंवा सॉफ्टवेअरवर आधारित कोणतेही डेरिव्हिटिव्ह प्रॉडक्ट निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये.

३३.१५ व्हायरसेसपासून संरक्षण करणे:

कार्डधारकाची सिस्टीम किंवा कोणताही संगणक किंवा इतर इक्विपमेंट किंवा डिव्हाईस, ज्यातून कार्डधारक इंटरनेट बँकिंग ॲक्सेस करतो ते कोणत्याही कॉम्प्युटर व्हायरसपासून किंवा अशाच प्रकारच्या सॉफ्टवेअर/डिव्हाईसपासून मुक्त असेल यासाठी कार्डधारकाने रास्त आणि व्यवहार्य काळजी घेतलीच पाहिजे, ज्यात कोणत्याही मर्यादेशिवाय, ज्या सॉफ्टवेअर्सना सर्वसामान्यपणे सॉफ्टवेअर बॉम्ब्ज, ट्रोजन हॉर्सेस आणि वर्म्स (''व्हायरस'') असे म्हणतात त्यांचाही समावेश आहे आणि त्यांची पुरेशा प्रमाणात देखभाल केली जाईल आणि प्रत्येक बाबतीत सुरक्षित राहील ह्याची काळजी घ्यावी. बँक जरी व्हायरसेसना आणि इतर अशा प्रकारच्या विनाशकारी साहित्याला बँकेच्या संकेतस्थळावर आळा घालण्याचा प्रयत्न करीत असली, तरी त्याचा अर्थ असा होत नाही, आश्वासन किंवा अशी हमी देत नाही की बँकेचे संकेतस्थळ किवा बँकेच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेले साहित्य (कंटेंट) किंवा लिंक केलेली संकेतस्थळे यांमध्ये असा व्हायरस किंवा विनाशकारी साहित्य नसेल असा होत नाही. अशा प्रकारच्या व्हायसशी किंवा विनाशकारी साहित्याशी संबंध जोडता येणार नाही. बँक अशी हमी देत नाही की, बँकेचे संकेतस्थळ किंवा कार्ये विनाअडथळा किं कोणतीही चूक किंवा दोष यांच्यापासून मुक्त असतील.

३३.१६ पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून जबाबदारीच्या मर्यादा

कार्डधारकाला उपलब्ध असलेल्या इंटरनेट बँकिंगचा उपययोग केल्यामुळे/न केल्यामुळे कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, परिणामस्वरूपी, दूरवरून किंवा विशेष नुकसान किंवा हानी झाली, तर त्यासाठी बँक जबाबदार नसेल. ज्या परिस्थितीत बँक कार्डधारकाला जबाबदार नसेल अशा उदाहरणांची यादी (पण ती तेवढीच नाही) पुढे देत आहोत: (i) जेव्हा अशा प्रकारचे नुकसान किंवा हानी नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा तांत्रिक बिघाडामुळे झालेली असते; (ii) कार्डधारकाची सिस्टीम आणि बँकेची सिस्टीम एकमेकांना अनुपूरक नसणे; (iii) कार्डधारकाच्या सिस्टीमचा कार्डधारकाने किंवा इतर कोणी गैरवापर करणे; (iv) कार्डधारकाने इंटरनेट बँकिंग वापरल्यामुळे कार्डधारकाच्या कार्डशी/कार्डखात्याशी संबंधित माहितीशी तृतीय पक्षाने मिळवलेला ॲक्सेस; (v) कार्डधारकाच्या पासवर्डचा/पिनचा उपयोग तृतीय पक्षाने केला; (v) ट्रान्समिशनच्या दरम्यान किंवा अन्यथाही कोणताही डेटा, माहिती किंवा मेसेज गहाळ होणे, अर्थाचा अनर्थ होणे/करप्ट होणे/उशीर होणे;(vi) कोणताही तोटा / विलंब, अशा कोणत्याही डेटा, माहिती किंवा संदेशामध्ये व्यत्यय, किंवा बँकेच्या नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे अपेक्षित पद्धतीने खात्याशी ॲक्सेस होत नसेल; (vii) कामकाजाच्या वेळेत पर्यायी चॅनेल्स सेवा उपलब्ध नसणे.

३३.१७ मोबाईल बँकिंग आणि अलर्ट्स:

(i) बँक प्रायमरी कार्डधारकाला मोबाईल बँकिंगची किंवा मोबाईलवर अलर्ट्सची किंवा ईमेलची सुविधा फक्त माहिती देण्याच्या उद्देशाने देऊ शकेल आणि ती स्वत:च्या विवेकाधिकारात खंडित करू शकेल. बँक सर्वोत्तम प्रयत्न करून आधीच निश्चित केलेले काही अलर्ट्स प्रदर्शित करू शकेल. परंतु अलर्ट्सचा वक्तशीरपणा, पूर्णपणा, अचूकता आणि यशस्वी डिलिव्हरी यासाठी बँक जबाबदार किंवा उत्तरदायी नसेल.

(ii) कार्डधारक स्वीकारतो की, मोबाईल बँकिंग/मोबाईल अलर्ट सुविधा विशिष्ट निवडक क्षेत्रात उपलब्ध आहे आणि विशिष्ट सीएसपीज्च्या मोबाईल फोन सबस्क्रायबर्सना उपलब्ध आहे. कार्डधारकाला हे समजते की, तो जर विशिष्ट सीएसपीज्चा सबस्क्रायबर नसेल, तर अलर्ट किंवा मोबाईल बँकिंग सुविधा त्याच्यासाठी उपलब्ध नसेल.

(iii) कार्डधारक जर सीएसपीच्या सेल्युलर सर्कल्समध्ये कंवा अशा प्रकारच्या सीएसपीज्च्या रोमिंग नेटवर्कचा हिस्सा असलेल्या सर्कलमध्ये असेल, तरच कार्डधारकाला मोबाईल अलर्ट्स पाठविले जातील. कार्डधारक कबूल करतो की, अलर्ट्स प्राप्त करण्यासाठी त्याचा मोबाईल फोन 'ऑन' मोडवर असलाच पाहिजे. बँकेने अलर्ट मेसेज पाठविल्यानंतर जर कार्डधारकाचा मोबाईल सतत ४८ (अठ्ठेचाळीस) तास 'ऑफ' मोडवर असेल, तर तो विशिष्ट मेसेज कार्डधारकाला प्राप्त होणार नाही.

(iv) सूचना/ट्रिगर्स प्राप्त झाल्यानंतर बँक त्यावर प्रक्रिया करील आणि प्रक्रिया करण्याची वेळ बँकेद्वारे तिच्या विवेकाधिकारात ठरवली जाईल. कार्डधारक कबूल करतो की, ट्रिगर्सवर प्रक्रिया करून अलर्ट्स पाठवण्यासाठी बँकेद्वारे विशिष्ट वेळ घेतला जाईल.

(v) कार्डधारक कबूल करतो की, पायाभूत सुविधा; सीएसपीज्ने आणि बँकेने एंगेज केलेल्या सेवा पुरविणाऱ्यांनी पुरविलेल्या कनेक्टिव्हिटी आणि सेवा यांवर आणि सीएसपीज् आणि इतर सेवा पुरविणाऱ्यांवर परिणाम करणाऱ्या घटकांवर अवलंबून असतील.

(vi) बँक सर्वोत्तम प्रयत्न करून सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करील आणि सुविधा उपलब्ध नसल्याबद्दल किंवा अलर्ट्स डिलिव्हर न झाल्याबद्दल किंवा कोणत्याही सीएसपीने किंवा इतर सेवा पुरविणाऱ्यांनी कामगिरी पार पाडली नाही म्हणून किंवा सुविधेचा वापर केल्यामुळे कार्डधारकाला झालेल्या नुकसानासाठी किंवा हानीसाठी (कार्डधारकाच्या गुंतवणुकीच्या किंवा व्यवसायाच्या हेतूने आलेल्या अलर्ट्सवर अवलंबून राहिल्याने यासह) बँकेच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांसाठी कार्डधारक बँकेला जबाबदार धरणार नाही.सरसकट दुर्लक्ष किंवा हेतूपुरस्सर कुचराई यांचा अपवाद वगळता, सुविधांच्या उपयोगाच्या बाबतीत बँक कोणत्याही प्रकारे कार्डधारकाला उत्तरदायी नसेल.

(vii) कार्डधारक स्वीकार करतो की, प्रत्येक अलर्टमध्ये कार्डधारकाशी संबंधित माहिती असू शकते. कार्डधारक बँकेला कार्डशी संबंधित सर्व माहिती, जरी खास विनंती केलेली नसली तरीही, बँकेला योग्य वाटल्यास पाठविण्याचे अधिकार देत आहे.

(viii) जर व्यवहार्य असेल, तर बँक या सुविधा, बँकेने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार इतर सेल्युलर सर्कल्समध्ये तसेच इतर सेवा पुरविणाऱ्यांच्या सेल्युलर टेलिफोन्सच्या सबस्क्रायबर्सना देईल.

(ix) कार्डधारक मोबाईल बँकिंग किंवा अलर्टची सुविधा वापरण्यासाठीची तपशीलवार प्रक्रिया स्वत:च माहीत करून घेईल आणि कोणताही व्यवहार करताना कार्डधारकाने कोणतीही चूक केल्यास त्यासाठी बँक जबाबदार नसेल.

(x) कार्डधारकाच्या मोबाईल फोनवर किंवा बँकेकडे नोंदवलेल्या ईमेलवर अलर्ट्स पाठविले जातील. कार्डधारक कबूल करतो की, अलर्टची सुविधा टप्प्याटप्प्याने लागू केली जाईल आणि सर्व सुविधा किंवा ट्रिगर्स तात्काळ उपलब्ध नसू शकतात. कार्डधारकाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बँक उपलब्ध ट्रिगर्स किंवा अलर्ट्सचा विस्तार करण्याचा प्रयत्न करील. बँक वेळोवेळी कोणत्याही टिगरच्या किंवा अलर्टच्या वैशिष्ट्यांमध्ये बदल करू शकेल.

(xi) कार्डधारक कबूल करतो की, बँक वेळोवेळी त्याला उपयुक्त असेल माहिती किंवा प्रमोशनल मेल्स त्याच्या मोबाईल फोनवर किंवा ईमेलच्या माध्यमातून पाठवील आणि तो त्याच्या इच्छेनुसार कोणत्याही वेळी या सेवेतून अनसबस्क्राईब करू शकेल. कार्डधारक अशी माहिती किंवा मेल प्राप्त करण्यासाठी त्याची संमती देत आहे.

(xii) कार्डधारकाने बँकेला कळविलेल्या मोबाईल क्रमांकाचाच उपयोग करणे आवश्यक आहे किंवा जर तो त्याने नंतर बदलला, तर त्याने बँकेला तोंडी किंवा लेखी कळवले पाहिजे. कार्डधारक कबूल करतो की, कोणत्याही सूचना देण्यापूर्वी बँक कदाचित त्याचा मोबाईल क्रमांक/डिफॉल्ट फोन नंबर त्याच्या कार्डच्या/कार्डखात्याशी पडताळून पाहू शकेल (पण ते अनिवार्य नाहीए). कार्डधारकाच्या मोबाईल क्रमांकात किंवा ईमेल पत्त्यात किंवा खात्याच्या तपशिलात कोणताही बदल झाला, तर ते बँकेस कळविण्यास तो जबाबदार असेल आणि बँकेकडे नोंदवलेल्या कार्डधारकाच्या मोबाईल फोन नंबरवर/ईमेल पत्त्यावर/फॅक्स नंबरवर अलर्ट्स किंवा इतर माहिती पाठविण्यास बँक जबाबदार नसेल.

(xiii) मोबाईल बँकिंगची सुविधा फक्त बँकेला सूचना देण्यासाठी आणि अलर्ट्स प्राप्त करण्यासाठी कार्डधारकाद्वारे वापरली जाईल आणि इतर कोणत्याही उद्देशासाठी वापरली जाईल.

(xiv) बँकेला जर असे वाटले की, सूचना किंवा ट्रिगर्स अस्सल नाहीत किंवा अन्यथा अयोग्य किंवा अस्पष्ट आहेत किंवा शंकास्पद असतील किंवा ट्रिगर्स बेकायदेशीर असतील किंवा त्यावर कोणत्याही कारणास्तव अंमलबजावणी करता येत नसेल, तर बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कदाचित कोणत्याही सूचनेवर किंवा ट्रिगरवर अंमलबजावणी करणार नाही.

३३.१८ फोन बँकिंग सेवा:

(ख) बँक या सेवेंतर्गत वेळोवेळी विविध सुविधा, एकतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने किंवा ऑटोमेटेड फोन बँकिंग सिस्टीममध्ये पर्याय डायल करून देऊ शकेल. कार्डधारक स्वीकार करतो की, आता दिलेल्या किंवा ज्या यानंतर दिल्या जाऊ शतील अशा कोणत्याही लेखी स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्सच्या व्यतिरिक्त बँक थेट किंवा तिने नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून आणि दूरध्वनीद्वारे सूचना देऊन (ज्या बँकेद्वारे प्रत्यक्ष किंवा ऑटोमेटेड सिस्टीमद्वारे स्वीकारल्या जातील) त्याला माहिती मिळण्याची सुविधा देत आहे. दूरध्वनीद्वारे दिलेल्या सूचनांमध्ये बँकेने वेळोवेळी ठरवल्यानुसार कार्डधारकाचे डेमोग्राफिक डिटेल्स बदलण्याच्या सूचनांचाही समावेश असू शकतो, जसे राहण्याचे ठिकाण आणि/किंवा पत्रव्यवहाराचा पत्ता, घरचा आणि/किंवा कार्यालयाचा पत्ता, मोबाईल फोन क्रमांक किंवा कार्डधारकाचे इतर कोणतेही वैयक्तिक तपशील.

(ii) कार्डधारकाला जाणीव आहे की, अशा प्रकारच्या दूरध्वनीवरून मिळणाऱ्या सुविधेच्या संबंधात त्याने बँकेला किंवा तिने नियुक्त केलेल्या प्रतिनिधींना दूरध्वनीवरून त्याचा खाते क्रमांक आणि त्याने मूळचा निवडलेला किंवा बँकेने त्याला सुचविलेला किंवा तोंडी सूचनेद्वारे किंवा अन्यथा त्यानंतर बदलेला टेलिफोनिक पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (''टी-पिन'') देण्याची आवश्यकता असते. कार्डधारकाला असाही सल्ला देण्यात येतो की, तो जर टोन-एनेबल्ड टेलिफोनवरून कॉल करीत असेल, तर त्याने त्याचा टी-पिन बोलून दाखवू नये. त्याऐवजी, कार्डधारक त्याचा टी-पिन इंटरॲक्टिव्ह व्हॉईस रिस्पॉन्स सिस्टीमवर डायल करू शकेल.

(iii) कार्डधारक जर आवाज नसलेल्या (टोन सपोर्ट नसलेला) टेलिफोनवरून कॉल करीत असेल, तर कार्डधारकाने त्याचा टी-पिन बोलण्याची गरज असते, ज्यानंतर कार्डधारकाने त्याचा टी-पिन तात्काळ बदलण्याची आवश्यकता असते. दूरध्वनीवरील ही सेवा कार्डधारकाच्या आता असलेल्या किंवा यानंतर उघडल्या जाणाऱ्या सर्व खात्यांना समाविष्ट करून घेईल आणि लागू असेल. ही सुविधा इतर सर्व सुविधांना, ऑफरिंग्जना, सध्या बँक सध्या देत असलेली किंवा बँक वेळोवेळी सुरू करील असे व्यवहार करण्याची क्षमता या सर्वांना लागू होईल. इतर कोणत्याही खात्यांसाठी, क्रेडिट कार्ड्ससाठी किंवा त्याच्याकडे सध्या असलेल्या किंवा त्याने भविष्यात उघडलेल्या आर्थिक उत्पादनांसाठी त्याला दिलेल्या (किंवा त्याने निवडलेला किंवा बदललेला) ह्या टी-पिनचा उपयोग त्याच्या इतर खात्यांना, क्रेडिट कार्ड्सना किंवा आर्थिक उत्पादनांना ॲक्सेस देण्यासाठी वापरण्यात येईल.ऑटोमॅटेड किंवा मॅन्युअल पर्यायांवरील व्यवहारांना हे लागू

असेल. कार्डधारकाला ह्याचीही जाणीव आहे की, टच-टोन फोनवरून कॉल करताना तो त्याचा टी-पिन उच्चारणार नाही, त्याऐवजी त्याने टेलिफोनच्या डायल पॅडवर टी-पिन डायल करण्याची आवश्यकता असते. कार्डधारकाने जर त्याचा व्हॉईस टी-पिनचा पर्याय निवडला, तर कार्डधारक त्यानंतर त्याचा टी-पिन तात्काळ बदलण्याचे मान्य करतो.

(iv) कार्डधारक विनाअट मान्य करतो की, (i) त्याने दिलेल्या सूचनांनुसार बँकेने प्रामाणिकपणे केलेल्या कृतीमुळे त्याच्या टी-पिनचा उपयोग कोणतेही खाते, क्रेडिट कार्ड, आता असेलेली आणि त्याने धारण केलेली किंवा तो भविष्यात उघडू शकेल अशी आर्थिक उत्पादने ॲक्सेस करण्यासाठी कोणताही गैरवापर किंवा फसवणूक केली, तर तो त्यासाठी बँकेला जबाबदार धरणार नाही. (ii) अशा सूचनांचे पालन करताना बँक सर्वोत्तम प्रयत्न करून हे करीत असते आणि त्याने दिलेल्या सूचनांवर कृती करण्यासाठी बँकेला विलंब झाला किंवा तात्काळ कृती करू शकली नाही तर त्यासाठी तो बँकेला जबाबदार धरणार नाही. (iii) बँक स्वत:च्या विवेकाधिकारात या सुविधेसाठी कोणत्याही वेळी आकार लावू शकेल (कार्डधारकाला योग्य ती सूचना देऊन) किंवा अशी सुविधा पूर्णपणे किंवा काही अंशी मागे घेऊ शकेल किंवा निलंबित करू शकेल; (iv) बँकेला जर असे वाटले की, (बँकेच्या या निर्णयाबद्दल कार्डधारकाने प्रश्न विचारू नये किंवा वाद निर्माण करू नये) अशा सूचना अस्सल नाहीएत किंवा अन्यथा अयोग्य किंवा अस्पष्ट आहेत किंवा शंकास्पद आहेत, तर बँक स्वत:च्या विवेकाधिकारात अशा सूचनांवर अमल न करण्याचा निर्णय घेऊ शकते.

(v) बँकेने कोणत्याही खात्यात केलेल्या व्यवहाराच्या विवरणात किंवा तपशिलांमध्ये जर काही त्रुटी असेल, तर त्याविषयी, विवरण (स्टेटमेंट) प्राप्त झाल्यानंतर बँकेला साठ (६०) दिवसांच्या आत संबंधित त्रुटीविषयी लेखी कळविणे ही कार्डधारकाची जबाबदारी असेल, असे न केल्यास असा व्यवहार बरोबर आहे आणि कार्डधारकाने तो स्वीकारलेला आहे असे समजण्यात येईल. बँकेने कार्डधारकाला ही सुविधा पुरविण्याच्या बदल्यात, कार्डधारक बँकेला सर्व कारवाई, दावे, मागण्या, न्यायिक प्रक्रिया, नुकसान, हानी, उत्पादनखर्च, आकार आणि खर्च, जे कार्डधारकाला सदर सुविधा पुरविल्यामुळे किंवा बँकेने कार्डधारकाच्या सूचनांनुसार प्रामाणिकपणे कोणतीही कृती केल्यामुळे किंवा न केल्यामुळे, बँकेला कोणत्याही वेळी करावे, सोसावे, भोगावे किंवा सामना करावा लागेल, त्याची भरपाई करण्याचे व भरपाई करीत राहण्याची हमी कार्डधारक मान्य करतो. कार्डधारक मान्य करतो की, बँक जेव्हा त्याच्या सोयीसाठी या सूचनांवर अमल करते तेव्हाही वरील हमीच्या सर्व अटी लागू असतील, जर तो त्याचा टी-पिन पुरवू शकला नाही तर आणि बँक स्वत:च्या विवेकाधिकारात ज्या योग्य अशा प्रकारच्या इतर तपासण्या अमल करण्यापूर्वी करू शकेल.

(vi) सुरक्षिततेच्या कारणासाठी आणि कार्डधारकाला आणि तिच्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी आणि काही वाद असलेच तर ते मिटविण्यासाठी बँक स्वत:च्या विवेकाधिकारात कार्डधारक आणि बँक यांच्यात झालेले संभाषण टेप किंवा रेकॉर्ड करील, त्याची तसेच कार्डधारकाच्या सूचनांची नोंद ठेवील आणि त्या ऐकेल, आणि कार्डधारक यासाठी त्याची संमती देत आहे.

३३.१९ इंटरनेट बँकिंग सेवा:

(i) इंटरनेट बँकिंग सेवा पुरविण्यासाठी बँक ज्या सिस्टीमचा उपयोग करते, तिच्यात पुरेशा प्रमाणात सुरक्षिततेचे उपाय असतील; लागू असलेले कायदे, नियम, नियमावली, मार्गदर्शक सूचना, परिपत्रके, आचारसंहिता आणि त्याशिवाय बाजारपेठेतील प्रचलित प्रथा विचारात घेऊन अशा ऑपरेटिंग सिस्टीममधील जोखमींवर नियंत्रण ठेवील आणि त्यांचे व्यवस्थापन यासाठी रास्तपणे व्यवहार्य पावले उचलील. कार्डधारकाला इंटरनेट बँकिंगशी जोडलेल्या जोखमी, जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्वे यांची जाणीव आहे आणि योग्य तो विचार करूनच त्यांनी त्यांचा लाभ घेतलेला आहे. कार्डधारक निवेदन करतो आणि हमी देतो की, त्याला संगणक/इलेक्ट्रॉनिक मशिनरी, ई-मेल आणि इंटरनेट यांचे कामचलाऊ ज्ञान आहे आणि त्यामुळे कार्डधारकाला इंटरनेट बँकिंगचा लाभ घेणे शक्य होईल.

(ii) प्रायमरी कार्डधारकाकडे इंटरनेट बँकिंग वापरण्याची सुविधा आणि ई-कॉमर्स सुविधा आहे; (३) कार्डधारक मान्य करतो की, त्याने विनंती केल्यामुळे बँकेने कार्डधारकाला बँकेच्या संकेतस्थळाच्या (www.kotak.com) माध्यमातून क्रेडिट कार्ड व्यवहार करण्याची सुविधा पुरविण्याचे मान्य केलेले आहे.

(iv) कार्डधारक भारतातील लागू असलेल्या सर्व कायद्यांना आणि त्याने इंटरनेट बँकिंगचा वापर केल्यामुळे लागू होणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यांना बांधील राहण्याचे आणि त्यांचे पालन करण्याचे मान्य करतो. इंटरनेटरील कोणत्याही व्यवहारात जर परकीय चलन पाठवीत असेल, तर ते आरबीआयच्या विनिमय नियंत्रण नियमावलीनुसारच असेल ह्याची काळजी घ्यावी असा सावधानतेचा इशारा देण्यात येत आहे आणि असे न केल्यास कार्डधारक परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ अंतर्गत होणाऱ्या दंडात्मक कारवाईसाठी जबाबदार असेल. कार्डधारकांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी बँक स्वत:च्या विवेकाधिकारात, खरेदीचे मूळ आणि स्वरूप यांनुसार विशिष्ट इंटरनेट व्यवहारांना नकार देऊ शकतात. व्यक्तीने/पक्षांनी दिलेल्या खात्याच्या अनधिकृत किंवा फसवणुकीने केल्या जाऊ शकणाऱ्या वापरापासून कार्डधारकांचे संरक्षण करण्यासाठी हे केले जाते.

(v) कार्डधारक पुष्टी करतो की, तो ज्या संकेतस्थळावर उत्पादनांची किंवा सेवांची प्राप्ती/खरेदी करण्याच्या आणि त्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून पेमेंट करण्यासंबंधी सूचना देऊन त्याच्या कार्डच्या माध्यामातून पेमेंट करण्याच्या ह्या अतिरिक्त वैशिष्ट्याचा लाभ घेईल त्याविषयी वेळोवेळी ओळख पटवील. कार्डधारक मान्य करतो आणि पुष्टी करतो की, अशा संकेतस्थळावर केलेल्या ऑर्डर्ससाठी पेमेंट करण्याची सुविधाच फक्त बँक पुरवते आणि ती उत्पादन आणि सेवा यांच्या विक्रीच्या वास्तविक व्यवहाराशी संबंधित नाही किंवा

त्याचा भाग नाही.

(vi) कार्डधारकाला इंटरनेट बँकिंग सेवा वापरण्यासाठी असलेला पिन/पासवर्ड त्यासाठी फक्त ऑनलाईन किंवा दूरध्वनीवरून विनंती प्राप्त झाल्यानंतरच पाठवील.

३३.२० ईमेलवर विवरण (स्टेटमेंट):

(i) कार्डधारकाने बँकेकडे नोंदवलेल्या ईमले पत्त्यावर बँकेने ईमेलद्वारे मासिक कार्डखाते विवरण पाठविण्यास कार्डधारक मान्यता देतो आणि मासिक कार्डखाते विवरण प्राप्त झाले असे समजण्यात येईल. कार्डधारकाला जर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्यात आलेले विवरण प्राप्त करण्यास काही अडचणी येत असतील, तर त्याने त्याविषयी बँकेला तात्काळ माहिती दिली पाहिजे, ज्यामुळे बँकेला पर्यायी मार्गांनी ते पाठवणे शक्य होईल. अशा प्रकारच्या अडचणीविषयी कार्डखाते विवरणाच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत जर बँकेला कळविले गेले नाही, तर त्याचा अर्थ कार्डखाते विवरण स्वीकारले गले आहे असा होईल.

(ii) कार्डधारकाला सुरक्षिततेच्या जोखमीविषयी जाणीव आहे, ज्यात त्याच्या विवरणात तृतीय पक्षाने केलेल्या हस्तक्षेपाचा समावेश आहे आणि त्यासाठी बँकेला जबाबदार न धरण्याचे तो मान्य करतो.

(iii) कार्डधारक कबूल करतो की, त्याला त्याच्या विवरणाविषयी माहिती मिळालेली आहे किंवा नाही याबद्दलच्या बँकेच्या कोणत्याही दायित्वाची जबाबदारी पूर्णपणे घेईल. सेवांचा वापर केल्याने किंवा वापर करण्यास असमर्थ असल्याने किंवा कोणत्याही वॉरंटीचा भंग झाल्यामुळे, निष्काळजीपणासह, कोणत्याही परिस्थितीत बँक कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, प्रासंगिक, विशेष किंवा परिणामस्वरूपीची हानी यासाठी जबाबदार असणार नाही.

३३.२१ बिल पेमेंट:

(i) बिल पेमेंटमुळे कार्डधारकाला त्याचे बँकेकडे असलेल्या ठरवून दिलेल्या खात्याचा उपयोग करून आणि बँकेकडे सेवा पुरविणाऱ्याच्या नोंदवलेल्या कोणत्याही खात्यात रक्कम जमा करून त्याच्या बिलांचे पैसे भरणे शक्य होते.

(ii) जर कार्डधारकाने बँकेला पर्यायी चॅनेल्सच्या माध्यमातून सेवांसाठी अशी बिले, व त्यावर काही आकार असले तर त्यासह कार्डधारकाच्या खात्यातून पैसे वजा करण्यासाठी अधिकृत केले, तर बिल पेमेंट बँकेद्वारे पुरविले जाते. कार्डधारकाने नोंद घ्यावी की, कोटक नेट बँकिंगच्या माध्यमातून केलेल्या बिल पेमेंटच्या व्यवहारासाठी कोणतेही रिवॉर्ड पॉईंट्स दिले जाणार नाही.

(iii) कार्डधारक कबूल करतो की, पुरविलेल्या सेवा ह्या केवळ बिल पेमेंटसाठी आहेत, ज्यात बिल करणारा बँकेकडे थेट नोंदणीकृत असतो. बिल करणाऱ्याने किंवा इथण सेवा पुरविणाऱ्याने थेट पुरविलेल्या सेवांचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व बँक करीत नाही, ज्याची निवड कार्डधारक स्वत:च्या जोखमीवर करील व त्याबद्दल कोणत्याही नुकसानासाठी/हानीसाठी/वादासाठी बँकेला जबाबदार धरणार नाही, जे कार्डधारकाच्या थेट देवाणघेवाणीतून निर्माण होतील.

(iv) कार्डधारक मान्य करतो की, बिल करणाऱ्याला (बिलर) आवश्यक असेल, त्यानुसार बँक बिल पेमेंट करील. चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदीमुळे बिल करणाऱ्याने बिलाची रक्कम नाकारली, तर कार्डधारक त्यासाठी बँकेला जबाबदार धरणार नाही.

(v) बिलिंग कंपनीकडे नोंदवलेल्या ओळखीच्या तपशिलांचे अचूक तपशील पुरविण्याचे कार्डधारक मान्य करतो आणि या बाबतीत चुकीच्या माहितीमुळे निर्माण झालेल्या कोणत्याही दायित्वासाठी बँकेला भरपाई देण्याचे मान्य करतो. बिलिंग कंपनीकडे नोंदवलेल्या ओळखीच्या तपशिलांमध्ये कोणताही बदल झाल्यास त्याविषयी बँकेने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत बँकेला कळविण्याचे कार्डधारक मान्य करतो.

(vi) बिलिंगच्या तपशिलांची अचूक हाताळणी करण्यासाठी बँक जरी सर्व प्रकारची रास्त काळजी घेणार असली, तरी कोणत्याही चुकीच्या तपशिलांमुळे/माहितीमुळे झालेल्या चुकीसाठी बँक जबाबदार नसेल. दिलेली माहिती जर चुकीची/अयोग्य आढळली, तर त्यामुळे होणारे नुकसान, हानी, इत्यादींसाठी कार्डधारक बँकेला जबाबदार धरणार नाही.

(vii) बँकेला बिलिंगचे तपशील देणाऱ्या बिलिंग कंपनीबद्दल कोणत्याही प्रकारची हरकत न घेण्याचे कार्डधारक मान्य करतो. कार्डधारक मान्य करतो की, बिलाच्या तपशिलासंबंधीचे कोणतेही वाद बिलिंग कंपनीकडे थेटपणे मिटवले जातील आणि बँकेची जबाबदारी फक्त माहिती पुरविण्यापुरती मर्यादित आहे.

(viii) कार्डधारक मान्य करतो की, दिलेल्या सूचनांच्या आणि बँकेसोबतच्या व्यवहारांच्या नोंदी ह्या सर्व उद्देशांसाठी अंतिम आणि बंधनकारक असतील आणि कोणत्याही न्यायिक प्रक्रियेमध्ये त्यांचा पुरावा म्हणून वापर केला जाऊ शकतो. त्याही पढे कार्डधारक असे मान्य करतो की, बिल पेमेंट सेवेसाठी जर काही आकार असलेच, तर ते फक्त बँकेच्या एकमेव विवेकाधिकारात असतील आणि कार्डधारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता बँक त्यात वेळोवेळी बदल करण्यास स्वतंत्र आहे. कार्डधारक मान्य करतो की, कोणत्याही खात्याच्या/खात्यांशी संबंधित बिल पेमेंट सुविधा किंवा त्याअंतर्गत पुरविण्यात आलेल्या कोणत्याही सेवा कोणत्याही वेळी, कोणतेही कारण न देता आणि त्याला कोणतीही सूचना न देता मागे घेण्यास बँक स्वतंत्र आहे.

३४. **सुरक्षित कार्ड**

८११ # ड्रीम डिफरंटक्रेडिट कार्ड / कोटक एनआरआय क्रेडिट कार्ड आणि सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम सुरक्षित क्रेडिट कार्ड (या खंडाच्या हेतुपुरते एकत्रितपणे सुरक्षित क्रेडिट कार्ड'' असे संबोधित) यांबाबतीत, कार्ड खात्यावरील संपूर्ण थकित शिल्लक, कोणत्याही थकित कार्ड व्यवहारांच्या रकमेसोबत, व्याज आणि इतर सर्व खर्च व निम्नोल्लेखित आकारण्यांसकट, ज्या लागू होतात पण कार्डधारकाद्वारे क्रेडिट कार्ड वापरात असताना कार्ड खात्यावर आकारण्यात आलेल्या नाहीत, त्या बँकेकडून संमत करण्यात आलेले, बँकेने विहित केलेल्या स्वरूपात आणि पद्धतीत कार्डधारकाच्या नावावर एकट्याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तिसोबत संयुक्तपणे असणाऱ्या अशा प्रतिभूती / मुदत ठेवी / अशा इतर मत्ता ताबेगहाण / नजरगहाण / धारणाधिकाराच्या मार्गाने सुरक्षित करण्यात येतील. कार्डधारक प्रतिभूतीच्या निर्मितीसाठी बँकेसाठी समाधानकारक स्वरूपात आणि पद्धतीत अशी सर्व कागदपत्रे सादर करेल. प्रतिभूती निर्मिती आणि मुद्रांक शुल्क इ. चा समावेश असलेल्या पण त्यापुरते मर्यादित नसलेल्या इतर सर्व सोपस्कारांच्या पूर्ततेसाठी येणारा खर्च कार्डधारकाद्वारे केला जाईल.

३४.१ ८११ # ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्ड नियम

८११ # ड्रीम डिफरंटक्रेडिट कार्ड हे असे क्रेडिट कार्ड आहे जे बँकेने कार्डधारकाला त्याच्या नावावर बँकेकडे असलेल्या मुदती ठेवीसमोर निर्गमित केलेले असते (यापुढे ८११ # ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्ड'' असे संबोधित). ८११ # ड्रीम डिफरंट क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी, अर्जदाराने बँकेकडे किमान रु १५,००० ची मुदती ठेव जपणे आवश्यक आहे.

३४.२ कोटक एनआरआय क्रेडिट कार्ड अटी

कोटक एनआरआय क्रेडिट कार्ड अटी हे बँकेने अनिवासी भारतीयांना त्यांच्या नावावर बँकेकडे असलेल्या एनआरई / एनआरओ मुदती ठेवीसमोर निर्गमित केलेले असते. कोटक एनआरआय क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी, अर्जदाराला बँकेने विहित केलेल्या किमान रकमेची एनआरई / एनआरओ मुदती ठेव जपावी लागेल. जर एनआरई मुदती ठेव १ वर्षाच्या आत बंद केली तर तेवढ्या कालावधीसाठी मुदती ठेवीवर ग्राहक व्याज कमावू शकणार नाही.

३४.३ सिल्क इन्स्पायर सिक्युअर्ड प्लॅटिनम क्रेडिट कार्ड अटी

सिल्क इन्स्पायर सिक्युअर्ड प्लॅटिनम क्रेडिट कार्ड हे असे क्रेडिट कार्ड आहे जे बँकेने कार्डधारकाला त्याच्या नावावर बँकेकडे असलेल्या मुदती ठेवीसमोर निर्गमित केलेले असते. सिल्क इन्स्पायर सिक्युअर्ड प्लॅटिनम क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी, अर्जदाराला बँकेकडे किमान रु ५०,००० ची मुदती ठेव जपणे आवश्यक आहे.

३४.४ सुरक्षित कार्डसाठीचे सर्वसाधारण नियम:

सदर मुदती ठेवेची रक्कम वेळोवेळी बँकेच्या एकल निर्णयाधीन बदलू शकते. सुरक्षित क्रेडिट कार्डवरील क्रेडिट मर्यादा मुदती ठेवीच्या रकमेच्या ऐंशी टक्के (८०%) असेल. सदर क्रेडिट मर्यादा बँकेच्या एकल निर्णयाधीन वेळोवेळी बदलू शकते. सुरक्षित क्रेडिट कार्ड मिळवण्याच्या हेतुकरिता लागणारी / लागणाऱ्या मुदती ठेव / ठेवी अर्जदाराने विहित अर्ज प्रपत्र भरून किंवा वेळोवेळी बँकेने विहित केलेल्या इतर कोणत्याही मार्गाने उघडण्यात येईल / येतील. अशा प्रकारे उघडण्यात आलेली / आलेल्या मुदती ठेव / ठेवी किमान एक वर्ष एक दिवसासाठी असतील आणि स्वयंनूतनीकरण अनुकूलित असतील, आणि या नियम व अटींव्यतिरिक्त, क्रेडिट कार्ड आणि मुदती ठेवीसंबंधातील बँकेच्या नियम व अटीसुद्धा लागू होतील. सुरक्षित क्रेडिट कार्ड निर्गमित झाल्यानंतर, बँकेचा सर्वसाधारण धारणाधिकार आणि वजावट यांव्यतिरिक्त सुरक्षित क्रेडिट कार्ड किंवा मुदती ठेवीच्या समाप्तीपर्यंत, जसे असेल तसे, बँक कार्डधारकाने जमा केलेल्या संपूर्ण मुदती ठेवीच्या रकमेवर, कार्डधारकाने कमावलेले व्याज वगळता आपला धारणाधिकार बजावेल. अर्जदाराची बँकेकडे आधीपासूनच मुदती ठेव असेल, तर ती मुदती ठेवीची रक्कम अर्जदाराच्या सुरक्षित क्रेडिट कार्ड खात्याशी संलग्न करण्यात येईल आणि तिचे स्वयंनूतनीकरण तत्काळ अनुकूल करण्यात येईल. कार्ड खात्याशी संलग्न असलेल्या मुदती ठेवीमधून कार्ड धारकांना अंशत: पैसे काढून घेण्याचे अधिकार नसतील. सुरक्षित क्रेडिट कार्ड मिळवण्यासाठी उघडलेल्या मुदती ठेवीचा कालावधी समाप्त किंवा रद्द केला नाही तर स्वयंनूतनीकरण अनुकूल राहील. एचयुएफ, भागीदारी पेढी यांनी उघडलेल्या मुदत ठेवी सुरक्षित क्रेडिट कार्ड मिळवण्यास पात्र नसतील. अर्जदाराने इतर कोणत्याही व्यक्तिसोबत संयुक्तपणे मुदती ठेव उघडल्यास, फक्त मुदती ठेव उघडण्यासाठी पुरवलेल्या अर्ज प्रपत्रावरील तपशिलानुसार पहिल्या खाते धारकाच्याच नावावर सुरक्षित क्रेडिट कार्ड निर्गमित करण्यात येईल. सुरक्षित क्रेडिट कार्डचे निर्गमन यशस्वीपणे मुदती ठेव उघडण्याच्या अधीन राहील.

कार्ड खाते विवरणाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत सुरक्षित क्रेडिट कार्डवर देय असलेली किमान रक्कम भरण्यास कार्डधारक अयशस्वी ठरल्यास, बँकेकडे पूर्वसूचनेशिवाय किंवा कार्डधारकांना संबोधल्याशिवाय मुदती ठेवेची रक्कम समापित करण्याचा आणि बँकेकडे सुरक्षित क्रेडिट कार्डसमोर देय असलेली थकित रक्कम मुदती ठेवीमधून विनियोजित करण्याचा आणि वजावट करण्याचा अधिकार असेल आणि अशा कपातीनंतर उरलेली रक्कमच स्वयंनूतनीकरणाच्या सूचनांसह सुरु राहील. मुदती ठेव सुरु ठेवण्यासाठीची किमान मर्यादा एनआरई मुदत ठेवीसाठी रु २५,०००, एनआरओ मुदती ठेवीसाठी रु १०,००० आणि ज्या मुदती ठेवीसमोर ८११# ड्रीम डिफरंटक्रेडिट कार्ड निर्गमित झाले असेल त्या ठेवीसाठी रु १०,००० असेल. थकित रकमेच्या विनियोजनानंतर मुदती ठेवीची रक्कम

मर्यादेच्या रकमेहून कमी असेल तर मुदती ठेव समापित करण्यात येईल आणि ती रक्कम कार्डधारकांच्या बँकेकडे असलेल्या खात्यावर क्रेडिट केली जाईल.

अर्जदाराने उघडलेल्या मुदती ठेवीसाठी एका व्यक्तिला नामनिर्देशित करण्याचा अर्जदाराला अधिकार असेल. कार्डधारकाला मुदती ठेव काढून घ्यायची / बंद करायची असल्यास, किंवा कार्डधारकाने अथवा बँकेने सुरक्षित क्रेडिट कार्ड रद्द केल्यास, किंवा कार्डधारकाच्या मृत्युमुळे मुदत ठेव बंद झाल्यास, बँकेकडे पूर्वसूचनेशिवाय किंवा कार्डधारकांना संबोधल्याशिवाय मुदती ठेवेची रक्कम समापित करण्याचा आणि बँकेकडे सुरक्षित क्रेडिट कार्डसमोर देय असलेली थकित रक्कम मुदती ठेवीमधून विनियोजित करण्याचा आणि वजावट करण्याचा अधिकार असेल, आणि कार्डधारक / नामनिर्देशित व्यक्ती कार्डधारकाद्वारे बँकेकडे देय असणाऱ्या कोणत्याही रकमांची कपात झाल्यानंतर, यामध्ये बँकेकडे देय असलेल्या कोणत्याही आकारणी, शुल्के इ. समाविष्ट, उर्वरित मुदती ठेवेची रक्कम अधिक संचयित व्याज मिळवण्यास पात्र असेल. कार्डधारकाच्या मृत्युनंतर सुरक्षित क्रेडिट कार्ड बंद होईल.

**३५. अतिरिक्त अस्वीकार**

३५.१ बँक स्वत:च्या निर्णयानुसार, कार्डधारकाने बँकेच्या वास्तूंतून / यंत्रांतून / उपकरणांतून केलेल्या बँकेच्या सुविधांच्या वापरांचे / कार्डधारकाच्या उपस्थितीचे / प्रवेशाचे चलचित्रण किंवा कॅमेरावर अभिलेखन करेल, आणि मिळालेल्या सर्व सूचना, फोनवर झालेले संवाद जतन करेल आणि कोणत्याही प्रक्रियांमध्ये बँक या अशा चित्रफितींमधील दृश्यांवर / रेकॉर्डिंगवर अवलंबून राहील.

३५.२ एटीएम / टच ॲक्सेस बँकिंग टर्मिनल / ईडीसी - पीओएस / इतर यंत्रांवरील कार्डचा वापर कार्डधारकाची पुढील बाबींसाठीची स्पष्ट संमती दर्शविल :

(i) व्यवहाराच्या आणि खात्याच्या यथायोग्य नोंदी जपण्यासाठी बँकेला आवश्यक असणाऱ्या कोणत्याही मार्गांनी खात्यातील शिल्लकीची माहिती गोळा करणे, साठवणे, पाठवणे आणि तिच्यावर प्रक्रिया करणे तसेच ती ओळखणे;

(ii) एटीएममध्ये / इतर यंत्रांवरून कार्डचा वापर सक्षम करण्यासाठी कार्डधारकाच्या खात्याचे तपशील आणि व्यवहाराची माहिती आणि इतर आवश्यक माहिती बँक एटीएम नेटवर्क मधील / इतर नेटवर्कमधील सहभागीदारांना आणि प्रक्रियाकारांना प्रस्तुत करणे आणि पारेषित करणे;

(iii) बँकेमधील / इतर नेटवर्कमधील सदर सहभागीदारांची आणि प्रक्रियाकारांची अशी माहिती जतन करणे;

(iv) बँकेमधील / इतर नेटवर्कमधील सदर सहभागीदारांकडून आणि प्रक्रियाकारांकडून अशा सहभागीदारांना आणि प्रक्रियाकारांना लागू होणाऱ्या माहिती प्रकटनासंदर्भातील कायदे व नियमनांचे अनुपालन;

(v) जिथे व्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल तिथे त्रयस्थ पक्षांना कार्डधारकाच्या बँक खात्या(त्यां)च्या किंवा कार्डच्या वापरामार्फत केलेल्या व्यवहारांच्या किंवा वैयक्तिक तपशिलांच्या माहितीचे प्रकटन; आणि / किंवा कायद्याचे किंवा शासकीय संस्थेचे किंवा न्यायालयीन आदेशांचे किंवा कायदेशीर प्रक्रियांचे अनुपालन करणे आवश्यक असेल तेव्हा; आणि / किंवा त्रुटी सोडवण्यासाठी किंवा कार्डधारकाने विचारलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा; आणि / किंवा बँकेच्या अंतर्गत माहिती प्रक्रिया गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा;

(vi) कार्डधारक बँकेला कार्डधारकाकडून कायद्यान्वये किंवा नियमनान्वये आवश्यक असलेली अशी सर्व माहिती, किंवा बँक वेळोवेळी वाजवी स्वरूपात मागेल अशी इतर कोणतीही यथायोग्य माहिती देण्यास सहमती दर्शवत आहे.

**३६. 'डू नॉट कॉल' रजिस्ट्री**

३६.१ डू नॉट कॉल रजिस्ट्री बँकेच्या विद्यमान ग्राहकांसाठी खुली आहे आणि बँकेशी कोणतेही विद्यमान नाते नसणाऱ्या ग्राहकांसाठीही खुली आहे.

३६.२ '' डू नॉट कॉल'' साठीची रजिस्ट्री केवळ ग्राहकाच्या मोबाईल / दूरध्वनी क्रमांकावर फोन करून बँकेतर्फे देऊ करण्यात येणाऱ्या उत्पादनांशी व सेवांशी मर्यादित टेलिमार्केटिंग ऑफर्सपुरती मर्यादित आहे.

३६.३ कार्डधारक बँकेच्या फोन बँकिंग क्रमांकावर फोन करून किंवा बँकेच्या वेबसाइटवर (www.kotak.com) रजिस्टर करून ''डू नॉट कॉल'' रजिस्टर करू शकतो.

३६.४ ग्राहकाने त्याचा मोबाईल क्रमांक बदलला, तर पुनर्नोंदणीमार्फत बँकेला तसे कळविण्यात यावे.

३६.५ '' डू नॉट कॉल'' च्या रजिस्ट्रेशनमध्ये खाते अथवा कार्ड जतनाशी संबंधित, कॉल्स, व्यवहारांवरील संदेश, खाते अथवा कार्ड दायित्वांच्या वसुलीसाठी येणारे कॉल्स समाविष्ट नसतील किंवा त्यांवर मर्यादा येणार नाहीत.

३६.६ '' डू नॉट कॉल'' रजिस्ट्रेशन अंमलात येण्यासाठी ४५ (पंचेचाळीस) कामाचे दिवस लागतील.

३६.७ ही सेवा सर्वोत्तम प्रयत्नाच्या पातळीवरच पुरवली जाते.

**३७. संपर्क तपशील आणि गाऱ्हाणी**

३७.१ ग्राहक संपर्क केंद्र

तुम्ही बँकेशी पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने संपर्क साधू शकता :

(i) कोटक क्रेडिट कार्डसाठीचे ग्राहक सेवा अधिकारी तुमच्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता आठवड्याचे सर्व दिवस २४ तास उपलब्ध असतील, पुढील क्रमांकावर :

**१८६० २६६ २६६६ (स्थानिक कॉल दर लागू) किंवा**

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई६६००६०२२ | नवी दिल्ली६६००६०२२ | चेन्नई६६००६०२२ | बंगळुरु६६००६०२२ |
| हैदराबाद६६००६०२२ | पुणे ६६००६०२२ | अहमदाबाद६६००६०२२ | कोलकाता६५५०६०२२ |

आयव्हीआर मेन्यु २४X७ उपलब्ध आहे. केवळ दोन पायऱ्यांची प्रक्रिया पाळा :

1 **तुमचा संपूर्ण १६ अंकी क्रेडिट कार्ड क्रमांक प्रविष्ट करा.**
(उदा.४१६६ ४६XX XXXX०००१)

2 **तुमचा टेलिफोनिक पिन प्रविष्ट करा**तुम्ही फोनवरून तुमचा टीपिन तत्काळ मिळवू शकता.

आणि पुढील माहिती तत्काळ मिळवा :

| | | |
|---|---|---|
| उपलब्ध क्रेडिट मर्यादाअखेरचे | उपलब्ध रोख मर्यादा | अधिदान तपशील |
| ५ व्यवहार | विवरण तपशील | क्रेडिट कार्ड हरवल्याची तक्रार करा |

(ii) इथे लिहून कळवा :

| | |
|---|---|
| नियमित टपाल : | कुरिअर : |
| कोटक महिंद्रा बँक लि. | सेवा प्रबंधक, कोटक महिंद्रा बँक लि. |
| कार्ड्स बिझनेस,<br>टपाल पेटी क्र. २७७०३ | कार्ड्सबिझनेस,५वा मजला, कोटक इन्फिनिटी, इमारत क्र. २१,<br>इन्फिनिटी पार्क, पश्चिम द्रुतगती महामार्गावरून,<br>जनरल ए के वैद्य मार्ग |
| मालाड (पूर्व) | मालाड (पूर्व) |
| मुंबई ४०० ०९७, भारत | मुंबई - ४०० ०९७, भारत |

(iii) www.kotak.com वर लॉगिन करून किंवा आमच्या वेबसाइटवरील तुमच्या इंटरनेट बँकिंग खात्यावरून ईमेल पाठवा. तुम्ही आमच्याशी साधलेल्या सर्व संपर्कांमध्ये, कृपया तुमचा १६ अंकी क्रेडिट कार्ड क्रमांक दर्शवा.

३७.२ बिलिंग वाद निवारण

तुमच्या विवरणामध्ये नमूद केलेल्या आकारणीसी तुम्ही सहमत नसाल, तर विवरण दिनांकापासून ६० (साठ) दिवसांच्या आत ते बँकेला कळवावे, तसे न केल्यास विवरणातील सर्व आकारण्या योग्य असून तुम्हाला त्या मान्य आहेत असे मानण्यात येईल. सदर तक्रार मिळाल्यानंतर, बँक चौकशी होईपर्यंत तत्कालिक पातळीवर आकारणी मागे घेऊ शकते. बिलिंग वादांशी संबंधित सर्व तक्रारी लेखी स्वरूपात उपरोक्त पत्त्यावर पाठवता येऊ शकतात. कृपया नोंद घ्या की आंतरराष्ट्रीय व्यवहारासंदर्भात वाद असल्यास, तुम्ही आम्हाला तुमच्या पासपोर्टची प्रत देणे आवश्यक आहे.

३७.३ गाऱ्हाणी निराकरण / तक्रारी / वाद वृद्धी

तुम्ही आमच्या सेवांमुळे समाधानी नसाल, तर तुम्ही तुमचे गाऱ्हाणे याद्वारे नोंदवू शकता :

(i) ु.ज्ञोंरज्ञ.ले वर लॉग ऑन करून किंवा आमच्या वेबसाइटवर तुमच्या इंटरनेट बँकिंग खात्यातून ईमेल पाठवा.

(ii) आमच्या ग्राहक संपर्क केंद्रावर कॉल करा

(iii) प्रबंधक - सेवा परिचालने, कोटक महिंद्रा बँक लि., कार्ड्स बिझनेस, २रा मजला, कोटक इन्फिनिटी, इमारत क्र. २१, इन्फिनिटी पार्क, पश्चिम द्रुतगती महामार्गावरून, जनरल ए के वैद्य मार्ग, मालाड (पू), मुंबई - ४०००९७, भारत येथे लिहून कळवा.

जर तुमच्या गाऱ्हाण्यावर मिळालेल्या उत्तराने तुमचे समाधान झाले नसेल किंवा १० दिवसांहून अधिक काळ काही निराकरण न झालेल्या तक्रारी किंवा गाऱ्हाणी असतील, तर तुम्ही बँकेतील उच्च प्राधिकरणांना संबोधून गाऱ्हाणे दाखल करू शकता. यासाठी एम. राजू, नोडल अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लि., ५वा मजला, कोटक इन्फिनिटी इमारत क्र. २१, इन्फिनिटी पार्क, पश्चिम द्रुतगती महामार्गावरून, जनरल ए के वैद्य मार्ग, मालाड (पू), मुंबई - ४०००९७, भारत यांना लिहून कळवा किंवा पेवरश्रेषठलशीञ्ज्ञोंरज्ञ.ले इथे ईमेल करा. जर बँकेने तुमची तक्रार दाखल करून घेतल्यानंतर ३० दिवसांमध्ये तिचे निराकरण केले नाही तर सदर तक्रार बँकिंग लोकपालापर्यंत नेता येऊ शकते. तुमच्या क्षेत्रासाठीच्या बँकिंग लोकपालाचे तपशील शाखांमध्ये प्रदर्शित केलेले असतील.

**३८. अभिहस्तांकन**

३८.१ बँक या करारांतर्गत असलेला बँकेचा अधिकार आणि दायित्व संपूर्णपणे किंवा अंशत: कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिला, बँकेला योग्य वाटेल त्या पद्धतीत आणि तशा नियम व अटी घालून विक्री करण्यास, अभिहस्तांकित करण्यास, प्रतिभूतीत किंवा हस्तांतरित करण्यास पात्र आहे. अशी कोणतीही विक्री, अभिहस्तांकन, प्रतिभूतीकरण किंवा हस्तांतरण कार्डधारकासाठी अंतिमत: बंधनकारक असेल.

३८.२ कार्डधारक त्याचे अधिकार आणि दायित्वे या करारांतर्गत हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यास पात्र नसेल.

३८.३ बँक अशा कोणत्याही बदलाबाबत कार्डधारकाला लेखी संवादामार्फत रीतसर कळवेल. कार्डधारकाने त्यानंतर सर्व थकित रकमा त्रयस्थ व्यक्तिस देणे बंधनकारक असेल आणि तो बँकेकडे असलेल्या दायित्वांपासून मुक्त होईल.

**कोटक रॉयल सिग्नेचर, झेन सिग्नेचर, व्हाइट सिग्नेचर, वेल्थ मॅनेजमेंट इन्फायनाइट, प्रीव्ही लीग सिग्नेचर आणि लीग प्लॅटिनम कार्ड यांसाठीचे विशेष नियम व अटी**

**१.** स्वागत भेट ऑफर

- ''स्वागत भेट'' किंवा ''ऑफर'' किंवा ''भेट ऑफर'' याचा अर्थ स्वागत लाभ असा होईल जे गिफ्ट व्हाउचर / सूट / विनिर्दिष्ट वस्तू / गुणांचे बक्षिस यांस्वरूपात कार्डधारकांना देऊ करण्यात येतील, ज्यांचे तपशीलवार वर्णन कार्डसोबत पुरवलेल्या स्वागत पुस्तिकेमध्ये आले आहे.

  ही ऑफर केवळ प्लॅटिनम आणि सिग्नेचर कार्डधारकांनाच उपलब्ध आहे.

१.१. स्वागत भेट

१. केवळ प्राथमिक कार्डधारक सहभाग शुल्काचे पूर्ण अधिदान झाल्यावर भेट ऑफरसाठी पात्र असेल. ॲड ऑन कार्डधारक कोणत्याही स्वागत भेटीसाठी पात्र नसतील.

२. कार्डधारकाने भेट ऑफरचा लाभ लागू कालावधीमध्ये घ्यायला हवा.

३. भेट ऑफरची पाठवणी होण्याआधीच कार्ड रद्द झाल्यास भेट ऑफर रद्द होईल.

४. भेट ऑफर अहस्तांतरणीय आहे, आणि तिच्या बदल्यात रोख रक्कम मिळवता येणार नाही, आणि बँकेद्वारे मिळालेल्या इतर कोणत्याही ऑफरला जोडून मिळवता येणार नाही.

५. अनुपलब्धतेमुळे, कार्डधारकाला लेखी किंवा इतर मार्गाने कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा संपर्क न करता, भेट ऑफरला पर्याय देऊ शकण्याचा आणि / किंवा ती बदलून देण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

६. भेट ऑफर्सचे मॉडेल, घडण, वैशिष्ट्य आणि विनिर्देश प्रमाणित मर्चंडाइसचा भाग असतीलच असे नाही आणि केवळ निदर्शनात्मक आहेत.

१.२. इतर नियम आणि अटी

१. भेट ऑफरमधील कार्डधारकाचा सहभाग पूर्णपणे ऐच्छिक आहे आणि तो ऐच्छिक स्वरूपातच झाल्याचे मानले जाईल.

२. बँक भेटीच्या गुणवत्तेबद्दल, अनुकूलतेबद्दल, स्वास्थ्याबद्दल कोणत्याही हेतुसाठी, पोहोचवणीसाठी (यामध्ये पोहोचवणीचा कोणताही कालावधी समाविष्ट) किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वॉरंटी देत नाही किंवा प्रतिनिधित्व करत नाही. वस्तू आणि सेवा किंवा ऑफर्सशी संबंधित कोणताही वाद किंवा कोणत्याही स्वरूपाचा दावा कार्डधारक आणि संबंधित व्यापारी यांच्या थेट संबंधाने, कोटक महिंद्रा बँकेशी कोणताही संदर्भ न जोडता सोडवण्यात यावा, आणि त्याद्वारे बँकेविरोधात कोणताही दावा करण्यात येऊ शकत नाही.

३. शासनाला किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाला देय असणारा कर किंवा दायित्वे किंवा आकारण्या, ज्या भेट ऑफरच्या संबंधाने कार्डधारकाच्या नावे उद्भवू शकतात किंवा संचयित होऊ शकतात, त्या केवळ कार्डधारकानेच भराव्यात. भेट ऑफरच्या आर्थिक मूल्यावर टीडीएस, जर असेल तर तो कार्डधारकाला भरावा लागेल.

४. भेट ऑफरशी संबंधित सर्व प्रकरणांबाबत, बँकेचा निर्णय अंतिम आणि सर्वत: बंधनकारक असेल.

**२. प्रायोरिटी पास लाभ**

१. कार्डधारक हे मान्य करतो आणि समजतो की त्याला/तिला प्रायोरिटी पास सदस्यत्व कार्ड कोट महिंद्रा बँक क्रेडिट कार्ड धारक असल्यामुळे मिळाले आहे ज्यामुळे कार्डधारक आणि त्याच्या/तिच्या सोबत येणाऱ्या पाहुण्यांना प्रायोरिटी पास लाऊंज प्रोग्रॅमचा भाग असणाऱ्या लाऊंजेसमध्ये प्रवेश मिळत आहे, व हा प्रवेश निम्नउल्लेखित नियम व अटींच्या अधीन राहून मिळेल.

२. प्रायोरिटी पास कार्ड अहस्तांतरणीय आहे आणि कार्डधारकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला ते वापरता येणार नाही. प्रायोरिटी पास कार्ड निर्गमित झाल्या दिनांकापासून एक वर्षभर वैध असेल.

३. प्रायोरिटी पास कार्ड पैसे भरण्यासाठी वापरता येणार नाही आणि हा ऋण पात्रतेचा पुरावासुद्धा नाही आणि अशाप्रकारे त्याचा वापर करायचा प्रयत्न केल्यास ती फसवणूक ठरते.

४. लाऊंजमध्ये प्रवेश करणे केवळ वैध प्रायोरिटी पास कार्ड सादर केल्यावरच शक्य आहे. इतर कोणतेही कार्ड प्रायोरिटी पास कार्डला पर्याय म्हणून वापरता येणार नाही.

५. लाऊंजला भेट देण्याची आकारणी प्रत्येक व्यक्तिच्या प्रत्येक भेटीअधीन आहे. जिथे लागू होतील तिथे (सदस्यत्व प्लॅनवर अवलंबून आहे), अशा सर्व भेटी, यांमध्ये सोबत आलेल्या पाहुण्यांच्या भेटीही समाविष्ट, कोटक महिंद्रा बँकेद्वारे (बँक) कार्डधारकाच्या क्रेडिट कार्ड खात्यावर बँकेने कार्डधारकाला त्याच्या / तिच्या प्रायोरिटी पास सदस्यत्वासंदर्भात कळवलेल्या दरांनुसार आणि नियमांनुसार डेबिट केल्या जातील. कार्डधारक आणि बँकेदरम्यान झालेल्या कोणत्याही वादांसाठी किंवा बँकेने डेबिट केलेल्या लाऊंज भेट शुल्काशी संबंधित झालेल्या नुकसानासाठी प्रायोरिटी पास ग्रूप ऑफ कंपनीज् जबाबदार ठरवले जाऊ शकत नाही.

६. लाऊंजमध्ये प्रवेश करताना प्रायोरिटी पास कार्ड सादर करतेवेळी, लाऊंजचे कर्मचारी कार्डची प्रत काढून घेतील आणि कार्डधारकाला एक भेटीच्या नोंदीची' पावती देतील किंवा वहीत नोंद करतील. काही लाऊंजेसमध्ये इलेक्ट्रॉनिक कार्ड रीडर असतात, जे प्रायोरिटी पास कार्डच्या मागच्या बाजूस असलेल्या चुंबकीय पट्टीवरून कार्डधारकाचे तपशील मिळवतील. जिथे लागू असेल तिथे, कार्डधारकाने भेटीच्या नोंदीच्या' पावतीवर सही करायला हवी, जिच्यावर सोबत आलेल्या पाहुण्यांच्या, जर असतील तर, नेमक्या आकड्याची नोंद असेल, पण तिच्यावर कोणताही प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्येक भेटीची आकारणी दिसत नाही. कार्डधारकासाठी प्रत्येक भेटीसाठीची आकारणी, जिथे लागू होईल तिथे, आणि पाहुण्यांसाठीची आकारणी भेटीच्या नोंदीच्या पावतीनुसार / नोंदवहीनुसार ठरेल जी लाऊंज संचालक बँकेकडे सुपूर्द करतील.

७. प्रायोरिटी पास कार्डच्या पावतीची प्रत / नोंद करणे ही लाऊंजच्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी असली, तरी लाऊंजचा वापर करतेवेळी भेटीच्या नोंदीची' पावती / नोंदवही योग्य वापराचे आणि आलेल्या पाहुण्यांचे योग्य तपशील दर्शवत असल्याची खातरजमा करणे ही कार्डधारकाची जबाबदारी आहे. जिथे लागू असेल तिथे, कार्डधारक त्याला लाऊंजमध्ये दिलेल्या 'भेटीच्या नोंदीची' पावतीची 'कार्डधारकाची' प्रत जतन करण्यासाठी जबाबदार असेल.

८. सर्व सहभागी लाऊंजेस त्रयस्थ पक्ष संस्थांच्या मालकीचे आणि त्यांच्याकडून संचालित आहेत. कार्डधारक आणि त्यांच्या सोबतीचे पाहुणे यांनी सहभागी लाऊंज / क्लबच्या नियमांचे आणि धोरणांचे पालन करायला हवे. जागेच्या अनुपलब्धतेमुळे प्रवेश निषिद्ध होऊ शकतो पण हे पूर्णत: प्रत्येक स्वतंत्र लाऊंज संचालकाच्या निर्णयाधीन आहे. प्रायोरिटी पास ग्रूप ऑफ कंपनीज् आणि बँक यांचे लाऊंजनी दिलेल्या सुविधा, उघडण्याच्या / बंद होण्याच्या वेळा, किंवा नोकरीवर ठेवलेल्या कर्मचारी यांवर अजिबात नियंत्रण नाही. प्रायोरिटी पासचे प्रशासक जाहिरातीनुसार लाभ आणि सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करतील, पण प्रायोरिटी ग्रूप ऑफ कंपनीज् किंवा बँक कोणत्याही प्रकारे कार्डधारकाच्या भेटीच्या वेळी सदर लाभ आणि सुविधा उपलब्ध असण्याबाबत वॉरंटी किंवा हमी देत नाही. तसेच जाहिरातीतील कोणत्याही लाभांच्या आणि सुविधांच्या पुरवठ्यातून किंवा पुरवठा न होण्यातून, पूर्णत: किंवा अंशत:,

उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी प्रायोरिटी ग्रूप ऑफ कंपनीज् किंवा बँक देय नाही. सोबत येणाऱ्या सर्व मुलांना (जिथे अनुमती असेल तिथे) लाऊंजच्या नियमांमध्ये वेगळे नमूद केले नसल्यास पाहुण्यांचे पूर्ण शुल्क आकारले जाईल.

९. सहभागी लाऊंजेस थांबण्याची कमाल कालमर्यादा धोरण (सहसा ३ - ४ तास) राबवण्याचा हक्क राखून ठेवू शकतात किंवा गर्दी टाळण्यासाठी कार्डधारकासोबत येऊ शकणाऱ्या पाहुण्यांच्या संख्येवर मर्यादा घालू शकतात. हे प्रत्येक स्वतंत्र लाऊंज संचालकाच्या

निर्णयाधीन आहे जो अतिरिक्त काळ थांबण्यासाठी शुल्क आकारू शकतो.

१०. सहभागी लाऊंजेसना करारान्वये विमान उड्डाणांच्या घोषणा करण्याचे कोणतेही दायित्व नाही आणि प्रायोरिटी पास ग्रूप ऑफ कंपनीज् किंवा बँक कोणत्याही कार्डधारकाला आणि / किंवा सोबतीच्या पाहुण्यांना त्यांच्या विमानात चढता न आल्यास उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नुकसानासाठी जबाबदार धरली जाऊ शकत नाही.

११. मोफत मद्यपेये (जिथे स्थानिक कायद्याने अनुमती आहे) पुरवणे प्रत्येक लाऊंज संचालकाच्या निर्णयाधीन आहे आणि काही बाबतींत ते मर्यादित असू शकते. अशा वेळी कोणत्याही अतिरिक्त आकारण्यांसाठी थेट लाऊंज कर्मचाऱ्यांना पैसे भरण्याकरिता कार्डधारक जबाबदार असेल. (तपशिलासाठी प्रायोरिटी पास वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या स्वतंत्र लाऊंजची वर्णने वाचा).

१२. दूरध्वनी सुविधा (जिथे उपलब्ध असतील तिथे) दर लाऊंजनुसार बदलतात आणि लाऊंज संचालकाच्या निर्णयाधीन पुरवल्या जातात. मोफत वापर सहसा स्थानिक कॉल्सपुरता मर्यादित असतो. फॅक्स, शॉवर, इंटरनेट आणि वायफाय सुविधा (जिथे लागू तिथे) प्रत्येक लाऊंज संचालकाच्या निर्णयाधीन आहेत आणि त्यांसाठीचे पैसे थेट लाऊंज कर्मचाऱ्यांना देणे ही कार्डधारकाची जबाबदारी असेल.

१३. लाऊंजमध्ये प्रवेश मिळणे हे कार्डधारकांकडे आणि कोणत्याही पाहुण्यांकडे त्यादिवशीचे वैध विमानप्रवासाचे तिकिट असण्याअधीन असेल. विमानसेवा, विमानतळ आणि इतर प्रवासक्षेत्रातील कर्मचारी जे कमी दराच्या तिकिटांवर प्रवास करत असतील, त्यांना कदाचित प्रवेश मिळणार नाही. अमेरिकेबाहेर, निर्गमनाच्या म्हणजेच केवळ परदेशी जाणाऱ्या प्रवाशांकडे विमान उड्डाणासाठी विमानाच्या तिकिटासोबत वैध बोर्डिंग पास असणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्या की युरोपमधील काही लाऊंजेस विमानतळाच्या नेमून दिलेल्या शेनगेन क्षेत्रांमध्ये असतात ज्याचा अर्थ असा की केवळ शेनगेन देशांदरम्यान प्रवास करणाऱ्यांनाच या लाऊंजेसमध्ये प्रवेश मिळतो (ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फिनलँड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, द नेदरलँड्स, आइसलँड, इटली, लक्झमबर्ग, नॉर्वे, पोर्तुगाल, स्पेन आणि स्वीडन).

१४. लाऊंजमध्ये प्रवेश मिळणे सदस्यांच्या आणि कोणत्याही पाहुण्यांचे (यामध्ये लहान मुले समाविष्ट) वर्तन आणि कपडे (युएसए बाहेर शॉर्ट्सची संमती नाही) सभ्य आणि योग्य रीतीत असण्याच्या अधीन आहे. लाऊंजमधील पाहुण्यांना विचलित करणारी किंवा त्रास होईल असे वागणारी अर्भके किंवा लहान मुले यांना लाऊंज कर्मचाऱ्यांच्या एकल निर्णयाधीन लाऊंज सुविधांमधून बाहेर जाण्यास सांगितले जाऊ शकते. सदस्याने आणि / किंवा पाहुण्यांनी या अटींचे पालन केले नाही म्हणून कार्डधारकाला आणि पाहुण्यांना लाऊंज संचालकाने प्रवेश नाकारल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी प्रायोरिटी पास ग्रूप ऑफ कंपनीज् किंवा बँक जबाबदार राहणार नाही.

१५. प्रायोरिटी पास कार्ड हरवल्यास, चोरी झाल्यास किंवा खराब झाल्यास बँकेच्या ग्राहक संपर्क केंद्राशी तत्काळ संपर्क साधावा.

१६. कार्डधारकाने बँकेकडील क्रेडिट कार्ड रद्द केल्यास किंवा नूतनीकरण न केल्यास किंवा एखादे खाते अपचारी खाते झाल्यास, प्रायोरिटी पास कार्ड त्याच्या क्रेडिट कार्ड रद्द झाल्याच्या / अवैध झाल्याच्या दिनांकापासून अवैध होईल. अवैध कार्ड वापरून कार्डधारकाने लाऊंजला भेट दिल्यास, यामध्ये पाहुणे समाविष्ट, त्या भेटीची आकारणी कार्डधारकाला करण्यात येईल आणि यासंबंधाने कार्डधारक बँकेविरोधात कोणताही दावा करणार नाही.

१७. प्रायोरिटी पास लि., यांना त्यांच्या धोरणांतर्गत, विमानसेवा, विमानतळ कर्मचारी किंवा विमानसेवा वा विमानतळ सुरक्षेच्या संदर्भातील शासकीय कर्मचारी यांना सदस्यत्व नाकारण्याचा अधिकार आहे.

१८. कार्डधारक आणि/किंवा कोणतेही पाहुणे यांच्यात आणि लाऊंज संचालकात उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही वादासाठी प्रायोरिटी पास ग्रूप ऑफ कंपनीज् किंवा बँक जबाबदार धरली जाऊ शकत नाही.

१९. कार्डधारक हे मान्य करतो की तो प्रायोरिटी पास आणि कोटक महिंद्रा बँक यांना, त्यांचे संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि एजंट्स (एकत्रितपणे 'क्षतिपूर्त पक्ष') यांना कार्डधारकाने किंवा कोणत्याही पाहुण्यांनी किंवा कार्डधारकाच्या वतीने सदर लाऊंजमध्ये एखाद्या व्यक्तिने केलेल्या लाऊंजच्या वापरातून कोणत्याही व्यक्तीस दुखापत झाल्यामुळे किंवा मृत्यु झाल्यामुळे किंवा कोणत्याही मालमत्तेचे नुकसान किंवा विध्वंस झाल्यामुळे उद्भवणाऱ्या सर्व दायित्वांपासून, अपायांपासून, नुकसानांपासून, दाव्यांपासून, खटल्यांपासून, निवाड्यांपासून, किंमती व खर्चांपासून (वाजवी वकिलाची शुल्के समाविष्ट) सुरक्षित ठेवेल आणि क्षतिपूर्त करेल आणि त्यांपासून यांना अपाय होऊ देणार नाही, अपवाद हा की क्षतिपूर्त पक्षांतर्फे अतिनिष्काळजीपणातून किंवा ऐच्छिक गैरवर्तनातून झालेल्या कृत्यांना ही क्षतिपूर्ती लागू होत नाही.

२०. प्रायोरिटी पास लाऊंज क्सेस फॅसलिटीच्या संबंधाने कार्डधारकाने केलेल्या किंवा त्याच्यावर केल्या गेलेल्या कोणत्याही दाव्यांसाठी किंवा वादांसाठी कशाही प्रकारे बँक जबाबदार किंवा देय राहणार नाही.

२१. बँक तिच्या एकल निर्णयाधीन कधीही प्रायोरिटी पास लाऊंज क्सेस फॅसिलिटी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय बदलेल किंवा काढून घेईल आणि कोणत्याही प्रकारे कार्डधारकाला यासंबंधात देय असणार नाही. अशा प्रकरणांत वार्षिक शुल्काचा / नोंदणी शुल्काचा (जे लागू असेल ते) परतावा होणार नाही.

२२. उपरोक्त संदर्भात तुमचा कोणताही वाद किंवा तक्रार असल्यास तुम्ही बँकेच्या ग्राहक संपर्क केंद्राशी संपर्क साधू शकता.

२३. या फॅसिलिटीमधून किंवा तिच्या संबंधाने किंवा तिच्यामुळे किंवा इतर कारणाने तिच्याशी संबंधित असणारे सर्व वाद, जर असतील तर, केवळ मुंबईमधील न्यायालयांच्या/न्यायाधिकरणांच्या एकल अधिकारक्षेत्राच्या अधीन राहतील.

**कोटक क्रेडिटकार्ड्स रीवॉर्ड्स प्रोग्रॅम विभाग :**

**अ. रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅम**

**१. व्याख्या :** पुढील संज्ञांचे, अनुषंगामध्ये वेगळा उल्लेख असल्याखेरीज पुढील अर्थ असतील :

क) ''रीवॉर्ड पॉइंट्स'' / ''डायनिंग पॉइंट्स'' / ''सेव्हिंग पॉइंट्स'' / ''झेन पॉइंट्स'' हे रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅम अंतर्गत दिले जाणारे रीवॉर्ड पॉइंट्स आहेत;

ख) ''देशांतर्गत खरेद्या'' म्हणजे रुपया चलनात केलेली कोणतीही खरेदी;

ग) ''आंतरराष्ट्रीय खरेद्या'' म्हणजे रुपया व्यतिरिक्त चलनात केलेली कोणतीही खरेदी.

**२. प्रोग्रॅम (कार्यक्रम)**

२.१. रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅम केवळ वेल्थ मॅनेजमेंट कार्ड, कोटक रोयाल सिग्नेचर, कोटक झेन सिग्नेचर, कोटक प्रीव्ही लीग सिग्नेचर, कोटक लीग प्लॅटिनम, फीस्ट, एनआरआय लीग प्लॅटिनम कार्ड, कोटक इसेन्शिया प्लॅटिनम क्रेडिट कार्ड, सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम क्रेडिट कार्ड आणि एनआरआय रोयाल सिग्नेचर कार्ड्स, कोटक अर्बेन गोल्ड आणि कोटक वेलॉसिटी प्लॅटिनम क्रेडिट कार्ड्स, कोटक सोलारिस प्लॅटिनम कार्ड, कोटक बिझ क्रेडिट कार्ड/वीर-प्लॅटिनम कार्ड/सिलेक्ट कार्ड, ६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड, ६ई रिवॉर्ड्स इंडिगो एक्सएल इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड यांना लागू होते. रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅम एक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम आहे जो कार्डधारकाला त्याच्या / तिच्या कार्डवर वस्तू आणि सेवांच्या देशांतर्गत / आंतरराष्ट्रीय खरेदीसाठी केलेल्या वैध आकारण्यांवर आणि रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅमच्या हेतुकरिता बँकेकडून वेळोवेळी समाविष्ट होणाऱ्या इतर कोणत्याही आकारण्यांवर रीवॉर्ड पॉइंट्स कमवू देतो.

२.२. सोलारिस क्रेडिट कार्डसाठी, कार्डधारक मूलभूत रीवॉर्ड पॉइंट्स कमावतील म्हणजेच, व्यापाऱ्याने व्यवहाराचा दावा केला की खर्च केलेल्या दर रु १५० मागे २ रीवॉर्ड पॉइंट्स मिळतील आणि ते त्याच विवरण चक्रामध्ये दर्शवले जातील. सर्व ई-कॉम / ऑनलाईन व्यवहारांवर (चजढज, खतठ आणि स्थायी सूचना वगळता) वर्धित रीवॉर्ड पॉइंट्स म्हणजेच खर्च केलेल्या दर रु १५० मागे ३ रीवॉर्ड पॉइंट्स त्यापुढील विवरण चक्रामध्ये दर्शवले जातील. कोणताही व्यवहार परावर्तित झाल्यास त्या प्रमाणात मूलभूत रीवॉर्ड पॉइंट्स ((६२द) त्याच विवरण चक्रामध्ये परावर्तित केले जातील. जर परावर्तित व्यवहार ई-कॉम व्यवहार असेल, तर वर्धित रीवॉर्ड पॉइंट्स (६३द) त्यापुढील विवरण चक्रामध्ये वजा केले जातील.

२.३. सोलारिस क्रेडिट कार्डसाठी, जर ग्राहकाने कार्ड सेट अप पासून ६० दिवसांच्या आत १ व्यवहार केला आणि सहभाग शुल्काचा संपूर्ण भरणा केला तर बोनस रीवॉर्ड पॉइंट्स ग्राहकाच्या नावे क्रेडिट होतील.

२.४. रीवॉर्ड पॉइंट्स प्रोग्रॅम कार्डधारकांना बँकेच्या एकल निर्णयाधीन उपलब्ध राहील, आणि दर कार्डनुसार तो वेगळा असू शकेल. प्रोग्रॅम संबंधित आणि / किंवा रीवॉर्ड पॉइंट्स संबंधित माहिती (यामध्ये रीवॉर्ड पॉइंट्सच्या विमोचनाचे स्वरूप आणि पद्धती इ. कोणत्याही मर्यादेशिवाय समाविष्ट) कार्डधारकाला बँकेकडून वेळोवेळी कळवली जाईल.

३. **गुण संचय**

रीवॉर्ड पॉइंट्स पुढील तक्त्यानुसार संचयित होतील.

| | कोटक पेड रोयाल | कोटक रोयाल कार्ड | कोटक झेन सिग्नेचर कार्ड | कोटक वेल्थ मॅनेजमेंट कार्ड | कोटक प्रीव्ही लीग सिग्नेचर (खरेदीदार योजना) | कोटक प्रीव्ही लीग सिग्नेचर (प्रवासी) | कोटक एनआरआय रोयाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विशेष प्रवर्ग | ट्रॅव्हल एजन्सीज् आणि टूर संचालक, पॅकेज टूर संचालक, विमानसेवा आणि विमान वाहक, विद्युत विक्री, टिकाऊ वस्तू, ीपार्टमेंट स्टोर्स आणि सर्व ांतरराष्ट्रीय खर्च | हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, ट्रॅव्हल एजन्सीज् आणि टूर संचालक, पॅकेज टूर संचालक, विमानसेवा आणि विमान वाहक, आणि सर्व आंतरराष्ट्रीय खर्च | केमॉलवर केलेले सर्व व्यवहार | हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, ट्रॅव्हल एजन्सीज् आणि टूर संचालक, पॅकेज टूर संचालक, विमानसेवा आणि विमान वाहक, आणि सर्व आंतरराष्ट्रीय खर्च | इन्सिग्निया कार्ड - कपडे, टिकाऊ वस्तू, वाणसामान, बहु ब्रँडेड ऑनलाईन डीपार्टमेंटल आणि स्टोर्स, ऑप्टिमा / प्रायमा कार्ड कपडे, टिकाऊ वस्तू, दागिने, डीपार्टमेंटल स्टोर्स आणि रेस्टॉरंट्स | इन्सिग्निया कार्ड - आंतरराष्ट्रीय खर्च, विमानसेवा, हॉटेल्स, ट्रॅव्हल एजन्सीज् आणि शुल्कमुक्त ऑप्टिमा / प्रायमा कार्ड कपडे, टिकाऊ वस्तू, दागिने, डीपार्टमेंटल स्टोर्स आणि रेस्टॉरंट्स | आंतरराष्ट्रीय खर्च |
| विशेष प्रवर्गांवरील रीवॉर्ड पॉइंट्स | १०द रीवॉर्ड्स/ य१०० | ४द रीवॉर्ड्स /य १५० | १५ झेन पॉइंट्स / य१५० | ५द खर्च केलेल्या दर य १०० मागे | ५द खर्च केलेल्या दर य १०० मागे | ५द खर्च केलेल्या दर य १०० मागे | २ रीवॉर्ड्स /य २०० |
| इतर प्रवर्गांवरील रीवॉर्ड पॉइंट्स | ५द रीवॉर्ड्स / य १०० | २द रीवॉर्ड्स / य १५० | ५ झेन पॉइंट्स / य१५० | २द खर्च केलेल्या दर य १०० मागे | २द खर्च केलेल्या दर य १०० मागे | २द खर्च केलेल्या दर य १०० मागे | १ रीवॉर्ड/ य २०० |
| पॉइंट्सचे विमोचन | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, ऑनलाईन खरेदी आणि एअरमाइल्स या प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात |
| रीवॉर्ड पॉइंट्स क्रेडिटमध्ये बदलण्याचा दर | ७.५ पैसे प्रति पॉइंट | १८.७५ पैसे प्रति पॉइंट | २५ पैसे प्रति पॉइंट | २५ पैसे प्रति पॉइंट | २५ पैसे प्रति पॉइंट | २५ पैसे प्रति पॉइंट | य १ प्रति पॉइंट |

| | कोटक लीग | अर्बेन | कोटक बिझ क्रेडिट कार्ड | कोटक मोजो प्लॅटिनम कार्ड | ट्रम्प / फीस्ट | इसेन्शिया | सोलारिस | ८११ # ड्रीम डिफरंट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विशेष प्रवर्ग | विमानसेवा, टिकाऊ वस्तू, डीपार्टमेंटल खर्च | लागू नाही | ट्रॅव्हल अँड टूर ऑपरेटर, डोमेस्टिक एअरलाईन, डायरेक्ट मार्केटिंग/जाहिरात सेवा, लॉजिंग - हॉटेल/मॉटेल/रिसॉर्ट/फ्लिपकार्ट बी२बी | केमॉलवर आणि इतर ऑनलाईन खर्चाचे केलेले सर्व व्यवहार | व्हिसा ने दिलेल्या व्याख्येनुसार 'उपाहारगृहे' आणि 'करमणूक' या व्यापारी प्रवर्ग संकेतांतर्गत वर्गीकृत व्यापारी आस्थापनांमध्ये केलेले जेवण आणि मनोरंजन | | ऑनलाईन खर्च | ऑनलाईन खर्च |
| विशेष प्रवर्गांवरील रीवॉर्ड पॉइंट्स | ८X रीवॉर्ड्स / ₹१५० | लागू नाही | ४ X रिवॉर्ड्स/₹१०० | केमॉल – 5 मोजो पॉईंट्स / ₹100 इतर ऑनलाईन – 2.5 मोजो पॉईंट्स / ₹100 किमान 2,000 रुपयांचा व्यवहार | १० डायनिंग पॉइंट ₹१०० | १० सेव्हिंग पॉइंट्स /₹१०० | ५ रीवॉर्ड पॉइंट्स / ₹१५० | २ रीवॉर्ड प्रति पॉइंट्स / ₹१०० |
| इतर सर्व प्रवर्गांवरील रीवॉर्ड पॉइंट्स | २ लाखांपर्यंत ४X रीवॉर्ड्स / ₹१५०, २ लाखांपुढे ८X रीवॉर्ड्स | ३X रीवॉर्ड्स / ₹ १०० | १ X रिवॉर्ड्स/₹१०० | 1 मोजो पाईंट / ₹100 | शून्य | १ सेव्हिंग पॉइंट / ₹ २५० | २ रीवॉर्ड पॉइंट्स / ₹१५० खर्च | १ रीवॉर्ड प्रति पॉइंट /₹१०० |
| पॉइंट्सचे विमोचन | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख रक्कम, चित्रपटांची तिकिटे, एअरमाईल्स आणि आणखी बऱ्याच प्रकारे रिडीम केले जाऊ शकतात. | रोख रक्कम, चित्रपटांची तिकिटे, एअरमाईल्स आणि आणखी बऱ्याच प्रकारे रिडीम केले जाऊ शकतात. | रोख स्वरूपात विमोचित करता येऊ शकतात किंवा सिनेतिकिटे, ट्रॅव्हल व्हाउचर्स, ऑनलाईन खरेदी आणि एअरमाइल्स या प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात | रोख, सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि आणखी अनेक प्रकारे विमोचित करता येऊ शकतात |
| रीवॉर्ड पॉइंट्स क्रेडिटमध्ये बदलण्याचा दर | ७.५ पैसे प्रति पॉइंट | ७.५ पैसे प्रति पॉइंट | २५ पैसे प्रति पॉईंट | रिडेम्पशनच्या इतर सर्व पर्यायांसाठी प्रति पॉईंट 25 पैसे दराने एसआर केल्यानंतर रोख रकमेच्या बदल्यात फक्त रु.1/मोजो पॉईंट | ₹१ / डायनिंग पॉइंट | ₹१/ सेव्हिंग पॉइंट | ०.१८७५ पैसे प्रति पॉइंट | ०.२५ पैसे प्रति पॉइंट |

| | वीर - प्लॅटिनम | वीर - सिलेक्ट |
|---|---|---|
| खास संवर्ग | जेवण, चित्रपट, डिपार्टमेंटल आणि वाणसामान | जेवण, चित्रपट, डिपार्टमेंटल आणि वाणसामान |
| विशेष संवर्गांवर रिवॉर्ड पॉईंट्स | ३ x रिवॉर्ड्स/रु.२००, म्हणजेच ६ रिवॉर्ड्स/रु.२०० (कमाल मर्यादा फक्त ४ संवर्गांवर दरमहा ७५०) | ३ x रिवॉर्ड्स/रु.२००, म्हणजेच ९ रिवॉर्ड्स/रु.२०० (कमाल मर्यादा फक्त ४ संवर्गांवर दरमहा १०००) |
| इतर सर्व संवर्गांवर रिवॉर्ड पॉईंट्स | २ रिवॉर्ड्स/रु.२०० | ३ रिवॉर्ड्स/रु.२०० |
| पॉईंट्सचे रिडेम्पशन | रोख रक्कम, चित्रपटांची तिकिटे, एअरमाईल्स आणि आणखी बऱ्याच प्रकारे रिडीम केले जाऊ शकतात. | रोख रक्कम, चित्रपटांची तिकिटे, एअरमाईल्स आणि आणखी बऱ्याच प्रकारे रिडीम केले जाऊ शकतात. |
| या दराने रिवॉर्ड पॉईंट्स क्रेडिट केले जातात. | २५ पैसे प्रति पॉईंट | २५ पैसे प्रति पॉईंट |

***६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्डच्या रिवॉर्ड्सचा उल्लेख पान क्र. ५४ वर करण्यात आलेला आहे.**

## ४. रीवॉर्ड प्रोग्रॅम्ससाठीचे सर्वसाधारण नियम व अटी

४.१. उपरोक्त यादी बँकेकडून तिच्या निर्णयाधीन कार्डधारकाला न कळवता बदलली जाऊ शकते.

४.२. जिथे इंधन अधिभार माफी दिली जाते अशी इंधन खरेदी, रेल्वे अधिभार माफी दिली जाते ते रेल्वे व्यवहार, वैयक्तिक कर्जे, रोख आगाऊ रकमा आणि सहभाग शुल्क, वार्षिक शुल्क, ॲड ऑन कार्ड शुल्क, अनेक कार्ड शुल्क, शिल्लक हस्तांतरण, आगाऊ रोख व्यवहार शुल्क, न वटलेल्या धनादेशावरील आकारणी, वित्तीय आकारणी, अपचार आकारणी, विलंबित अधिदान आकारणी, संकलन आकारणी आणि बँकेने लावलेले इतर कोणतेही शुल्क किंवा आकारणी, शिल्लक हस्तांतरणे, ईएमआय व्यवहार, रोख आहरणे, डीमांड ड्राफ्ट आणि सेवाभार व्यवहार या संबंधातील व्यवहारांवर पॉइंट्स दिले जाणार नाहीत. व्यवहारांची यादी बँकेकडून तिच्या निर्णयाधीन कार्डधारकाला कळवून बदलली जाऊ शकते. ६ई रिवॉर्ड्स एक्सएल इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड / ६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड, मासिक हप्ते वगळता सर्वांमधून वगळली जातील.

४.३. डायनिंग पॉइंट्स केवळ स्वतंत्र दुकानांमध्ये झालेल्या व्यवहारांवर दिले जातात आणि कोणत्याही हॉटेल्स / शॉपिंग मॉल्स / डीपार्टमेंटल स्टोर्स इ. शी संबंधित दुकानांना लागू होत नाहीत, आणि त्यांचे वर्गीकरण व्हिसाने दिलेल्या व्याख्येनुसार ''हॉटेल'', ''वाणसामान'', ''कपडे'', ''डीपार्टमेंटल स्टोर्स'' इ. संबंधित नेटवर्क पार्टनर्सने ठरवून दिल्यानुसार व्यापारी प्रवर्ग संकेतांमध्ये होते. डायनिंग पॉइंट्स फक्त तेव्हाच दिले जातील जेव्हा बिलिंग चक्रामध्ये किमान रु ५,००० चा किरकोळ खर्च झाला असेल. एका महिन्यातील बिलिंग चक्रामध्ये डायनिंग आणि करमणुकीसंबंधातील व्यवहार मिळून डायनिंग पॉइंट्स जास्तीत जास्त ६०० पॉइंट्सपर्यंत उपलब्ध असतील. एकाच डायनिंग किंवा चित्रपट व्यवहाराचे मूल्य रु ४,०००/- पलीकडे गेल्यास त्यावर कोणतेही डायनिंग पॉइंट्स मिळणार नाहीत. एका बिलिंग चक्राचे डायनिंग पॉइंट्स पुढील मासिक बिलिंग चक्रामध्ये क्रेडिट केले जातील.

४.४. ॲड-ऑन कार्ड्सद्वारे संचयित पॉइंट्स आपोआप ॲड-ऑन कार्ड्स निर्गमित झालेल्या प्रमुख कार्ड खात्यामध्ये संचयित होतील आणि इतर कोणत्याही कार्ड खात्यात होणार नाहीत.

४.५. कोटक इसेन्शिया क्रेडिट कार्डवर वाणसामान आणि डीपार्टमेंटल स्टोर्सवर १० सेव्हिंग पॉइंट्स दिले जातात आणि एका बिलिंग चक्रात कमाल ५०० सेव्हिंग पॉइंट्स मिळू शकतात. १० सेव्हिंग पॉइंट्स फक्त त्या व्यापारी आस्थापनांमधील व्यवहारांवर दिले जातात ज्यांचे वर्गीकरण व्हिसाच्या व्याख्येनुसार ''डीपार्टमेंटल स्टोर्स आणि वाणसामान'' संबंधित नेटवर्क पार्टनर्सने ठरवून दिल्यानुसार व्यापारी प्रवर्ग संकेतात (एमसीसी) होते. १० सेव्हिंग पॉइंट्स रु १५०० च्या किमान खरेदीवर आणि रु ४००० च्या कमाल खरेदीवर दिले जातील. इतर खर्चांवर सेव्हिंग पॉइंट्स कमावण्यासाठी कोणतीही मर्यादा नाही.

४.६. कोटक सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम क्रेडिट कार्डवर कपड्यांवरील खर्चांसाठी ५ रीवॉर्ड पॉइंट्स दिले जातात आणि एका बिलिंग चक्रात कमाल ५०० सेव्हिंग पॉइंट्स मिळू शकतात. ५ सेव्हिंग पॉइंट्स फक्त त्या व्यापारी आस्थापनांमधील व्यवहारांवर दिले जातात ज्यांचे वर्गीकरण व्हिसाच्या व्याख्येनुसार ''कपडे'' संबंधित नेटवर्क पार्टनर्सने ठरवून दिल्यानुसार व्यापारी प्रवर्ग संकेतात (एमसीसी) होते. कपडे प्रवर्गावर खर्च केलेल्या प्रत्येक ₹ १०० मागे ५ रीवॉर्ड पॉइंट्स दिले जातील जर एका बिलिंग चक्रामधील खर्च रु ७५०० च्या आत असेल तर. इतर प्रवर्गांवर रीवॉर्ड पॉइंट्स मिळवण्यावर कोणतीही मर्यादा नाही.

४.७. ठरावीक कालावधीत कार्डधारकाला जास्तीत जास्त पॉइंट्स किती मिळू शकतात त्याचा आकडा नमूद करण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे. बँकेने नमूद केलेल्या कमाल पॉइंट्सची संख्या पार झाल्यानंतर कार्डधारक त्या कालावधीसाठी आणखी पॉइंट्स संचयित करू शकणार नाही.

४.८. विमोचनाच्या वेळी सर्व संलग्न खाती आणि कार्ड सुस्थितीत असायला हवे (म्हणजेच अपचारी खाती असू नयेत) आणि बँकेद्वारे किंवा कार्डधारकाद्वारे रद्द किंवा नष्ट केली जाऊ नयेत आणि विमोचनाच्या वेळी कार्ड फसवणुकीच्या/हरवल्याच्या/चोरी झाल्याच्या/नेमून दिलेल्या क्रेडिट मर्यादेपलीकडे कार्डचा वापर झाल्याच्या कारणामुळे तात्पुरते अवरोधित केलेले असू नये. कार्ड खाते नियमित झाल्यानंतर, बँकेच्या निर्णयाधीन, पॉइंट्स विमोचनासाठी पात्र होऊ शकतात.

४.९. पॉइंट्स केवल प्राथमिक कार्डधारकच विमोचित करू शकतो.

४.१०. कार्डधारकाने रीवॉर्ड पॉइंट्सच्या स्वयंविमोचनाचा पर्याय स्वीकारला असेल, तर कार्ड खाते विवरणामध्ये दर तिमाहीच्या सुरुवातीला आपोआप क्रेडिट होईल. बँक तिला योग्य वाटेल तसे आणि तेव्हा रीवॉर्ड पॉइंट्स स्वयंविमोचित करण्याचा आणि कार्डधारकाच्या खात्यामध्ये क्रेडिटदेण्याचा हक्क राखून ठेवते.

४.११. कोटक वेल्थ मॅनेजमेंट कार्ड, कोटक रोयाल सिग्नेचर, कोटक झेन सिग्नेचर, कोटक एनआरआय रॉयल सिग्नेचर, कोटक प्रीव्ही लीग सिग्नेचर, कोटक लीग प्लॅटिनम, सिल्क इन्स्पायर प्लॅटिनम आणि फीस्ट कार्ड यांमध्ये प्राथमिक कार्डधारकाला स्वयंविमोचन सक्रीय करण्यासाठी ग्राहक सेवेस कॉल करावा लागेल. रीवॉर्ड पॉइंट्स सिनेतिकिटे, एअरमाइल्स आणि इतर अनेक पर्यायांसमोर विमोचित केले जाऊ शकतात, कृपया अधिक माहितीसाठी कोटक बँक वेबसाइटच्या नेट बँकिंग विभागास भेट द्या. हे विमोचन मिळवण्यासाठी, कार्डधारकाला रीवॉर्ड पॉइंट्सचे

स्वयंविमोचन निष्क्रीय करावे लागेल व त्यासाठी बँकेच्या ग्राहक संपर्क केंद्राला कॉल करावा लागेल. रीवॉर्ड पॉइंट्सचे ु.ज्ञींरज़.लेवेबसाइटवर अद्ययावत केलेल्या तपशिलांप्रमाणे विविध प्रवर्गांमध्ये रूपांतरण केले जाईल.

४.१२. विमोचनासाठी देऊ करण्यात येणाऱ्या सेवांची/उत्पादनांची निवड बँकेच्या एकल निर्णयाधीन असेल आणि सूचनेशिवाय बदलण्याच्या अधीन असेल.

४.१३. रीवॉर्ड पॉइंट्सच्या रूपांतरणाचा दर सूचनेशिवाय बदलण्याच्या अधीन असेल.

४.१४. सिनेतिकिटांसमोर आणि ईझी रीवॉर्ड्र्ससमोर विमोचित केलेल्या रीवॉर्ड पॉइंट्स / सेव्हिंग पॉइंट्स / डायनिंग पॉइंट्स साठी, बँक कार्डधारकाच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर एक व्हाउचर कोड पाठवेल. ही व्हाउचर्स ती ज्या त्रयस्थ विक्रेत्यांनी निर्गमित केली असतील त्यांनी नेमलेल्या नियम व अटींच्या अधीन असतील.

४.१५. व्हाउचर्सशी संबंधित कोणतेही वाद कार्डधारकाने थेट त्रयस्थ विक्रेत्यांकडे न्यावेत.

४.१६. कार्डधारकांनी एकदा बँकेला विमोचनाची ऑर्डर दिली की ती रद्द करता अथवा मागे घेता येणार नाही किंवा बदलता येणार नाही.

४.१७. विमोचन झाल्यावर रीवॉर्ड / डायनिंग / सेव्हिंग पॉइंट्स आपोआप कार्डधारकाच्या खात्यामधील संचयित पॉइंट्समधून वजा केले जातील.

४.१८. बँकेकडे ज्या क्रमाने विनंत्या येतील आणि स्वीकारल्या जातील त्या क्रमाने त्यांची पूर्तता होईल.

४.१९. जर कार्डधारकाकडे एखाद्या ऑर्डरसाठी पुरेसे पॉइंट्स नसतील, तर ती विनंती रद्द समजली जाईल.

४.२०. भारत सरकारला किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाला किंवा संस्थेला किंवा इतर कोणत्याही सहभागी व्यापारी आस्थापनाला देय असणारा कोणताही कर किंवा इतर दायित्वे अथवा आकारण्या, ज्या उपरोक्त नुसार किंवा इतर प्रकारे या प्रोग्रॅमच्या परिणामत: विमोचनाद्वारे उद्भवतील किंवा संचयित होतील, त्यासाठी कार्डधारक स्वत: जबाबदार असेल.

४.२१. कार्डधारकाने स्वेच्छेने कार्ड बंद केल्यास, कार्ड खात्यामध्ये असलेले रीवॉर्ड पॉइंट्स / डायनिंग / सेव्हिंग पॉइंट्स रद्द केले जातील.

४.२२. जमा झालेल्या रीवॉर्ड पॉइंट्स / डायनिंग / सेव्हिंग पॉइंट्सना रोख मूल्य नाही आणि त्यांचा रोख रकमेच्या बदल्यात विनिमय होऊ शकत नाही.

४.२३. कार्डधारक कोणतेही रीवॉर्ड पॉइंट्स / डायनिंग / सेव्हिंग पॉइंट्स दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित करू शकत नाही किंवा त्याच्या इतर कार्डांवरील रीवॉर्ड पॉइंट्स जोडून घेऊ शकत नाही.

४.२४. रीवॉर्ड पॉइंट्स / डायनिंग / सेव्हिंग पॉइंट्स कमावल्या दिनांकापासून २ वर्षांच्या आत जर विमोचित केले नाहीत तर कालबाह्य होतील. बँक रीवॉर्ड पॉइंट कालबाह्य होत असल्यास ग्राहकाला कोणतीही पूर्वसूचना पाठवणार नाही.

४.२५. बँक कोणत्याही वेळी, पूर्वसूचनेशिवाय, या सर्व किंवा कोणत्याही नियम व अटींमध्ये भर घालण्याचा, बदल करण्याचा किंवा सुधारणा करण्याचा किंवा हा प्रोग्रॅम पूर्णपणे काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

४.२६. कार्डधारक हे मान्य करतो आणि स्वीकारतो की हा प्रोग्रॅम पूर्णपणे ऐच्छिक आहे आणि हे समजण्यात येते की यातील सर्व आकारण्या कार्डधारकाद्वारे कार्ड वापराच्या सर्वसाधारण वेळात स्वेच्छेने उद्भवलेले आहेत.

४.२७. हे नियम व अटी क्रेडिटकार्ड्सच्या वापरावर लागू होणाऱ्या कार्डधारक कराराला जोडून असतील व त्याला पर्याय म्हणून / त्याला निष्प्रभ करणाऱ्या नसतील.

४.२८. इथे उल्लेखित कोणतीही बाब बँकेसाठी किंवा कोणत्याही सहभागी व्यापारी आस्थापनेसाठी बंधनकारक दायित्व मानली जाणार नाही किंवा ती हा प्रोग्रॅम सुरु ठेवण्यासाठीची किंवा यापुढे अशासारख्याच किंवा इतर योजना राबवण्यासाठीची बँकेची कटिबद्धता अथवा सादरीकरण ठरणार नाही.

४.२९. या प्रोग्रॅमसंबंधात कोणताही वाद उद्भवल्यास तो बँकेविरोधात दावा ठरणार नाही.

४.३०. बँकेने केलेली पॉइंट्सची गणना अंतिम असेल, निर्णायक असेल आणि कार्डधारकांवर बंधनकारक असेल आणि ती वादास किंवा आव्हानास प्रवण नसेल.

४.३१. या रीवॉर्ड्स प्रोग्रॅममधील कोणत्याही बाबीचा अर्थ बँकेने या नियम व अटींअंतर्गत तिचे कोणतेही अधिकार सोडून दिले आहेत असा होणार नाही (यामध्ये व्याज शुल्क आकारणे समाविष्ट).

## ५. कोटक प्रीव्ही लीग सिग्नेचर कार्ड अंतर्गत पीव्हीआर तिकिटाचे विमोचन

५.१. कार्डधारकाला त्याच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर आणि ईमेल आयडीवर तिमाहीसाठीच्या सुमारे ४ विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटांची एसएमएस आणि ईमेलर मार्फत माहिती आपोआप पाठवली जाईल.

५.२. कार्डधारकाने विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटा(टां)च्या कूपन कोड्सचा दावा पुढील १५ दिवसांत करावा, यासाठी त्याने त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून एसएमएस पाठवावा. जर एसएमएस १५ दिवसांनंतर आला तर कार्डधारक कूपन कोड्स मिळवण्यास पात्र नसेल.

५.३. एकदा कार्डधारकाने कूपन कोड्सचा दावा केला की मोफत पीव्हीआर सिनेतिकिटा(टां)साठीचे कूपन कोड्स त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर व त्याचप्रमाणे त्याच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठवले जातील. कार्डसाठी अर्ज करून आणि प्रीव्ही लीग सिग्नेचर क्रेडिट कार्ड प्रोग्रॅमला सहमती देऊन कार्डधारकाने त्याच्या पात्रतेबाबतची माहिती आणि कूपन कोड त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस मार्फत मिळवण्याची संमती दिली असल्याचे मानले जाईल. कार्डधारकाला वरील माहिती / एसएमएस त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर मिळालेली नको असेल, तर विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटे न मिळाल्याने कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी बँक जबाबदार किंवा देय ठरवली जाणार नाही.

५.४. कार्डधारकाने याची खातरजमा करावी की त्याने प्रोग्रॅम अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी त्याचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी बँकेकडे नोंदवलेला आहे.

५.५. कूपन कोड्स ु.ििलळपशारी.लो या पीव्हीआर वेबसाईटवर ऑनलाईन वापरले जाऊ शकतात. कूपन कोड ऑनलाईन वापरण्याचे तपशीलवार नियम खाली खंड ८ मध्ये नमूद पीव्हीआर कोटक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम अंतर्गत पीव्हीआर तिकीट विमोचन मध्ये नमूद केलेले आहेत.

५.६. ✻४ पीव्हीआर तिकिटांच्या बदल्यात ६४०० रीवॉर्ड पॉइंट्स क्रेडिट होणे हा प्रीव्ही लीग सिग्नेचर पेड प्रकारच्या क्रेडिट कार्डच्या वैशिष्ट्यामधील एक अंतरिम बदल आहे. हा बदल १ एप्रिल २०२० पासून अंमलात आला आहे. जे ग्राहक पात्रता निकषानुसार ४ पीव्हीआर सिनेतिकिटांसाठी पात्र आहेत त्यांना बँक रु १६०० किंमतीचे ६४०० रीवॉर्ड पॉइंट्स पात्रता तिमाही संपल्यानंतरच्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात क्रेडिट करून देईल. उदा. जर तुमची पात्रता तिमाही मे २०२० पासून ऑगस्ट २०२० असेल, तर ३० सप्टेंबर २०२० पर्यंत संबंधित पात्र क्रेडिट कार्ड खात्यामध्ये ६४०० रीवॉर्ड पॉइंट्स क्रेडिट केले जातील.

**६. वॉलेट असिस्ट प्लॅन**

''विमेकार'' म्हणजे त्रयस्थ पक्ष विमा पुरवठादार असा अर्थ होईल ज्यांच्याशी वनअसिस्ट वेळोवेळी ॲड ऑन लाभांसाठी भागीदारी साधेल जे वॉलेट असिस्ट प्लॅनला लागू होऊ शकतील.

''सेवा भागीदार'' म्हणजे वनअसिस्टसोबत संलग्न असलेला कोणताही त्रयस्थ सेवा पुरवठादार.

६.१. वॉलेट असिस्ट प्लॅन केवळ प्रीव्ही लीग सिग्नेचर क्रेडिट कार्डच्या भरणा पूर्ण झालेल्या प्रकारावर उपलब्ध आहे. कार्डधारकाचे पाकीट हरवले किंवा चोरीला गेले, तर कार्डधारक आता त्याची सर्व कार्ड्स अवरोधित करू शकतो आणि ८९३-१९२४६३ या जगभरात व्याप्ती असलेल्या व २४ तास उपलब्ध क्रमांकावर कॉल करून आपात्कालीन साहाय्य मिळवू शकतो.

६.२. वॉलेट असिस्ट प्लॅन हे कार्डधारकाला वनअसिस्ट कन्झ्युमर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (''वन असिस्ट'') यांच्याकडून पुरवण्यात येणारे वैशिष्ट्य आहे आणि वन असिस्ट द्वारे पुरवण्यात येणाऱ्या सेवेच्या कोणत्याही कमतरतेसाठी किंवा अपूर्ततेसाठी किंवा कार्डधारकाला कोणत्याही स्वरूपाचे नुकसान झाल्यास त्यासाठी कोणत्याही प्रकारे कशाही बाबतीत बँक जबाबदार किंवा देय असणार नाही. वॉलेट असिस्ट प्लॅनच्या तपशीलवार नियम व अटींसाठी भेट द्या ु.पशरीळीं.ळप.

६.३. प्लॅनची वैशिष्ट्ये :

**क) कार्ड्स अवरोधित करण्यासाठी एक कॉल**

कार्डधारकाने वनअसिस्टला त्याच्या सर्व कार्ड्सचे तपशील पुरवावेत आणि वेळीच अद्ययावत करून द्यावेत. त्याचे पाकीट चोरी झाल्यास किंवा हरवल्यास, कार्डधारकाने तत्काळ वनअसिस्टला कॉल करून पाकीट गमावल्याचे कळवावे. कोणतेही कार्ड अवरोधित करण्याची विनंती करण्यासाठी, कार्डधारकाने कार्ड अवरोधित करण्याची विनंती करण्यापूर्वी ते वनअसिस्टकडे नोंदवलेले असणे आवश्यक आहे.

जर कार्डधारकाने एका विशिष्ट कार्डचे वनअसिस्टकडे तपशील दिलेले नसतील आणि ते कार्ड अवरोधित करण्याची विनंती त्याने केली, तर वनअसिस्ट ते कार्ड कार्डधारकाने दिलेल्या इतर तपशिलांच्या आधारे सर्वोत्तम प्रयत्न करून अवरोधित करण्याचा प्रयत्न करेल.

कार्डधारकाने कार्ड्स वापरताना बँकेच्या सूचनांचे पालन करावे आणि बँकेच्या सर्व नियम व अटींची पूर्तता करावी. बँकेने वनअसिस्टला कार्डधारकाने बँकेच्या नियमांच्या अनुपालनाचा भंग केल्याचे कळवल्यास वनअसिस्ट कोणत्याही दाव्याच्या भरण्याचे सुलभीकरण करणार नाही.

**ख) फसवणूक संरक्षण**

कार्डधारक कार्ड (कार्ड्स) गमावल्यावर किंवा त्यांचा फसवा वापर झाल्यावर तत्काळ त्याबद्दल वनअसिस्टला कॉल करून कळवेल. कार्डधारक चांगल्या उद्देशाने कृती करण्याचे वचन देतो आणि कोणत्याही त्रयस्थ पक्षासोबत कारस्थान रचून या प्लॅनपासून फसव्या रीतीने लाभ मिळवण्याचा प्रयत्न करणार नाही.

तक्रारपूर्व सुरक्षा तक्रार करण्यापूर्वी ७ दिवसांपुरते हरवलेल्या कार्ड्सवर फसव्या व्यवहारांसाठी पुरवली जाते. फसवणुकीसाठीची तक्रारपूर्व सुरक्षा ग्राहकाने कार्ड गमावल्याचे / फसवणूक झाल्याचे कळल्यावर २४ तासांच्या आत वनअसिस्टला कॉल करून कळवायला हवे.

वनअसिस्ट सुरक्षेची निश्चिती करण्यासाठी कॉलची प्रत्यक्ष वेळ वनअसिस्टकडे उपलब्ध असलेल्या कॉलच्या नोंदींच्या आधारे निर्धारित करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

तक्रारपूर्व दाव्याचा भरणा आणि हरवलेल्या पाकिटासाठीची परतफेड कार्डधारकाच्या नावाने व्हावी यासाठी विमेकार पूर्णत: जबाबदार आहे, मग जरी प्रशासकीय सोयीसाठी वनअसिस्टला धनादेश पाठवण्यात आला तरी. वनअसिस्टची जबाबदारी कार्डधारकाला दाव्याच्या नोंदणीत आणि पाठपुराव्यात साहाय्य करण्यापुरती मर्यादित असेल.

फसवणूक झाल्यानंतर तक्रार करण्यासाठीचे अपवाद आहेत :

क. बँकेने कार्डधारकाला दिलेल्या पिन / पासवर्डचा वापर करून स्वीकृती मिळवलेले कार्ड व्यवहार.

ख. इंटरनेट आधारित व्यवहार

ग. खोट्या कार्डचा वापर

घ. कार्डधारकाच्या घरातील निवासी व्यक्तीने किंवा कार्डधारकाने विश्वासाने ज्या व्यक्तीकडे कार्ड सोपवले आहे अशा व्यक्तीने केलेले कार्ड व्यवहार.

**ग) आपात्कालीन प्रवास साहाय्य**

कार्डधारकाने मिळवावयाच्या दाव्याचे किंवा मागितलेल्या लाभाचे विश्लेषण करण्यासाठी ज्या चौकश्या करणे वनअसिस्टच्या एकल निर्णयाधीन आवश्यक मानले जाईल त्या तशा वनअसिस्टने करणे यास कार्डधारकाची संमती असल्याच्या अधीन कार्डधारकाला आपात्कालीन प्रवास साहाय्य उपलब्ध करून दिले जाईल.

कार्ड हरवल्याच्या वेळी जर कार्डधारक भारतात किंवा भारताबाहेर असेल, तर वनअसिस्ट आपल्या निर्णयाधीन राहून त्याच्या सेवा भागीदारांमार्फत कार्डधारकाच्या हॉटेलला कार्डधारकाचे हॉटेल बिल चुकते करण्यासाठी पैसे पोहोचवेल.

वनअसिस्ट त्याच्या सेवा भागीदारांमार्फत, आपल्या एकल निर्णयाधीन भारतात कार्डधारकाच्या वतीने तिकीट काढण्याची व्यवस्था करण्यासाठी पैसे भरायची सोय करेल (जर कार्डधारक भारताबाहेर / भारतात असेल तर) ज्यायोगे कार्डधारकाच्या घराजवळच्या स्थळापर्यंतच्या प्रवासाची पर्यायी प्रवास व्यवस्था करता येईल. ही सुविधा कार्डधारकाची प्रवासाची तिकीटे कार्ड्स गमावतेवेळी हरवली असल्यास किंवा चोरी झालेली असल्यास पुरवली जाईल.

कार्डधारकाला किंवा कार्डधारकाच्या वतीने दिलेली कोणतीही आगाऊ रक्कम, यामध्ये आपात्कालीन तिकीट भरणा आणि आपात्कालीन हॉटेल बिल भरणा समाविष्ट, व्याजमुक्त असेल आणि या रकमेची दिल्या दिनाकांपासून अठ्ठावीस (२८) दिवसांच्या आत परतफेड करावी लागेल. जर या आगाऊ रकमेची नमूद वेळेमध्ये परतफेड / परतावा झाला नाही, तर आगाऊ रक्कम वसुल करण्याकरिता वनअसिस्ट स्वत:च्या एकल निर्णयाधीन आवश्यक ती कारवाई करण्यास स्वतंत्र असेल, जिचा खर्च कार्डधारकाला उचलावा लागेल आणि ते कार्डधारकाने वनअसिस्टला देणे असलेले कर्ज मानण्यात येईल.

कार्डधारकाने आगाऊ रक्कम मिळतेवेळी तिची प्राप्ती झाल्याचे मान्य करणाऱ्या कागदपत्रांवर सही करावी, ज्यामध्ये वनअसिस्टकडून किंवा तिच्या सेवा भागीदारांकडून मिळालेल्या आपात्कालीन रोख साहाय्याचाही समावेश आहे.

**घ) डॉक्युसेफ**

डॉक्युसेफ हा महत्त्वाचे कागदपत्र सुरक्षितपणे, संरक्षितपणे जतन करून ठेवण्यासाठी आणि केव्हाही मिळवता येण्यासाठी एक मोफत ऑनलाईन लॉकर आहे. कार्डधारक कोणतीही बेकायदेशीर, कॉपीराइट भंग करणारी माहिती किंवा कार्डधारकाच्या मालकीचे नसलेले किंवा जे बाळगणे कोणत्याही लागू कायद्याच्या विरोधात आहे असे कोणतेही कागदपत्र जतन करणार नाही.

डॉक्युसेफ सुविधेचा पासवर्ड आणि इतर गोपनीयता सेटिंग्ज कार्डधारक जतन करेल आणि सुरक्षित ठेवेल.

कार्डधारकाचे सदस्यत्व बंद झाल्यावर, कार्डधारकाची डॉक्युसेफमधील माहिती डॉक्युसेफमधून स्थलांतरित अथवा नष्ट करता यावी यासाठी कार्डधारकाला ३० दिवसांची पूर्वसूचना देऊन नंतर नष्ट केली जाईल. एकदा सदस्यत्व संपले, की डॉक्युसेफमधील माहिती हटवली जाईल.

वन असिस्ट आपल्या सर्वोच्च क्षमतेनुसार, डॉक्युसेफमध्ये कार्डधारकाने जतन केलेल्या माहितीच्या गोपनीयतेची खातरजमा करेल आणि लागू कायद्यानुसार आवश्यक त्या वाजवी सुरक्षा पद्धती आणि प्रक्रिया पाळेल.

वन असिस्ट गोपनीयता धोरणानुसार (जे वेळोवेळी सुधारत राहील) कृती करेल जे पाहण्यासाठी / डाऊनलोड करण्यासाठी वन असिस्टच्या www.oneassist.in वेबसाईटवर उपलब्ध आहे. अशा गोपनीयता धोरणाचे नियम इथे संदर्भ देऊन जोडले गेल्याचे मानण्यात येईल.

डॉक्युसेफ सुविधा सर्वकाळ प्राप्तीसाठी उपलब्ध असेल याची खातरजमा करण्यासाठी वन असिस्ट वाजवी प्रयत्न करेल.

**घ. पीव्हीआर कोटक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम**

**व्याख्या :** पीव्हीआर कोटक रीवॉर्ड्स प्रोग्रॅममध्ये, पुढील संज्ञांचे, अनुषंगामध्ये वेगळा उल्लेख असल्याखेरीज पुढील अर्थ असतील :

(क) ''पीव्हीआर कोटक क्रेडिट कार्ड'' म्हणजे कोटक महिंद्रा बँक लि. आणि प्रिया व्हिलेज रोडशो लि. यांदरम्यान निर्गमित केलेले सहब्रँडेड कार्ड होय.

(ख) ''पीव्हीआर कोटक प्रोग्रॅम'' म्हणजे पीव्हीआर कोटक क्रेडिटकार्ड्स रीवॉर्ड्स प्रोग्रॅम;

(ग) ''अपचारी खाते'' म्हणजे कार्डधारकाचे असे खाते जे देय दिनांकापलीकडे थकित आहे किंवा ज्याचे क्रेडिट स्टँडिंग बँकेच्या मते असमाधानी आहे.

(घ) ''वैध आकारणी'' म्हणजे अशी आकारणी जी कार्ड बाळगणाऱ्या कार्डधारकाद्वारे उद्भवली आणि त्याला आकारण्यात आली आणि केवळ अशी वैध आकारणीच कॅश पॉइंट्स पुरवण्यासाठी हिशेबात गणली जाईल.

**७. पीव्हीआर कोटक प्रोग्रॅम**

७.१. पीव्हीआर कोटक प्रोग्रॅम केवळ पीव्हीआर कोटक गोल्ड अँड प्लॅटिनम क्रेडिट कार्ड ग्राहकांनाच लागू होतो. पीव्हीआर कोटक प्रोग्रॅम हा एक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम आहे जो कार्डधारकाला त्याच्या / तिच्या पीव्हीआर कोटक कार्डवर वस्तू आणि सेवांची देशांतर्गत / आंतरराष्ट्रीय खरेदी करताना उद्भवलेल्या वैध आकारण्यांवर आणि या प्रोग्रॅमच्या हेतुकरिता वेळोवेळी बँकेद्वारे समाविष्ट करण्यात येऊ शकणाऱ्या इतर कोणत्याही आकारण्यांवर बक्षिस म्हणून पीव्हीआर तिकिटे कमवण्यास सक्षम करतो.

७.२. बँक कोणत्याही वेळी, पूर्वसूचनेशिवाय, या सर्व किंवा यांपैकी कोणत्याही नियम व अटींमध्ये जोडणी, बदल किंवा सुधारणा करण्याचा किंवा हा प्रोग्रॅम पूर्णपणे काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

**८. पीव्हीआर कोटक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम अंतर्गत पीव्हीआर तिकीट संचय**

८.१. कार्डसोबत पुरवलेल्या स्वागत पुस्तिकेमध्ये वर्णन केलेल्या चौकटीनुसार बँक पीव्हीआर तिकिटे देईल. वेल्कम किटमधील चौकटीमध्ये तिकिटांची संख्या असेल जी देशांतर्गत / आंतरराष्ट्रीय वस्तूंची / सेवांची खरेदी करून पूर्वनिर्दिष्ट रक्कम खर्च करून कमावता येईल. बँक तिच्या एकल निर्णयाधीन एका विशिष्ट कालावधीसाठी किंवा विशिष्ट परिस्थितींसाठी / प्रचारात्मक योजनांसाठी इतर कोणत्याही व्यवहारांवर लाभ देऊ शकते.

८.२. वैयक्तिक कर्जे, रोख आगाऊ रकमा आणि सहभाग शुल्क, वार्षिक शुल्क, अॅड ऑन कार्ड शुल्क, अनेक कार्ड शुल्क, शिल्लक हस्तांतरण, आगाऊ रोख व्यवहार शुल्क, न वटलेल्या धनादेशावरील आकारणी, वित्तीय आकारणी, अपचार आकारणी, विलंबित अधिदान आकारणी, संकलन आकारणी आणि बँकेने लावलेले इतर कोणतेही शुल्क किंवा आकारणी, शिल्लक हस्तांतरणे, ईएमआय व्यवहार, रोख आहरणे, डीमांड ड्राफ्ट आणि सेवाभार व्यवहार

या संबंधातील व्यवहारांवर कार्डधारकांना तिकिटे दिली जाणार नाहीत. रद्द झालेल्या व्यवहारांसाठीही तिकिटे दिली जाणार नाहीत. जर कार्डधारकाला दिली गेलेली तिकिटे आधीच वापरून झाली असतील आणि त्यानंतर ज्या व्यवहाराच्या आधारावर तिकिटे दिली गेली तो व्यवहार रद्द झाला, तर कार्डधारक बँकेला तिकिटाची रु २५० एवढी रक्कम देणे असेल जे तुमच्या क्रेडिट कार्ड खात्यातून डेबिट केले जातील. कूपन पात्रतेसाठी एका बिलिंग चक्रामधील केवळ पूर्ण व्यवहारच गणले जातील.

८.३. उपरोक्त व्यवहारांची यादी बँकेकडून तिच्या निर्णयाधीन कार्डधारकाला कळवून बदलली जाऊ शकते.

८.४. अॅड-ऑन कार्ड्सद्वारे संचयित खर्च आपोआप अॅड- ऑन कार्ड्स निर्गमित झालेल्या प्रमुख कार्ड खात्यामध्ये संचयित होतील आणि इतर कोणत्याही कार्ड खात्यात होणार नाहीत.

८.५. ठरावीक कालावधीत कार्डधारकाला जास्तीत जास्त पीव्हीआर तिकिटे किती मिळू शकतात त्याचा आकडा नमूद करण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे. बँकेने नमूद केलेल्या कमाल पीव्हीआर तिकिटांची संख्या पार झाल्यानंतर कार्डधारक त्या कालावधीसाठी आणखी पीव्हीआर तिकिटे संचयित करू शकणार नाही.

८.६. विमोचनाच्या वेळी सर्व संलग्न खाती आणि पीव्हीआर कोटक क्रेडिट कार्ड सुस्थितीत असायला हवे (म्हणजेच अपचारी खाती असू नयेत) आणि बँकेद्वारे किंवा कार्डधारकाद्वारे रद्द किंवा नष्ट केली जाऊ नयेत आणि विमोचनाच्या वेळी कार्ड फसवणुकीच्या/हरवल्याच्या/चोरी झाल्याच्या/नेमून दिलेल्या क्रेडिट मर्यादेपलीकडे कार्डचा वापर झाल्याच्या कारणामुळे तात्पुरते अवरोधित केलेले असू नये. कार्ड खाते नियमित झाल्यानंतर, बँकेच्या निर्णयाधीन, पीव्हीआर तिकिटे विमोचनासाठी निर्गमित होऊ शकतात.

**९. पीव्हीआर कोटक रीवॉर्ड्स प्रोग्रॅम अंतर्गत पीव्हीआर तिकीट विमोचन**

९.१ कार्डधारकाने पात्र रकमेसाठी कार्ड स्वाइप केल्यावर फक्त विवरण निर्मिती झाली, की मगच कार्डधारकाला त्याच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर आणि ईमेल आयडीवर त्याच्या विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटा(टां)च्या पात्रतेबाबत एसएमएस आणि ईमेलर मार्फत माहिती आपोआप पाठवली जाईल.

९.२. कार्डधारकाने एका बिलिंग चक्रामधील विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटा(टां)च्या कूपन कोड्सचा दावा पुढील दोन बिलिंग चक्रांदरम्यान करावा, यासाठी त्याने त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून एसएमएस पाठवावा किंवा ृ.ज्ञेंरज्ञ.ले वर नेट बँकिंगला भेट द्यावी.

९.३. एकदा कार्डधारकाने कूपन कोड्सचा दावा केला, की मोफत पीव्हीआर सिनेतिकिटा(टां)साठीचे कूपन कोड्स त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर व त्याचप्रमाणे त्याच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठवले जातील. कार्डसाठी अर्ज करून आणि पीव्हीआर कोटक प्रोग्रॅमला सहमती देऊन कार्डधारकाने त्याच्या पात्रतेबाबतची माहिती आणि कूपन कोड त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस मार्फत मिळवण्याची संमती दिली असल्याचे मानले जाईल. कार्डधारकाला वरील माहिती / एसएमएस त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर मिळालेली नको असेल, तर विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकिटे न मिळाल्याने कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी बँक जबाबदार किंवा देय ठरवली जाणार नाही.

९.४. कार्डधारकाने याची खातरजमा करावी की त्याने प्रोग्रॅम अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी त्याचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी बँकेकडे नोंदवलेला आहे.

९.५. कूपन कोड विमोचनासाठी पीव्हीआर वेबसाईट्.ििलळपशारी.लो वर ऑनलाईन वापरला जाऊ शकतो.

९.६. जर कूपन कोड विनामूल्य पीव्हीआर सिनेतिकीट(टे) आरक्षित करण्यासाठी ऑनलाईन वापरण्यात आला, तर प्रति तिकीट सुविधा शुल्क लागू असेल त्यानुसार भरण्यास कार्डधारक देय असेल आणि केवळ सुविधा शुल्कांव्यतिरिक्त असणारी तिकिटा(टां)ची किंमत मोफत दिली जाईल.

९.७. जर पीव्हीआर वेबसाईटवर व्यवहार पूर्ण झाला नाही आणि तिकीट आरक्षित झाले नाही तर कार्डधारकाने तिकिटे आरक्षित करण्याकरिता कूपन कोड पुन्हा वापरण्यापूर्वी १ तास वाट पाहणे आवश्यक आहे.

९.८. कार्डधारकाला पाठवण्यात आलेला कूपन कोड २ महिने वैध असेल, ज्यानंतर तो अवैध ठरेल.

९.९. या प्रोग्रॅम अंतर्गत दिला जाणारा कूपन कोड गोल्डक्लास, आयमॅक्स आणि युरोपा क्लास तिकिटांसाठी विमोचित केला जाऊ शकत नाही.

९.१०. हे नियम व अटी क्रेडिटकार्ड्सच्या वापरावर लागू होणाऱ्या कार्डधारक कराराला जोडून असतील व त्याला पर्याय म्हणून / त्याला निष्प्रभ करणाऱ्या नसतील.

९.११. इथे उल्लेखित कोणतीही बाब बँकेसाठी किंवा कोणत्याही सहभागी व्यापारी आस्थापनेसाठी बंधनकारक दायित्व मानली जाणार नाही किंवा ती हा पीव्हीआर कोटक प्रोग्रॅम सुरु ठेवण्यासाठीची किंवा यापुढे अशासारख्याच किंवा इतर योजना राबवण्यासाठीची बँकेची कटिबद्धता अथवा सादरीकरण ठरणार नाही.

९.१२. या पीव्हीआर कोटक प्रोग्रॅमसंबंधात कोणताही वाद उद्भवल्यास तो बँकेविरोधात दावा ठरणार नाही.

९.१३. या पीव्हीआर कोटक प्रोग्रॅममधील कोणत्याही बाबीचा अर्थ बँकेने या नियम व अटींअंतर्गत तिचे कोणतेही अधिकार सोडून दिले आहेत असा होणार नाही (यामध्ये व्याज शुल्क आकारणे समाविष्ट).

**ङ. कोटक व्हाइट पास व्हॅल्यू प्रोग्रॅम**

**१०. व्हाइट क्रेडिट कार्डसाठी माइलस्टोन ग्रिड**

१०.१ व्हाइट क्रेडिट कार्डसाठी व्हाइट पास विमोचन प्रक्रिया.

व्हाइट क्रेडिट कार्डसाठी माइलस्टोन ग्रिड

| **खर्च स्तर** | **व्हाऊचर मूल्य (य)** | **संचयी मूल्य (य)** |
|---|---|---|
| २ लाख | २००० | २००० |
| ४ लाख | ४००० | ६००० |
| ६ लाख | ६००० | १२००० |
| ९ लाख | ७००० | १९००० |
| १२ लाख | ८००० | २७००० |
| एकूण | २७००० | |

**१०.२. विमोचन प्रक्रिया :**

- तुम्ही य २ लाखांचा किमान खर्च स्तर गाठलात की तुमचे व्हाइटपास मूल्य खुले होते.
- तुम्हाला क्रेडिट केलेल्या मूल्याएवढ्या व्हाऊचर्सचा दावा करण्यासाठी एसएमएस आणि ईमेल लिंक मिळेल.
- तुम्हाला लिंकवर क्लिक करावे लागेल आणि ती URL www.kotakbankwhite.com वर निर्देशित होईल.
- तुम्हाला अधिस्वीकृती परिमाणे म्हणजेच कार्ड क्रमांकाचे शेवटचे ४ अंक आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांक प्रविष्ट करण्याची विनंती केली जाईल.
- जर सर्व तपशील योग्य असतील आणि तुम्ही व्हाऊचर्ससाठी पात्र असाल, तर तुम्हाला ओटीपी पाठवला जाईल.
- तुम्ही योग्य ओटीपी प्रविष्ट कराल आणि वैधता प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण कराल.
- तुम्हाला आता साइटवर उपलब्ध विविध ब्रँड पर्याय आणि नावे पाहायची संमती असेल.
- तुम्हाला इच्छित असणारे ब्रँड निवडावे लागतील, आवश्यक ते व्हाऊचरचे नाव निवडावे लागेल आणि विनंतीची पुष्टी करावी लागेल.
- ग्राहकाला सफलता स्क्रीन दाखवली जाते जिच्यावर व्हाऊचर कोड, वैधता, आणि इतर तपशील व नियम आणि अटी दिसतात. तसेच, हेच तपशील ग्राहकाला एसएमएस आणि ईमेल मार्फत पाठवले जातात.

**१०.३. व्हाइट पास मूल्य विमोचित करताना लक्षात ठेवावयाची महत्त्वाची गोष्ट :** दाव्याचा कालावधी बोर्डिंगचा महिना वगळून वर्धापन महिन्याची अखेर + आणखी ३ महिन्याअखेरीपर्यंत एवढा असेल. उदा. १ : जर तुमचे कार्ड २१ मे २०१९ रोजी बोर्ड झाले, तर व्हाऊचर्सचा

दावा त्यांच्या पात्रतेनुसार २१ मे पासून ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत करता येऊ शकतो. उदा. २ : जर तुमचे कार्ड १ जून २०१९ रोजी बोर्ड झाले, तर व्हाऊचर्सचा दावा त्यांच्या पात्रतेनुसार १ जून २०१९ पासून ३० सप्टेंबर २०२० पर्यंत करता येऊ शकतो. एका वर्षात कमाल य २७,०००/- संचयित होऊ शकतात. दरवर्षी वर्धापन दिनांका रोजी वॉलेटची किंमत पुन्हा शून्यावर येईल.

## ११ इंडिगो कोटक क्रेडिट कार्डसाठी रिवॉर्ड्स प्रोग्रॅम (६ई रिवॉर्ड्स प्रोग्रॅम)

### ११.१. ६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्डमधून केलेल्या खर्चाच्या आधारे रिवॉर्ड्स

| | ६ई रिवॉर्ड्स इंडिगो कोटक क्रेडिट कार्ड | ६ई रिवॉर्ड्स एक्सएल कोटक क्रेडिट कार्ड |
|---|---|---|
| ६ई रिवॉर्ड्स इंडिगोच्या माध्यमातून खर्च | ३% | ६% |
| जेवणखाणे, वाणसामान आणि मनोरंजन यांवर ६ई रिवॉर्ड्स | २% | ३% |
| उर्वरित सर्व खर्चावर ६ई रिवॉर्ड्स (वॉलेट्स सोडून) | १% | २% |
| इंधनावर केलेल्या खर्चासाठी ६ई रिवॉर्ड्स | १% | २% |
| पेड कार्ड्ससाठी वेलकम बेनिफीट<br>(फक्त पहिल्या वर्षाच्या सदस्यत्वासाठीच्या शुल्कासाठीच्या पेमेंटवर दिला जातो) | • रु.१५०० वेलकम तिकीट<br>• रु.८९९ किमतीचे ६ई प्राईम ॲडऑन (प्राधान्यक्रमाने चेक ईन, सीट निवडण्याचा पर्याय, मोफत जेवण आणि जलदगतीने सामान पोहोचवणे)<br>• पार्टनर मर्चंट्सकडून वेलकम व्हाऊचर्स | • रु.१५०० वेलकम तिकीट<br>• रु.८९९ किमतीचे ६ई प्राईम ॲडऑन (प्राधान्यक्रमाने चेक ईन, सीट निवडण्याचा पर्याय, मोफत जेवण आणि जलदगतीने सामान पोहोचवणे)<br>पार्टनर मर्चंट्सकडून वेलकम व्हाऊचर्स |
| कन्व्हिनिअन्स फी (सुविधा शुल्क) | इंडिगो तिकिटांवर सूट दिलेली कन्व्हिनिअन्स फी - रु.१५० प्रति पॅक्स | इंडिगो तिकिटांवर सूट दिलेली कन्व्हिनिअन्स फी - रु.१५० प्रति पॅक्स |
| लाऊंज ॲक्सेस | लागू नाही | ८ लाउंज प्रवेश (२ प्रति तिमाही) |

**६ई रिवॉर्ड्स फक्त कार्डधारकाद्वारे आणि नामनिर्देशित व्यक्तीद्वारे रिडीम केले जाऊ शकतात.**

## कोटक बिझ क्रेडिट कार्डचे खास फायदे

**क. पॉलिसीअंतर्गतचे विम्याचे फायदे**

| **विमासंरक्षण** | **विम्याची रक्कम रु.** |
|---|---|
| कार्डाच्या दायित्वासाठी संरक्षण (कार्ड हरवल्यास दायित्व, नकली कार्ड/स्किमिंग/फिशिंग आणि ऑनलाईन फसवणुकीपासून संरक्षण) | ५०,००० |
| वैयक्तिक अपघात - फक्त मृत्यू | १५०,००० |
| विमानप्रवासामुळे वैयक्तक अपघात (फक्त मृत्यू) | ५,०००,० |
| खरेदीवर संरक्षण | २५००० |
| चेक इन केलेले सामान हरवणे | १०,००० |
| चेक इन केलेल्या सामानाला उशीर होणे | १०,००० |
| पासपोर्ट आणि प्रवासाशी संबंधित दस्तऐवज हरवणे | १०,००० |
| प्रवास करताना एका विमानाशी जोडलेले दुसरे आंतरराष्ट्रीय विमान हुकणे | १०,००० |

## सर्वसाधारण अटी

- विमासंरक्षण हे फक्त उल्लेख केलेल्या कार्ड्सच्या संख्येसाठी वैध आहे. फक्त प्रायमरी कार्डधारक यात व्याप्त आहेत.
- विमेदाराकडे बँकेने दिलेली एकापेक्षा अधिक कार्ड्स असल्यास, फक्त ज्या कार्डला सर्वोच्च हमी असेल त्यालाच ही पॉलिसी लागू होईल.
- ॲक्टिव्ह कार्ड क्लॉज - संरक्षण फक्त ॲक्टिव्ह कार्ड्सना लागू आहे. ॲक्टिव्ह कार्डची व्याख्या अशी केली जाते की, असे कार्ड जे हरवल्याच्या तारखेपूर्वी गेल्या ९० दिवसांमध्ये ज्याच्या माध्यमातून एक ट्रँझॅक्शन/एटीएमवरील कृती/पीओएस/इँ-कॉमर्स टर्मिनल यांवर व्यवहार केलेला असेल.
- अशी हमी दिलेली आहे की, सर्व कार्ड्समध्ये चिप आणि पिन तंत्रज्ञान अंगभूत आहे.
- आयसीआयसीआय लॉंबार्डला माहिति दिल्यानंतर ६० दिवसांच्या आत बँकेद्वारे/कार्डधारकाद्वारे दाव्यासाठीचे दस्तऐवज सादर करावयाचे असतात.
- दाव्यासंबंधीच्या कोणत्याही माहितीसाठी कृपया - आम्हाला १८६०२६६६ २६६६ या क्रमांकावर तात्काळ कळवा.

**सर्वसाधारण अपवर्जन**

- ढोबळ निष्काळजीपणा
- जाणूनबुजून कायद्याचे उल्लंघन करून केलेला कोणताही दावा.
- कोणतीही हानी.

# क्रेडिट कार्डच्या पुनर्रचनेसंबंधी (रिस्ट्रक्चरिंग) नियम व अटी - कोटक महिंद्रा बँक

१. ग्राहकाने (''तुम्ही'' किंवा ''ग्राहक'') केलेल्या ऑनलाईन अर्जाच्या अनुषंगाने (असा ऑनलाईन अर्ज व त्यासोबत बँकेने या नियम व अटींसह ग्राहकाला, बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या ग्राहकाच्या ईमेल आयडीवर पाठवलेला, क्रेडिट कार्डच्या थकीत मासिक हपत्यांच्या पुनर्रचनेसाठी ग्राहकाने केलेल्या अर्जाच्या संबंधातील ईमेल, यांना येथे यानंतर एकत्रितपणे ''ऑनलाईन अर्ज'' असे संबोधलेले आहे) कोटक महिंद्रा बँकेने स्वत:च्या एकमेव विवेकाधिकारात, अंतर्गत तपासणी आणि नियम व अटींचे अनुपालन यांच्या अधीन राहून, क्रेडिट कार्डवरील थकीत मासिक हप्त्यांची (यात यानंतर ज्यांचा उल्लेख ''क्रेडिट कार्डवरील कर्ज'' असा केलेला आहे) पुनर्रचना करण्याचे मान्य केलेले आहे. आवश्यक त्या वजावटी, ज्यात मुद्रांकशुल्कासाठीचे पेमेंट, प्रक्रियाशुल्क इत्यादींचा समावेश आहे, ते या बँकेत असलेल्या तुमच्या बचत/चालू खात्यातून वजा करण्याचा समावेश आहे व तुम्ही आवश्यक त्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करण्याच्या आणि ह्या नियम व अटींचा (''नियम'') स्वीकार करण्याच्या अधीन राहून बँक क्रेडिट कार्डवरील थकीत मासिक हप्त्यांची पुनर्रचना करण्याचे मान्य करीत आहे.

२. ग्राहकाने क्रेडिट कार्डवरील थकीत रकमेची पुनर्रचना करण्याच्या केलेल्या विनंतीला मान्यता देणे हे ग्राहकाने बँकेच्या अंतर्गत धोरणांचे आणि मार्गदर्शक सूचनांचे पालन आणि पूर्तता करण्यावर अवलंबून आहे. पुनर्रचनेसाठीचा अर्ज स्वीकारणे आणि त्याला मान्यता देणे म्हणजे ते कोणत्याही परिस्थितीत पुनर्रचनेसाठी दिलेली मान्यता आहे असा अर्थ होत नाही.

३. क्रेडिट कार्डच्या थकीत रकमेचे मासिक हप्त्यांमध्ये रूपांतरण करणे हे ग्राहकाने निवडलेल्या व मान्य केलेल्या मासिक हप्त्यांच्या योजनेसाठी मासिक हप्ते वजा करण्यासाठी ग्राहकाने बँकेला ऑटो डेबिट/एनएसीएच/पीडीसीज् किंवा पेमेंटचा अन्य कोणताही पर्यायी मार्ग (जे असेल त्यानुसार) देण्यावर अवलंबून आहे. आवश्यक त्या परवानग्या/दस्तऐवज या बाबतीत बँकेने कळवलेल्या कालमर्यादित पुरविले पाहिजेत.

४. अखेरच्या बिल्ड स्टेटमेंटनुसार क्रेडिट कार्डवर थकीत असलेली सर्व रक्कम, ज्यात बिल न केलेले व्यवहार, चालू मासिक हप्ते, कर्जे, शिल्लक रकमेचे हस्तांतरण, रोख रक्कम, व्याज, कर आणि शुल्क यांचाही समावेश आहे, ते एकदा पुनर्रचनेला मान्यता दिली की एकत्र केले जातील. ह्या प्रोग्रॅम अंतर्गत अंशत: पुनर्रचनेस मान्यता दिली जाणार नाही.

५. क्रेडिट कार्डवरील थकीत रकमेची पुनर्रचना केल्यानंतरचा मासिक हप्ता, पूर्ण थकीत रक्कम भरणा होईपर्यंत किंवा शेवटचा मासिक हप्ता बिल होईपर्यंत क्रेडिट कार्डसाठी जनरेट केलेल्या स्टेटमेंटमध्ये प्रत्येक महिन्याला बिल केला जाईल आणि स्टेटमेंटमध्ये उल्लेख केलेल्या देय तारखेस देय असेल.

६. पुनर्रचना केल्यानंतर, क्रेडिट कार्डवरील कोणतीही क्रेडिट किंवा कॅश फॅसिलिटी निष्क्रिय केली जाईल. हे कार्ड, ॲड ऑन कार्डसह, त्यानंतर वापर करण्याच्या दृष्टीने निष्क्रिय असेल.

७. 'चेक बाऊन्स फी' किंवा 'ऑटो-डेबिट रिटर्न फी' जर काही भरावी लागली असेल, तर ते भरण्यास ग्राहक जबाबदार असेल.

८. ठरवून दिल्यानुसारच्या कोणत्याही मासिक हप्त्याची रक्कम भरण्यात कुचराई झाल्यास किंवा तुम्ही दिलेले पीडीसीज्/ईएनएसीएच/एसआय जर मान्य (ऑनर) केला गेला नाही, तर वरील व्यवस्था निरर्थक ठरेल आणि तुम्हाला तेव्हापासून पुढे क्रेडिट कार्ड खात्यावरील संपूर्ण थकीत रक्कम भरावी लागेल.

९. क्रेडिट कार्डसाठीचे इतर सर्व नियम व अटी ग्राहकावर लागू आणि बंधनकारक असणे चालूच राहील.

१०. बँकेला वेळोवेळी आवश्यक असल्यानुसारचे दस्तऐवज ग्राहकाने करून दिले पाहिजेत.

२२ नोव्हेंबर २०२१ पर्यंत